3. बहिर्मुखता (E): (Extroversion)

बहिर्मुखता हा गुणविशेषाचा व्यक्तीचे बाह्य जगातील विविध प्रक्रियांत विविध प्रक्रियांत रमणे या बाबीशी संबंध असतो. ज्या व्यक्तींमध्ये हा गुणविशेष जास्त प्रमाणात असतो, अशा व्यक्ती बोलक्या स्वभावाच्या, उत्साही, धैर्यशील, समाजभिमुख, आपल्या भूमिकेशी ठाम असतात. याउलट हा गुणविशेष कमी प्रमाणात असणाऱ्या व्यक्ती शांत, एकलकोंड्या, भिडस्त स्वभावाच्या आढळतात. म्हणजेच या कमी किंवा जास्त गुणविशेषाचा प्रभाव व्यक्तीच्या व्यक्तिमत्वावर होत असतो.

4. सहमतिदर्शकता (A) : (Agreeableness)

सहमतीदर्शकता या गुणविशेषाचा इतरांशी मिळून मिसळून राहण्याशी आणि सामाजिक मेळ इत्यादी बाबींशी संबध असतो. ज्या व्यक्तीमध्ये हा गुणविशेष जास्त प्रमाणात असतो, अशा व्यक्ती प्रेमळ, इतरांची काळजी करणारे, सहकार्य करणारे दिसून येतात. ज्या व्यक्तीमध्ये हा गुणविशेष कमी प्रमाणात आढळतात, अशा व्यक्ती भांडखोर,

असहकार्य करणाऱ्या, इतरांचा व्देष करणाऱ्या दिसून येतात. म्हणजेच या कमी किंवा जास्त गुणविशेषाचा प्रभाव व्यक्तीच्या व्यक्तिमत्वावर होत असतो.

5. चेतपदर्शिता (N): (Neuroticism)

चेतपदर्शिता या गुणविशेषाची चीड, चिंता, खिन्नता इत्यादी नकारात्मक भावना अनुभवण्याशी संबंध असतो. ज्या व्यक्तींमध्ये हा गुणविशेष जास्त प्रमाणात असतो, अशा व्यक्ती नेहमी तणावग्रस्त, चिंतेत राहणाऱ्या, उदासीन, चिडखोर दिसून येतात. तर ज्या व्यक्तींमध्ये हा गुणविशेष कमी प्रमाणात आढळतो, अशा व्यक्ती संयमी, स्थिर स्वभावाच्या, शांत, समाधानी दिसतात. म्हणजेच या कमी किंवा जास्त गुणविशेषाचा प्रभाव व्यक्तीच्या व्यक्तिमत्वावर होत असतो.

2. संबधित साहित्याचे पुनरावलोकन

1) डॉ. स्वप्नील रमेश पाटील (ऑक्टोबर 2012) : यांनी केंद्रशासित व बिगर केंद्र शासित विभागातील आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास यावर याआधी संशोधन केलेले आहे. त्यांच्या संशोधनातून असे आढळून आले की, केंद्रशासित व बिगर केंद्रशासित विभागातील आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाबाबत सांख्यकीयदृष्ट्या 0.01 पातळीवर लक्षणीय भेद आढळून आला.

3. संशोधन पध्दती

अभ्यासाची उद्दिष्टे (Objectives of the Study)

1) आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या 'चेतापदशीता' या घटकाचा अभ्यास करणे.
2) आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या 'बहिर्मुखता' या घटकाचा अभ्यास करणे.
3) आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या 'अनुभवांचा मुक्त स्वीकार' या घटकाचा अभ्यास करणे.
4) आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या 'सहमतिदर्शकता' या घटकाचा अभ्यास करणे.
5) आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या 'सद्सदविवेकबुध्दी' या घटकाचा अभ्यास करणे.

गृहीतके (Hypothesis of the Study)

1) आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या 'चेतापदशीता' या घटकाबाबत लक्षणीय भेद आढळत नाही.
2) आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या 'बहिर्मुखता' या घटकाबाबत लक्षणीय भेद आढळत नाही.
3) आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या 'अनुभवांचा मुक्त स्वीकार' या घटकाबाबत लक्षणीय भेद आढळत नाही.
4) आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या 'सहमतिदर्शकता' या घटकाबाबत लक्षणीय भेद आढळत नाही.
5) आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या 'सद्सदविवेकबुध्दी' या घटकाबाबत लक्षणीय भेद आढळत नाही.

परिवर्तके (Variables)

1) **स्वतंत्र परिवर्तक (Independent Variables)**

i आदिवासी किशोरवयीन विद्यार्थी व विद्यार्थीनी

ii बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थी व विद्यार्थीनी

2) परतंत्र परिवर्तक (Dependent Variables)

i चेतापदशिता

ii बहिर्मुखता

iii अनुभवांचा मुक्त स्वीकार

iv सहमतिदर्शकता

v सद्सदविवेकबुध्दी

नमुना निवड (Sample)

लिंग	आदिवासी	बिगर आदिवासी	एकूण
मुले	40	40	80
मुली	40	40	80
एकूण	80	80	160

प्रस्तुत संशोधनासाठी एकूण 160 प्रदत्त नमुना निवडण्यात आले 160 पैकी 80 किशोरवयीन आदिवासी विद्यार्थी तर 80 किशोरवयीन बिगर आदिवासी विद्यार्थी आहेत. या 80 पैकी 40 मुले व 40 मुली आहेत. नमूना निवड करतांना किशोरवयीन विद्यार्थ्यांचे वय 16 ते 19 वर्षे घेण्यात आले.

नमुना निवडीचे साहित्य (Instrument for data Collection)

नमुना निवड करण्यासाठी यादृच्छिक पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे नमुना निवड करुन त्याविषयी माहिती मिळवण्यासाठी कोस्टा व मॅकक्रे यांची (NEO-PI) निओपिआय या पंचघटक व्यक्तिमत्व प्रश्नावलीचा उपयोग केला आहे. या प्रश्नावलीची विश्वसनियता 0.86 ते 0.95 इतकी आहे तर यथार्थता 0.35 ते 0.75 इतकी आहे.

संशोधन आराखडा

प्रस्तुत संशोधनात 2x2 प्रायोगिक घटक आराखडा वापरण्यात आला आहे.

प्रक्रिया (Procedure)

सर्व प्रथम नमुना निवड करण्यासाठी संशोधकाने नाशिक जिल्हयातील कळवण तालुक्यातील विविध शाळांना भेटी देऊन त्यास संमती मिळवली. यानंतर शाळेतील आदिवासी विद्यार्थी, ज्यांचे वय 16 ते 19 आहे. त्यांची माहिती मिळवली. यानंतर विद्यार्थ्यांसोबत सुसंवाद निर्माण करण्यासाठी त्यांच्याशी अनौपचारिक चर्चा केली नंतर त्यांना कोस्टा व मॅकक्रे यांची व्यक्तिमत्वाची पंचघटक प्रश्नावली देऊन योग्य त्या सूचना देण्यात आल्या सूचना योग्य प्रकारे समजल्या की नाही याची खात्री करुन प्रश्नावली सोडवण्यास सुरुवात केली.

नमून्याचे विश्लेषण (Data Analysis)

सर्व प्रथम नियम पुस्तिकेनुसार प्रश्नावलीतील उत्तरांना गुण देण्यात आले वेगवेगळया विभागतील सर्व गुणांनी गोळाबेरीज करण्यात आली. सर्वप्रथम मध्यमान काढण्यात आले यानंतर प्रमाण विचलन काढून टी टेस्ट काढण्यात आली व भेद सार्थ आहे की नाही हे पाहण्यात आले.

4 सांख्यिकीय विश्लेषण (Statistical Analysis)

सर्व प्रथम परिवर्तकांमधील फरक पाहण्यासाठी टी टेस्ट चा वापर करण्यात आला. टी टेस्ट 0.001 आणि 0.05 पातळीवर लक्षणीय आहे की नाही हे पाहण्यात आले.

आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थी व विद्यार्थीनी

Group Statistics							
	Community	N	Mean	Std.Deviation	df	t	Sing.Level
N	Tribal	80	23.3625	5.10459	158	1.24	NS
	Non-Tribal	80	24.3375	4.80491			
Ex	Tribal	80	22.9625	5.33781	158	2.06	0.05
	Non-Tribal	80	24.6375	4.89185			
O	Tribal	80	24.5500	4.20036	158	0.27	NS
	Non-Tribal	80	24.3625	4.29083			
Ag	Tribal	80	27.5250	5.81350	158	3.62	0.01
	Non-Tribal	80	24.3875	5.10769			
Co	Tribal	80	24.6000	5.26657	158	0.75	NS
	Non-Tribal	80	23.9625	5.41550			

5. निष्कर्ष (Conclusion)

1) आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या 'चेतापदशीता' या घटकाबाबत लक्षणीय भेद आढळून आला नाही.
2) आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या 'बहिर्मुखता' या घटकाबाबत लक्षणीय भेद आढळून आला.
3) आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या 'अनुभवांचा मुक्त स्वीकार' या घटकाबाबत लक्षणीय भेद आढळून आला नाही.
4) आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या 'सहमतिदर्शकता' या घटकाबाबत लक्षणीय भेद आढळून आला.
5) आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या 'सद्सदविवेकबुध्दी' या घटकाबाबत लक्षणीय आढळून आला नाही.

संदर्भ ग्रंथ (Reference)

1) डॉ. रा. र. बोरुडे, डॉ. मेघा कुमठेकर, डॉ. भरत देसाई, सी. शिला गोलविलकर (2005) वैकासिक मानसशास्त्र, पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन, पुणे-30.
2) विलास पाध्ये (2004) मानसशास्त्र - एक परिचय, रेणुका प्रकाशन, औरंगाबाद 431001.
3) सौ. माधवी खडके, दीपक साळुंखे (2008) मानसशास्त्र, निराली प्रकाशन, पुणे 411005.
4) देशपांडे सु. वा. (1980), मानसशास्त्रीय प्रयोग पुणेः कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
5) पंडित र. वि. (1985) मानसशास्त्रची मुलतत्वे नागपूर : विद्या प्रकाशन.
6) दांडेकर वा. ना. (1988) शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र कोल्हापूर : मोघे प्रकाशन.
7) पाटील स्वप्नील रमेश (ऑक्टोबर 2012) : केंद्रशासित व बिगर केंद्रशासित विभागातील आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा अभयास रिसर्च आजतक Vol 1,No 3 ISSN2278-2001.
8) Kelinger F. N. (2007) Foundation of behavioral Research, 2nd Edi, Delhi: Surjeet Publication.

9) Kothari C. R. (2004): Research Methodology : Methods and Technique, New Delhi, New age International Publication.
10) Mischel, W. (1969): Personality and Assessment, New York, Wiley.
11) Tripathi R. R. (1980): Personality test Agra Motivational Psychology Corporation.
12) Sing A. K. (2008) : Test Measurement and Research Method in Behavioural Science, Patna Bharti Bhavan Publication.
13) Sociology of Tribal Society, Dr. Pradeep Aglave, Shri Sainath Publication, Feb 2011.
14) httpsL://www.census2011.co.in.
15) https://village.info.in.

मराठवाड्यातील धम्मपरिषदांचे स्वरुप आणि कार्याचा ऐतिहासिक मागोवा

हिंगोले समाधान लक्ष्मणराव
संशोधक विद्यार्थी
संशोधनकेंद्र: यशवंत महाविद्यालय नांदेड.

डॉ. एस. एन. शेटोड
इतिहास विभाग प्रमुख
शंकरराव चव्हाण, महाविद्यालय अर्धापूर, जि. नांदेड

प्रस्तावना :

प्रस्तुत शोध निबंधात मराठवाड्यातील धम्मपरिषदांचे स्वरुप आणि कार्यावर प्रकाश टाकला आहे. गौतम बुध्दाच्या काळातच बावरी ब्राह्मण आणि त्यांच्या शिष्यांनी महाराष्ट्रात बौध्द धम्माचा प्रचार आणि प्रसार केला. मराठवाड्यातील गोदावरी नादीच्या किनारी पैठण आणि नांदेड शहर आहे. याठिकाणी बावरी ब्राह्मणाचे वास्तव्य दिर्घकाळ होते त्यांच्यामुळे मराठवाड्यात बौध्द धम्माला विशेष महत्व आहे. परंतु भारतातून एकेकाळी बुध्द धम्म लोप होण्यास अनेक बाह्य कारणे जबाबदार होती. त्यास जबाबदार असेली महत्वाची कारणे म्हणजे राज्यकत्यार्ंनी केलेला छळ, ब्राह्मण धर्मीयांनी केलेला विरोध आणि मुसलमानांनी केलेल्या स्वाऱ्या ही प्रमुख कारणे सांगता येतील.[1] 1970 च्या दशकात महाराष्ट्रातील बहुतांश गावात बुद्धविहाराची निर्मिती केली. विहारात बहुसंख्य लोक एकत्रित जमा होऊन धम्म संदर्भात चर्चा केली. समाजात धम्म विचार आणि तत्वज्ञानाची माहिती व्हावी याकरिता धम्म परिषदांचे आयोजन करण्यात आले. धम्मपरिषदा समाजात एकात्मका, धर्मनिरपेक्ष, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता प्रस्थपित करून संवर्धन करण्यात महत्वाची भूमिका बजावित आहेत.

शोध निबंधाची उद्दिष्ट्ये :

1) मराठवाड्यातील धम्मपरिषदांच्या स्वरूपाचा अभ्यास करणे.
2) मराठवाड्यातील धम्मपरिषदांच्या कार्याचा अभ्यास करणे.
3) मराठवाड्यातील धम्मपरिषदांचे सातत्य आणि बदल यांचा अभ्यास करणे.
4) मराठवाड्यातील धम्मपरिषदांची अम्मलबजावणी यांचा अभ्यास करणे.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत शोध निबंध लिहितांना संशोधन पध्दतीचा अवलंब केला आहे. शोध निबंध द्वितीय तथ्यावर आधारीत आहेत त्यामुळे विविध संदर्भग्रंथ, पुस्तके, वर्तमानपत्रे आणि संकेतस्थळांचा अवलंब करून शोध निबंधाचे लिखाण करण्यात आले आहे.

अ)मराठवाड्यातील धम्मपरिषदांचे स्वरूप:

भारतात विविध राज्याचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य प्रगत असून महाराष्ट्र राज्याची विभागणी प्रामुख्याने चार विभागात झाली आहे, प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा, भाषावार राज्यांची विभागणी झाल्यामुळे 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली, परंतु महाराष्ट्राला महाराष्ट्र हे नाव केंव्हा आणि कसे मिळाले हे स्पष्टपणे सांगणे गुंतागुंतीचे आहे. काही लोकांनी राष्ट्रकुटावरून महाराष्ट्राचे महाराष्ट्र नाव पडले असे स्पष्ट केले, पण ते संयुक्तीक वाटत नाही. खऱ्याअर्थाने राष्ट्रकुटाच्या अगोदर महाराष्ट्र असे नाव पडले होते, हे सिध्द झाले आहे आणि दुसरे म्हणजे कोणत्याच व्युत्पतिशास्त्रानुसार राष्ट्रकुटाचे महाराष्ट्र होत नाही असे नमूद केले आहे. यासंदर्भात डॉ.आळतेकरांची भूमिका महत्वाची दिसून येते. त्यांच्यामते, महाराष्ट्राच्या इतिहासावर आणि समाजरचनेवर नवीन प्रकाश टाकला आहे.[2] मात्र मराठवाड्याची निर्मिती देखील स्वतंत्रपणे झाली नाही कारण मराठवाडा हा विभाग हैद्राबाद संस्थानात निजामाच्या अधिपत्या खाली होता म्हणून हैद्राबाद मुक्तिसंग्राम लढला

गेला. ज्यामध्ये मराठवाड्यातील स्वातंत्र्यसेनिकीचे योगदान अधिक आहे. हैद्राबाद संस्थानाच्या मराठी भाषिक भागातून 17 सप्टेबर 1948 रोजी मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळाले. मराठवाडचात नांदेड, परभणी, लातूर बीड, संभाजीनगर, धाराशिव, जालना आणि हिंगोली जिल्ह्यांचा समावेश आहे. मराठवाड्याची राजधानी औरंगाबाद आहे.[3]

मराठवाडयातील विविध जिल्हयात आंतराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि स्थानिक पातळीवर विविध धम्म परिषद संपन्न झाल्या आहेत. धम्म परिषदांच्या स्वरुपाचा आढावा स्पष्ट करण्यात येत आहे. धम्म परिषदांचे स्वरूप अभ्यासतांना असे विवेचन करण्यात येते की, धम्म परिषदांच्या प्रकारानुसार स्वरूपामध्ये बदल दिसून येते. अशाकेकालीन धम्म परिषद् तिच्या उदिष्टानुसार बदल दिसून येतो तर त्या धम्म परिषदेचा उद्देश संबंध मानवाचे कल्याण साधणे, नैतिक मूल्यांना अनुसरून जविन जगणे भाणि सामाजिक एकात्मता व सलोखा साधने हा होता. बौध्द धम्म परिषदांचा ज्यांचा धम्म संगिती म्हणून उल्लेख केला आहे. त्यांचा उद्देश देखील महत्वाचा आहे, तो म्हणजे बुद्धांच्या शिकवणुकीचे संकलन करणे, बौध्द तत्वज्ञानाचे स्पष्टीकरण स्पष्ट करणे' दोन्ही प्रकारच्या परिषदांच्या मुख्य आणि महत्वाचा उद्देश समाजाला सुयोग्य मार्गावर आणने आणि समाजात शांता-समृद्धी, समता प्रस्थापित करणे.[4] आशा पार्श्वभूमीवर स्वातंत्र्योत्तर काळात म्हणजेच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौध्द धम्माची दीक्षा घेतली. त्यानंतर महाराष्ट्रात व मराठवाडयात विविध जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात बौध्द धम्म परिषदा संपन्न झाल्या आहेत, त्या अधिक प्रमाणात वर्तमानात होत आहेत त्याकरिता धम्मपरिषदांचे स्वरूप स्पष्ट करणे अध्ययनाच्या दृष्टिकोनातून महत्वपूर्ण ठरले. मराठवाड्यातील धम्मपरिषदांचे महत्वपूर्ण वैशिष्टये म्हणजे साहित्य याकरिता भिक्खुनी पाली या भाषेचा उपयोग केलेला दिसून येतो. धम्ममउपदेश, धम्मसंघातील पंचभेद, बौध्द धम्माचे तत्वज्ञान आणि गौतम बुद्ध आणि डॉ.बाबासाहेव आंबेडकर यांचे अलौकिक व्यक्तिमत्व सामान्यजनापर्यत पोहचविण्याचे महत्वपूर्ण कार्य सदरील धम्म परिषदांच्या माध्यमातून झाले आहे, असे अधोरेखित करता येईल.[5]

ब)मराठवाड्यातील धम्म परिषदांचे कार्ये :

मराठवाड्यातील धम्मपरिषदांचे स्वरुप व्यापक आणि ऐतिहासिक आहे. त्याचप्रमाणे धम्मपरिषदांचे कार्य देखील महत्वाची आहेत, ते पुढीलप्रमाणे :

1)बौध्द तत्वज्ञानाचा प्रचार-प्रसार करणे :

इ. स. पूर्व चौथ्या शतकात भारतात गौतम बुद्धांनी बौद्ध धम्माची स्थापना भारतात केली. बौध्द धम्माचे तत्वज्ञान पंचशिल तत्वे, चार आर्य सत्य आणि अष्टांगीक मार्ग यामध्ये समाविष्ट आहे. बौध्द धम्माच्या तत्वज्ञानाचा प्रचार-प्रसार प्रामुख्याने गौतम बुद्ध, सम्राट अशोक आणि सम्राट चक्रावर्ती यासारख्या महान मानवांनी केला. त्यांची नोंद जगाच्या धम्म इतिहासात आढळून येते. महानाम, अश्वजीत, यश, विमल, सुबाहू, पूर्वजीत आणि गावपती आणि इतर 60 उपासकांना प्रव्रज्जीत करून पहिल्यांदा आपल्या आविश्कृत धमाची शिकवण दिली व धम्माचरणाच्या माणवी प्रेरणेला चक्रासारखी गती दिली.

2)बहुजन हिताय आणि बहुजन सुखायचा भार्ग दाखाविणे :

गौतम बुद्धाच्या तत्वज्ञानात बहुजन हिताय आणि बहुजन सुखाय हा मार्ग आहे. गौतम बुद्धाने बहुजन समाजाच्या हितासाठी-सुखासाठी कल्याणकारी समाज निर्माण केला. यासाठी बौद्ध भिक्खूंच्या संघटनेच्या माध्यमातून व्यापक प्रमाणात आंदोलन केले. परिणामी लोकांच्या विचारधारेत परिवर्तन घडवून नवीन आदर्श समाज

निर्माण केला. तीच भारताच्या इतिहासातील व तत्वज्ञानातील पहिली क्रांती म्हणून सांगता येईल. बहुजन हिताय आणि बहुजन सुखाय यावर प्रतिक्रिया देताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धाला जगातील पहिला समाज क्रांतिकारक म्हटले आहे. गौतम बुद्धांनी बहुजन समाजाला अज्ञान, अंधश्रध्दा आणि जातिभेद यांच्या पासून विभक्त केले. या घटनांमुळे बहुजन समाजाच्या विकासाला खिळ बसली होती. म्हणून त्यांना यापासून मुक्त केले.[6]

3)अंधश्रद्धांचे निर्मूलन करणे :

बौध्द धम्म परिषदांच्या कार्याचा आढावा घेताना अंधश्रध्दांचे निर्मूलन करणे यावर प्रकाश टाकण्यात येत आहे. प्राचीन धर्मग्रंथात अंधश्रध्देविषयी विचार स्पष्ट केलेले दिसून येतात. अंधश्रध्दा म्हणजे एखाधा गोष्टीवर पुरव्याअभावी विश्वास ठेवून दैनंदिन जीवनात कार्य करणे होय. अंधश्रध्देचे पालन केल्यामुळे समाजाचा विकास मंदावतो आणि व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा विकास थांबतो. अंधश्रद्धा जिवंत ठेवण्याचे कार्य कर्मठ धार्मिक संघटना करीत आहेत. अंधश्रध्देस विविध कारणे जबाबदार आहेत, त्यास प्रामुख्याने अज्ञान, बेकारी, दैन्य, दुख: आणि अंधभक्त जबाबदार आहेत. विवेकविना धर्म म्हणजेच अधंश्रध्दा पसरविणे होय. या अंधश्रध्देचे विविध परिणाम आहेत. समाजाची आर्थिक प्रगती न होणे, समाजात अफवा पसरविणे, खोटी माहिती देणे, धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता चुकीची आहे असा खोटा प्रचार-प्रसार करणे. या सर्व बाबी बौध्द धम्माच्या तत्वज्ञानाच्या विसंगत असल्याचे स्पष्ट होते. या बाबीचा विचार करून अंधश्रध्देचे निर्मूलन कोणत्या बाबींच्या माध्यमातन करता येईल.

4) मानवतावादी मूल्यांची रुजवणूक करणे :

पृथ्वी तलावर मानव हा सर्वांत बुध्दीमान प्राणी आहे. मानवाने विविध धर्माची आणि जातीची निर्मिती केली. जातीच्या तत्वज्ञानात विषमता आहे परंतु धर्माच्या तत्वज्ञानान विषमता दिसून येत नाही. विशेषत: बौद्ध आणि जैन धर्माचे तत्वज्ञान मानवी मूल्याची जोपासना करणारे आहे. बौध्द धम्माच्या तत्वज्ञानात पंचशिल तत्वे, चार आर्य सत्य आणि अष्टांगीक मार्गाचा समावेश आहे. यामध्ये पृथ्वीतलावरील मानवाच्या कल्याणाचा व्यापक दृष्टिकोनाचे वर्णन केले आहे. गौतम बुद्धांनी सर्व मानवासाठी महत्वाचा उपदेश सांगितला आहे. सर्व प्राण्यांचे मंगल व्हावे, सर्व मानवप्राणी सकुशल राहावेत सुखी राहावेत, कोणी दुर्बल असो वा सबल, उच्च हो अथवा खालच्या पातळीवर, मोठे असो अथवा लहान, जवळ असो अथवा दूर, सर्वच प्राणी सुखी असोत, कुणी कुणास धोखा देता कामा नये. एका मानवाने दुसऱ्या मानवाची, एका समाजाने दुसऱ्या समाजाची घृणा करू नये, व्देष करू नये, वाईट, चिंतु नये अशा आशयाचे तत्त्वज्ञान गौतम बुद्धांनी स्पष्ट केले आहे. तेच तत्वज्ञान मानवी मूल्यांची रुजवणूक करणारे ठरले आहे.

5)वैज्ञानिक मूल्याची माहिती देणे :

बौद्ध धम्मात वैज्ञानिक मूल्याला अधिक महत्व आहे. वैज्ञानिक मूल्यावर आधारित बौद्ध धम्माची निर्मिती झाली आहे. बौध्द धम्मातील मानव एखादी गोष्ट डोळयांने पाहतो तो तिला विज्ञानाने जाणून घेतो, म्हणजेच विज्ञानात कार्यकारणभाव महत्वाचा असतो. म्हणून गौतम बुद्धांनी वैज्ञानिक मूल्यांचा स्वीकार केला. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय ही मुलभूत तत्वे वैज्ञानिक मूल्याची आहेत.[7]

सारांश :

उपरोक्त मराठवाड्यातील धम्म परिषदांचे स्वरुप आणि कार्याचा ऐतिहासिक मागोवा अभ्यासल्यानंतर असे विवेचन करण्यात येते की, धम्मपरिषदा समता आणि मानवी मूल्य गतिमान करण्याचे साधन आहे. आधुनिक वैज्ञानिक मानव कल्याणाची अभिप्रेरणा धम्म परिषदेच्या कार्यात आहे. प्राचीन विषमतावादी ऐतिहासिक परंपरा आणि

जागतिक भांडवली शोषणाला बुध्दांचे वैश्विक नीतीमूल्य हेच उत्तर म्हणून अधोरेखित करता येईल. त्यामुळे जगालाच धम्म परिषदांची गरज आहे. तथागत बुध्दाच्या विचारांना कोणत्याच सीमा नाहीत. त्यामुळे धम्म परिषदा दर वर्षी मोठ्या उत्साहाने साजऱ्या होत नाहीत. गौतम बुध्दांच्या धम्माचे चिंतन रुजविण्यासाठी व धम्म चिंतनाच्या व्यापक प्रचार-प्रसाराठीच धम्म परिषदा महत्वाच्या ठरत आहेत. धम्म प्रबोधनातून, धम्माच्या साहित्यातून समस्त मानवाच्या वैश्विक कल्याणाचा महत्वाचा मार्ग सांगितला आहे. मुळात धम्म परिषदा कोण्या एका समुदायासाठी किंवा ठराविक समाजासाठी नाहीत तर वैश्विक आहेत.

संदर्भग्रंथ सूची:

1) मोरे मा.रा. (2017), 'महाराष्ट्रातील बुध्द धम्माचा इतिहास' औरंगाबाद, कौशल्य प्रकाशन, तिसरे पुर्नरमुद्रण, पृ.क्र.112,
2) मोरे, मा. शं (2017) 'महाराष्ट्रातील बुद्ध धम्माचा इतिहास, औरंगाबाद, पासक, कौशल्य प्रकाशन तिसरी आवृली ५.कृ. 12, 13.
3) कुलकर्णी सविता, हातेकर नीरज (2019) 'प्रादेशिक विषमतेचा नवा आयाम पुणे, द युनिक अॅकडमी पब्लिकेशन्स प्रा.लि. प्रथमावृत्ती पृ.क्र.11.
4) खोब्रागडे बालकदास (2024) धमारीक्षेनंतरची बौद्ध संस्कृती,' नागपूर, संकेत प्रकारान प्रथमावृली पृ.क्र.-212
5) कोळेकर प्रभाकर (2018) 'बौध्द धम्म परिषदाः धम्म प्रसारातील योगदानाची चिकित्सा' Review & Research. www.bp. world पृ.क्र. ते 10.
6) वाघमारे सुरेश (2018) 'लातूरच्या धम्मचळवळीला गतिमान करणारं कुशल नेतृत्व: भिक्टनू परमानंद' स्मरणिका पृ.क्र.33, 34, 35.
7) कांबळे केशव (2017) 'धम्मदिक्षेनंतर समाजजागृती' सातकर्णी, पृ.कृ.34.35

भारतीय संस्कृतीचा उदय आणि विकास

डॉ. रंजना ज्योतीराम महाजन
मराठी विभाग
महात्मा फुले महाविद्यालय परसवाडा

सारांश:

संस्कृती म्हणजे काय असा प्रश्न जर कोणाला विचारला तर अनेक लोक त्यांचे अनेक पद्धतीने उत्तर देतील. परंतु संस्कृती म्हणजे काय याचे कोणतेही संस्कारपूर्ण कृती किंवा लोकोपयोगी कृती म्हणजेच संस्कृती होईल, असे उत्तर आपण दिले पाहिजे. मला वाटते संस्कृती ही विचार आणि कृती यांच्या सातत्यपूर्ण संयोगातून निर्माण होते. कोणतेही अयोग्य विचार आणि अयोग्य कृती यांना सुद्धा जर आपण संस्कृती नाव दिले. तर आदर्श संस्कृतीच्या उदय आणि विकास हीच बाब सहाय्यभूत ठरू शकते.

भारतातील सध्याची एकूण परिस्थिती बघितली तर भारतीय संस्कृती नेमके कशाला म्हणावे असा प्रश्न कोणालाही पडणे साहजिकच आहे. भारतात आजवर अनेकदा हिंदू संस्कृती, बौद्ध संस्कृती, आदिवासी संस्कृती, मराठी संस्कृती, ब्राम्हणी संस्कृती, वैदिक संस्कृती, असे अनेक शब्द प्रयोग उच्चारलेले दिसतात. भारतीय संस्कृती ही अनेक संस्कृतीच्या समावेशाने बनलेली आहे. अनेक विचार आणि कृतीच्या चिकित्सा न करता ढोबळमानाने समावेश केल्यामुळे त्यात एक प्रकारची भेसळमिसळ परस्परविरोध निर्माण झालेला दिसतो. आपल्या संस्कृतीशी आपल्या भावना जोडल्या गेलेल्या असल्यामुळे त्यांच्यातील सुधारणा करणे गरजेचे असते. लोकांच्या भावना दुखावल्या जाण्याच्या भीतीमुळे तिची चिकित्सा करण्यास मर्यादा येतात. अशा मर्यादा असल्यामुळे त्यांच्यातील दुरावा दूर करणे कठीण ठरते.

बीजशब्द : सामाजिक सुधारणा, राष्ट्रीय चळवळ, लोकशाही मूल्ये, सांस्कृतिक समन्वय, धर्मनिरपेक्षता, आधुनिकीकरण, ग्लोबलायझेशनचा प्रभाव, शैक्षणिक प्रगती, माध्यमांचा प्रसार, साहित्य आणि कला, स्त्री सक्षमीकरण, तंत्रज्ञान आणि सामाजिक परिवर्तन इत्यादी.

प्रस्तावना :

प्राचीन काळात भारतीय प्रदेशात आर्य व अनार्य या दोन समूहांमध्ये घनघोर संघर्ष झाल्याचे अनेकदा सांगितले जाते. या दोन समूहाची संस्कृती भिन्न असल्यामुळे हा संघर्ष दोन भिन्न संस्कृती मधला संघर्ष आजही मानला जातो. भारतातील धार्मिक मानले जाणारे बहुतांश साहित्य हे संघर्षाच्या अवतीभवती फिरणारे आहेत. आर्याने अनार्याची दास, दस्यू, राक्षस इत्यादी विशेषणे लावून हेटाळणी केलेली दिसते. महात्मा फुले, पेरियार, डॉ. आंबेडकर व इतर अनेकांनी आपल्या लेखन, भाषणे यातून तीव्र संताप व्यक्त केलेला आहे. भारतातील या प्राचीन संस्कृतीच्या शोधाने अनेक सुशिक्षित लोक प्रभावी झालेले आहेत. स्वामी विवेकानंद, यांच्यापासून ते रवींद्रनाथ टागोर पर्यंत अनेक श्रेष्ठ भारतीयांचा समावेश झालेल्या असल्याचे दिसून येते. महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्र प्रसाद, प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे, महर्षी वि. रा. शिंदे अशा विद्वानांनी व लोकप्रिय नेत्यांनी शोधण्याचे काम मोठ्या आत्मीयतेने केले. यातूनच एक नवा आदर्श अशा भारतीय संस्कृतीत रुजवण्यास अनुकूल असे वातावरण संपूर्ण भारतभर निर्माण केल्याचे दिसून येते.

मध्ययुगीन काळात आलेले मुसलमान राज्यकर्त्याचे आगमन हे या देशातील पारंपारिक सांस्कृतिक संघर्षाला एक वेगळेच वळण देणारे उपयोगी ठरलेले आहे. या काळात मुघल राज्यकर्त्यांचा भारतीय प्रदेशातील राजकीय विजय

आणि त्यांच्या सांस्कृतिक वर्चस्व कारणीभूत ठरलेला असल्याचे दिसून येतो. मूळ भारतीय संस्कृती आणि नवीन संस्कृती या दोन संस्कृतीचा प्रचंड संघर्ष भारतीय प्रदेशात झाला. या संघर्षाच्या परिणामस्वरूप भारतातील बौद्ध व जैन संस्कृती आपोआपच मागे पडल्याचे दिसून येतात. भारतातील या सांस्कृतिक संघर्षात भारतीय बुद्धाची संस्कृतीचे तर जवळपासच नामोनेष झालेले दिसून येते. नालंदा व तक्षशिला सारखी विद्यापीठे या धार्मिक सांस्कृतिक संघर्षात हजारो पुस्तकासह नष्ट झाली. ज्ञानाच्या क्षेत्रात भारताची मोठी पीछेहाट झाल्याचे जाणवते. भारतीय संस्कृतीला आंधळयाच्या संस्कृतीचे स्वरूप प्राप्त झाल्याचे दिसून येते. ब्रिटिशांच्या काळात पाश्चिमात इंग्रजी भाषकांची एक वेगळी संस्कृती आपल्याला बघायला मिळते. भारतीय संस्कृतीला आंधळयाच्या संस्कृतीचे स्वरूप प्राप्त झाल्याचे दिसून येते.

ब्रिटिशांच्या काळात पाश्चिमात्य इंग्रजी भाषकांची एक वेगळीच अशी संस्कृती देशात खूप दूरपर्यंत पसरलेली असल्याचे जाणवते. काही सुशिक्षित भारतीय लोकही इकडे-तिकडे खेचल्या गेले, तर काही पददलित लोकही सुटकेच्या आशेने, अपेक्षेने तिकडे चालते झाले. ब्रिटिशांनी भारतातल्या हिंदू मुस्लिमांतील भांडणाचा लाभ उठवला. त्यांच्यातील काही शोधकांनी भारतातल्या विस्मरणात गेलेल्या बौद्ध संस्कृतीला पुन्हा एका नव्याने उजेडात आणण्याचे काम केले. औरंगाबादची अजंठा वेरूळ लेणी, मध्य प्रदेशातील सांचीचा स्तूप, नालासोपारा येथील सांचीच्या स्तूपाची बुद्धकालीन प्रतिकृती अशा अनेक ऐतिहासिक स्थळांना त्यांनी विस्मरणाच्या यादीतून बाहेर काढले. अशाप्रकारे भारतातील या प्राचीन संस्कृतीच्या शोधाने अनेक सुशिक्षित लोक प्रभावी झाल्याचे दिसून येतात. पाश्चात्त्यांच्या नादी लागून त्याचे अंधानुकरण करण्याऐवजी त्या व्यवस्थेत सुधारणा करून त्या अधिक विकसित कशा करता येतील, यावर त्यांनी भर दिला. सर्व क्षेत्राप्रमाणे साहित्यातही पाश्चात्त्य प्रवाह शिरले असल्याचे दिसून येते. नेमाडेंनी त्यावरच प्रहार केल्यानंतर इतर लेखक अंतर्मुख झाले आणि त्यांनी आपल्या लेखनाची दिशा बदलली. नेमाडेंनी आपल्या साहित्यात बोलीभाषेला अधिकाधिक वाव दिला.

विकासाची भारतीय संस्कृतीचा उदय आणि उद्दिष्टे :

१. भारतीय संस्कृतीची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेणे, प्राचीन मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडातील सांस्कृतिक घडामोडीचा अभ्यास करणे.

२. संस्कृतीच्या विकासावर प्रभाव टाकणारे घटक ओळखणे, भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय घटकांचा प्रभाव समजून घेणे.

३. विविध संस्कृतीच्या परस्पर संवादांचा प्रभाव समजून घेणे, आर्य, द्रविड, बौद्ध, जैन, मुगल, ग्रीक, हुण, तुर्क आणि युरोपीय प्रभावांचा भारतीय संस्कृतीवर झालेला परिणाम समजणे.

४. सामाजिक आणि धार्मिक चळवळीचे योगदान जाणून घेणे, वेदकालीन बौद्ध, जैन, परंपरा भक्ती, सूफी आंदोलन तसेच सामाजिक सुधारणा आणि पुनरुज्जीवन चळवळीचा अभ्यास करणे.

५. भारतीय संस्कृतीतील विविधतेतील एकतेचे महत्व ओळखणे, भिन्न भाषा, रितीरिवाज, परंपरा असूनही सांस्कृतिक एकता कशी निर्माण झाली हे समजणे.

६. सांस्कृतिक वारशाचे संवर्धन करण्याची गरज स्पष्ट करणे, भारतीय संस्कृतीतील संरक्षित व असुरक्षित वारशाचे महत्व आणि संरक्षणाची आवश्यकता समजून घेणे.

७. भारतीय संस्कृतीच्या आधुनिक भारताच्या विकासावर झालेला प्रभाव समजणे, आचार, विचार, लोकशाही, सहिष्णुता, जीवनमूल्ये आणि सामाजिक विकासावर संस्कृतीचा परिणाम स्पष्ट करणे.

८. सांस्कृतिक परिवर्तनाची कारणे व परिणाम अभ्यासणे, परकीय आक्रमणे, व्यापार, स्थलांतर, तंत्रज्ञान, शिक्षण आणि जागतिकीकरण यामुळे झालेले बदल समजून घेणे.

भारतीय संस्कृती :

ही देशाच्या इतिहासामुळे विलक्षण, भूगोलामुळे आणि जनतेतील वैविध्यमुळे आकारास आली आहे. शेजारच्या देशातील चालीरीती, परंपरा व कल्पना सामावून घेत भारतीय संस्कृतीने सिंधू संस्कृती दरम्यान जन्माला आलेली आहे. दक्षिण भारतातील लोहयुगकाळात बौद्ध धम्माच्या उदय आणि विकासाच्या काळात तसेच भारताचे सुवर्णयोग मुसलमानी आक्रमण व युरोपियन देशाच्या वसाहती दरम्यान झालेले बदल पचवून देखील स्वतःचे परंपरागत प्राचीन तत्व टिकवून ठेवलेले आहे. भारतीय संस्कृतीने तिच्या इतिहासाने अद्वितीय भौगोलिक रचनेने वैविध्यपूर्ण लोकजीवनाने आणि शेजारील देशाच्या परंपरा व कल्पना स्वीकारून तसेच पुरातन, परंपरा जपून आकार घेतला असल्याचे दिसून येते.

आशय :

मनुष्य व त्यांच्या भोवतीचे विश्व मिळून निसर्ग बनतो. या निसर्गामध्ये जीवनाच्या उत्कर्षाला अनुकूल असे बदल कशा प्रकारे करता येईल याचे दर्शन संस्कृतीमधून घडवित असतो. निसर्गावर काही संस्कार करून मनुष्य, आपली जीवन यात्रा चालवीत असतो. तो केवळ बाह्य विश्वातील पदार्थावर संस्कार करतो. असे नव्हे तर स्वतःच्या देह बोलीतून मन बुद्धीतून संस्कार करून स्व:तात बदल घडवून आणण्याचे काम करतो. संस्कृती या शब्दात हे दोन्ही प्रकारचे बदल फरक अभिप्रेत असल्याचे दिसून येते. भारतीय संस्कृती ही जगातील सर्वात प्राचीन आणि सातत्याने विकसित होत आलेली संस्कृती आहे. विविध वंश, भाषा, धर्म, परंपरा आणि विचारधारांचा संगम झाल्यामुळे भारतीय संस्कृती ही बहुरंगी, बहुविध आणि समृद्ध झाले आहे. तिचा उदय आणि विकास हा अनेक ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक आणि धार्मिक घटकांच्या परस्पर संवादातून झाला असल्याचे जाणवते. संत आणि समाजसुधारकांनी समरसतेच्या विचारांना प्रोत्साहन दिले. या विचारांनी समाजातील जातीय भेदभावाला आव्हान दिले आणि समता व न्यायावर आधारित समाजनिर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आधुनिकता :

इंग्रजी समीक्षेत आधुनिकता हा शब्दप्रयोग 1920 पासून रूढ झालेला असल्याचे दिसून येते. आधुनिकतेच्या अंगाने लेखन करणारे अनेक साहित्यिक आहेत. त्यापैकी गौरी देशपांडे, रोहिणी कुलकर्णी, शांता गोखले, मेघना पेठे, कमल देसाई, विभावरी शिरूरकर, कविता महाजन, तसेच काही ग्रामीण व दलित लेखिका आहेत. समाजाच्या जडणघडणीत व आधुनिकतेमुळे परिवर्तन होऊ लागले. यासाठी आधुनिकतेचे मूळ पाश्चात परंपरा जाणून घेणे आवश्यक आहे. आधुनिकतेचे पाश्चात्त्य परंपरा, आणि रूढी यांच्या विरोधात निर्माण केलेल्या गोष्टी म्हणजे आधुनिकता होईल. ही एक प्रणाली जरी असली तरी यात वर्तमान काळातील नव्या प्रतिमा, नव्या गोष्टी, वस्तू, विचारप्रणाली, संकल्पना, प्रतीक, व्यवस्था, वर्तनबद्ध मुल्ये इत्यादीचा विचार केला जात असतो. वैज्ञानिक दृष्टिकोनाने ईश्वर ही शक्ती नाकारले जाते. प्रत्येक गोष्टीच्या घटनेच्या मागे एक निर्णय अनुभवावर द्यावा हा विचार पुढे येतो. अशा अनेक संकल्पनांच्या आधारे समाजाचा अभ्यास करणे अधिक अनपेक्षित आहे. साहित्यातील आधुनिकता हे वास्तवतेच्या विरोधात उद्याच आल्याचे जाणून घेता येतो. जगाला हादरवून सोडणाऱ्या अनेक देशांनी संस्कृती, स्त्रीच्या दृष्टीने नवऱ्याच्या विरोधात बंड फुकाराने म्हणजेच आधुनिकता नव्हे तसेच मुलींनी शर्ट पॅन्ट घालणे. मुलांसारखे हेअर कट करणे गाड्यावरून फिरणे यामधून आधुनिकता आपल्याला दिसून येत नाही .

आधुनिकतेची भारतीय परंपरा :

आपल्या भारतीय परंपरेत जर आधुनिकतेची बीजे शोधण्याचा प्रयत्न केला तर आपल्याला इ.स.पूर्व सहाव्या शतकापर्यंत मागे जावे लागते. खऱ्या अर्थाने स्त्रीला निर्मितीचा अवकाश उपलब्ध करून देण्याचे श्रेय तथागत भगवान बुद्धांकडेच जाते. बौद्ध धर्माचे संस्थापक असलेल्या गौतम बुद्धांनी स्त्रियांना सर्वप्रथम निर्वानाची संधी उपलब्ध करून दिली आणि त्यांना स्त्रीमुक्तीच्या संदर्भात पहिले क्रांतिकारी पाऊल उचलले असे आपल्याला दिसून येते. जणू काही इतके दिवस कोंडून राहिलेल्या स्त्रियांच्या भावनांना नवे कोंब फुटलेले जाणवते. या स्त्रियांना भिक्षुनी म्हणून प्रवेश मिळू लागला. त्यामुळेच गृहस्थाश्रमाच्या चौकटीच्या पलीकडील त्या स्त्रियांचे आत्मभान जागे झाले आणि जागृत झाल्यामुळे त्या स्त्रिया पुढे समाजात वावरु लागल्या. बौद्ध धम्मात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्वतंत्र, समता, आत्मविश्वास ही मानवी जीवनमुल्ये प्राप्त झाल्याचे दिसून येते. अशा अनेक प्रकारच्या स्त्रीमुक्तीचे बीजे रोवली गेल्याचे दिसून येते. मध्ययुगीन कालखंडात तर महानुभाव संप्रदायाने स्त्रियांना अध्यात्मिक मार्गात आपल्या शिष्य परिवारात सहभागी करून घेतल्याचे निदर्शनास येते. त्या पंताने स्त्रियांना भक्ती मार्ग खुला करून दिल्याने, पुढे अनेक स्त्री संत वाङःमयाच्या कामगिरीतून स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर प्रगट झाल्याचे दिसते. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री उदारनिर्वाहासाठी घराबाहेर जाऊन अर्थार्जन करू लागली. त्यात पाश्चात्त्यांकडून आलेल्या विचारसरणीचा प्रभाव समाजसुधारकांनी जागृत केलेल्या विचाराने तिचे आत्मभान अधिकच जागृत करून ठेवले. यामुळे स्त्रियांवरील विचारधारा त्यांच्या प्रकाशाने पुढे आल्या. स्वातंत्र्योत्तर कालखंडातही स्त्रियांची शोषितव्यवस्था, वंचिताव्यवस्था, अत्याचाराने होणारे दमण पुढे आल्याचे दिसून येते. अशाप्रकारे भारतात स्त्रीविषयक अवनतीची, अवमुल्यांची जाणीव निर्माण होण्यास सुरुवात झाली. यातूनच स्त्री अवमुल्यांची जाणीव होऊन बाई पण सोडून माणूसपण मिळवण्यासाठी लढणे म्हणजे स्त्रीवादाचा अंगीकार पुढे आलेला दिसून येतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वैदिक संस्कृतीची मिळतीजुळती भूमिका घेणाऱ्या हिंदू संस्कृतीच्या त्याग करून समता, बंधुता व विज्ञानवादी असलेल्या बुद्ध धम्माची दीक्षा घेतली. भारतीय संस्कृती त्यामुळे मोठ्या प्रमाणात पुरोगामीत्वाकडे झुकली. भारताच्या नव्या संस्कृती, न्याय, स्वातंत्र, समता, बंधुत्व, मानवता, विज्ञानवाद अशा अनेक गोष्टींना वाढते महत्व दिले जाऊ लागले. या नव्या संस्कृतीच्या निर्मितीस भारतातील सामाजिक सुधारणा चळवळी, भारतीयांच्या ब्रिटिशाविरोधी लढा व भारतातील लोकशाही संविधानांची प्रस्थापना या तीन गोष्टी प्रामुख्याने कारणीभूत ठरली आहे. भारतातील सामाजिक सुधारणा चळवळीचे अग्रदूत राजा राम मोहन रॉय यांनी सती प्रथेवर बंदी आणण्यासाठी मोठे प्रयत्न केले. इंग्रज अधिकारी विल्यम बेंटिंक यांनी 1829 मध्ये सतीबंदीचा कायदा केल्यामुळे देशातील सर्वच नकारात्मक प्रथा व परंपरा कायद्याच्या बळाचा आधारे नष्ट करण्यात आल्या. या काळात देशातील सर्वच नकारात्मक प्रथा परंपरा कायद्याच्या चौकटीत राहून नष्ट कराव्यात असे मत राजाराम मोहन रॉय यांच्यासारख्या विचारवंताने ठामपणे व्यक्त केले आहे. स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, यांनी बुद्धाचे मोठे कौतुक केले, पण हिंदू धर्मालाच पसंती दिली. ते हिंदू राहिल्यामुळे त्यांचे काही विचार हिंदू समाजाने स्वीकारले असल्याचे आपल्याला ह्या संस्कृतीमधून दिसून येते. म्हणून संस्कृतीत भारतीय इतिहासाचे महत्व प्रधान असल्याचे दिसते.

जागतिकीकरणाने आलेली आधुनिकता :=

जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण यामुळे काही बाबतीत आधुनिकता आलेली असली तरी सर्व स्तरातील समाजाचे प्रश्नही काही प्रमाणात वाढलेले असल्याचे दिसून येते. वाढती जीवघेणी स्पर्धा, विस्थापितांचे प्रश्न यामुळे समाजाच्या दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे. प्रसारमाध्यमांमध्ये वाढ होऊन मार्केटिंग चांगले व्हावे

यासाठी समाजाचा दृष्टिकोन वेगळ्या अंगाने बघतो आहे. त्यामध्ये उत्पादनाच्या जाहिरातीचा समावेश केला जातो. खरंतर आधुनिकतेच्या मुळाशी जाऊन समजून घेणे आवश्यक आहे. जागतिकीकरण म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेचे जगाच्या अर्थव्यवस्थेबरोबर एकत्रीकरण करणे होय. २० व्या शतकाच्या शब्दकोशानुसार जागतिकीकरण म्हणजे जगभर पसरणे, एकाच वेळी संपूर्ण जगाचा किंवा जगातील सर्व लोकांचा विचार करणे, त्यात व्यापार, विदेशी थेट गुंतवणूक, भांडवल प्रवाह, प्रवास आणि तंत्रज्ञान यांच्या प्रसाराच्या माध्यमाने राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थांसाठी खुले केले जाते.

व्याख्या :

दिपक नायर : यांच्या मते " देशांच्या राजकीय सीमांमध्ये आर्थिक क्रियांचा विस्तार करणे म्हणजेच जागतिकीकरण होय."

डॉ. यशवंत मनोहर: यांच्या मते " जागतिकीकरण म्हणजे जगातील वेगवेगळ्या देशांनी परस्पर व्यापार करणे होय". बायलिस आणि स्मिथ : "जगाच्या विविध भौगोलिक क्षेत्रात राहणा-या लोकांमध्ये वाढते सामाजिक, आर्थिक, औद्योगिक व्यापारी, सांस्कृतिक संबंध दर्शविणारी व्यापक प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय."

साम्राज्यवादी आणि व्यापार यांनी पसरवलेले जाळे, जागतिकीकरणासाठी सर्वात प्राचीन सांस्कृतिक धर्म महत्त्वाचे होते. ख्रिश्चन धर्म, बौध्द धर्म, इस्लाम धर्म आणि अलीकडेच मार्मोनिझम सारखे संप्रदाय हे अश्या धर्मापैकी आहेत. जागतिकीकरण ही प्रामुख्याने सामाजिक आणि सांस्कृतिक पैलूशी निगडीत परस्पर संवाद आणि एकीकरणाची आर्थिक प्रक्रिया आहे. तथापि विवाद आणि आंतरराष्ट्रीय मुत्सद्दीपणा हे जागतिकीकरण आणि आधुनिक जागतिकीकरणाच्या इतिहासाचे मोठे भाग आहेत. सांस्कृतिक जागतिकीकरण म्हणजे जगभरातील कल्पना, अर्थ आणि मुल्ये अश्याप्रकारे प्रसारित करणे ज्यायोगे सामाजिक संबंध वाढविणे आणि तीव्र करणे. ही प्रक्रियासंस्कृतीचे अभिसरण व्यक्तींना राष्ट्रीय आणि प्रादेशिक सीमा ओलाडणाऱ्या विस्तारित सामाजिक संबंधामध्ये भाग घेण्यास सक्षम करते. अशा सामाजिक संबंधाची निर्मिती आणि विस्तार हे केवळ भौतिक पातळीवरच दिसून येत नाही. तर सांस्कृतिक जागतिकीकरणामध्ये सामायिक मानदंड आणि ज्ञान तयार करणे समाविष्ट आहे. यासह लोक त्यांच्या वैयक्तिक आणि सामुहिक सांस्कृतिक ओळख संबंध करतात. ही विविध लोकसंख्या आणि संस्कृतीमंध्ये वाढते परस्पर संबंध जाणवते. सांस्कृतिक प्रसार म्हणजे सांस्कृतिक वस्तूंचा प्रसार करणे जसे की कल्पना, शैली, धर्म, तंत्रज्ञान, भाषा इत्यादी सांस्कृतिक जागतिकीकरणामुळे परस्पर सांस्कृतिक संपर्क वाढला आहे. परंतु एकेकाळी विलग झालेल्या समुदायांच्या विशिष्टतेत घट होऊ शकते. आधुनिकतेच्या प्रभावाच्या तुलनेत जागतिकीकरणाचे योगदान त्यांच्या परंपरेपासून दूर जाण्यासाठी माफक असू शकते. सांस्कृतिक प्रसार एक एकसंध शक्ती तयार करू शकतो, जेथे जागतिकीकरण हे बाजार, संस्कृती, राजकारण आणि साम्राज्यवादी देशांच्या प्रभावक्षेत्राद्वारे आधुनिकीकरणाच्या इच्छेच्या जोडणीद्वारे एकसंध शक्तीचे समानार्थी म्हणून पाहिले जाते.

आधुनिकतेच्या प्रक्रियेत विकासाच्या पायऱ्या :=

१. शिक्षण आणि ज्ञान-विज्ञानाचा प्रसार : इंग्रजी शिक्षणामुळे आधुनिक विज्ञान, गणित, समाजशात्र, राज्यशात्र यांचे आकलन वाढले. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने प्राथमिक ते उच्च शिक्षण क्षेत्रात मोठी गुंतवणूक केली. IITs, IIMs, AIIMS सारख्या संस्था स्थापन झाल्या.

२. औद्योगीकरण आणि तंत्रज्ञानाचा विकास : स्वातंत्र्यानंतर पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून औद्योगिक विकास सुरू झाला. 1991 मध्ये भारताने LPG (Liberalization, Privatization, Globalization) धोरण स्वीकारले. IT क्षेत्रात भारताने आघाडी घेतली. आज भारत हे एक जागतिक तंत्रज्ञान केंद्र बनले आहे.

३. स्त्रियांमध्ये जागरूकता व समानतेची लाट : आधुनिक शिक्षणामुळे स्त्रिया वैद्यक, अभियांत्रिकी, विज्ञान, लष्कर, प्रशासन या क्षेत्रात पुढे आल्या. स्त्री स्वावलंबन, स्त्री सबलीकरण स्त्री उद्दोजकता या चळवळीना चालना मिळाली.

४. कला, संगीत आणि साहित्यातील नव्या धारा : पारंपरिक भारतीय कलांच्या जोडीला आधुनिक चित्रकला, साहित्यप्रकार (उदा. आधुनिक कविता, लघुकथा, समांतर साहित्य) इत्यादी संगीत प्रकार आले. चित्रपटसृष्टीत सामाजिक प्रश्न, वास्तवादी कहाण्या, जागतिक मानांकन मिळविणारे चित्रपट निर्माण झाले.

वैशिष्ट्ये :

भारताच्या सांस्कृतिक इतिहासाची वाटचालीचा आढावा घेतला असता त्यांच्या प्रमुख वैशिष्ट्ये दिसून येतात .

१. अखंडित परंपरा दिसून येते.

२. राजकीय व धार्मिक स्वतःच्या केंद्रीकरणाचा अभाव असल्याचे जाणवतो.

३. संस्कृती संघर्ष काढून संस्कृती संगम करण्याची प्रवृत्ती भारतीय संस्कृती विश्व कोर्स खंडात पाहायला मिळते. भारतीय संस्कृतीला स्वतंत्र अशी वेगळी वैशिष्ट्ये आणि परंपरा लाभलेली आहे.

४. आधुनिकता ही एक विचारधारा आहे. आधुनिकता पेहरावात, जगण्याच्या पद्धतीत नव्हे तर विचारात असायला हवी. समान पातळीवर विचार करणे परस्परांचा आदर राखणे, परस्परांच्या स्वातंत्र्याचीही जाणीव करणे हे आधुनिकतेच्या दृष्टीने अपेक्षित आहे.

५. आधुनिक संस्कृतीचा भारतीय जीवनाच्या अनुष्ठांनावर प्रभाव पडत नाही.

६. भारतात जागोजाग वेगवेगळे लोक, धर्म, वातावरण, भाषा, चालीरीती आणि परंपरा यात वैविध्य दिसत असूनही आढळणारे साम्य हे या देशाचे वैशिष्ट्य मानले जाते.

७. प्रत्येक काळातील संस्कृतीची विशिष्ट अशी रचना केलेली आहे.

८. भौगोलिक परिस्थिती ही संस्कृतीला वाकवीत असते.

९. साहित्य हे संस्कृतीचे संरक्षण करते. त्याचबरोबर संस्कृतीच्या संवर्धनातही साहित्याचा फार मोठा सहभाग झाल्याचे जाणवते.

१०.प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत भारतीय संस्कृती प्रचलित असल्याचे दिसून येते.

संदर्भसूची :

१. भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, महर्षी वी. रा. शिंदे

२. साहित्याचे ईहवादी सौंदर्यशास्त्र, यशवंत मनोहर

३. रामायणातील संस्कृती संघर्ष, अरुण कांबळे, समता प्रकाशन नागपूर, १९८२.

४. शूद्र पूर्वी कोण होते ? डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

५. हिंदूधर्म, स्वामी विवेकानंद, रामकृष्ण मठ, नागपूर.

६. बुद्ध आणि त्यांचा धम्म, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, समता प्रकाशन, नागपूर.

७. भारतीय संविधान, मूळ प्रत, भारत सरकार.

८. आधुनिक कादंबरी आणि मराठी लेखिका, साळवे, शशिकांत, स्वरूप, औरंगाबाद,२०१४.

भारतीय लोकशाहीतील निवडणूक प्रक्रियेतील धनशक्ती व जातीय समीकरणे

संजू देवराव तोडासे

प्राथमिक शिक्षक. जि प प्राथमीक शाळा, लालमुडा तालुका कोरपणा जिल्हा चंद्रपूर

सारांश

भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी, विविधतेने नटलेली आणि समावेशक लोकशाही म्हणून ओळखली जाते. संविधानात प्रत्येक नागरिकाला समान अधिकार समान मताधिकार आणि समान संधी देण्यात आली असली तरी प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेवर परिणाम करणारे अनेक घटक असतात. त्यामध्ये धनशक्ती आणि जातीय समीकरणे हे दोन प्रभावी घटक म्हणून समोर येतात.

प्रस्तावना

निवडणुकीच्या मैदानात विचारसरणी, विकासाचा अजेंडा, नेतृत्वाचे गुणवता यापेक्षा जास्त प्रभाव टाकणारे हे अदृश्य पण कठोर स्वरूपाचे घटक भारतीय राजकारणाच्या दिशा आणि ध्येयावर खोलवर परिणाम करतात. आजही अनेक ठिकाणी उमेदवाराच्या विचारापेक्षा त्यांच्याकडे असलेल्या आर्थिक सामर्थ्य अधिक महत्वाचे ठरते. समाज रचने त खोलवर रुजलेली जातीयता मतदानाच्या राजकीय निर्णयावर निर्णय पद्धतीने प्रभाव टाकते. त्यामुळे भारतीय लोकशाही तिच्या मूळ मूल्यापासून काही अशी दूर जाताना दिसते. या लेखामध्ये आपण भारतीय निवडणूक व्यवस्थेतील धनशक्तीचे वाढते महत्त्व, त्याला मिळणारा वैचारिक आणि सामाजिक आधार, जातीय समीकरणाते सूक्ष्म राजकारण, त्याचा मतदार व उमेदवार यावर होणारा परिणाम तसेच या समस्या कमी करण्यासाठी लागणारी उपाय यांचा सखोल आळावा घेऊया.

1) निवडणूक व राजकीय निधी.

अ) राजकीय निधी/धनशक्ती म्हणजे काय?

राजकीय पक्ष किंवा उमेदवारांनी प्रचार रॅली, पत्रकार परिषठ पोस्टर, बेंत्रर, झेंड्याची खरेदी, कार्यकर्त्याची वाहतूक, निवडणूक कार्यालय, वाहने, माध्यमातून जाहिराती, सोशल मीडिया प्रचार, कामगार, मतदारांशी संवाद यासारख्या उपक्रमासाठी लागणारा पैसा.

ब) काही वेळा हा पैसा फक्त कायदेशीर मार्गाने जमा होतो. परंतु काळा पैसा अधिकृत देणग्या, ओघोषित निधी, हे देखील मोठ्या प्रमाणात वापरले जाते. का लागतोय इतका पैसा भारतात निवडणुकीत्ते प्रमाण खूप मोठे आहे. लोकसभा स्थानिक स्वराज्य संस्था पासून ते विधानसभा पर्यंत त्यामुळे प्रचार मतदारापर्यंत पोचविणे, मतदान केंद्र तयार करणे, प्रशासन, सुरक्षा यांचा खर्च मोठा येतो.

क) मतदार संख्या व भौगोलिक पसराव असे असल्याने प्रचार व संपर्क व्यवस्थेसाठी आर्थिक संसाधनाची आवश्यकता वाढते. विशेषता ग्रामीण व दुर्गम भाग यासाठी मीडिया जाहिरात, डिजिटल प्रचार, सोशल मीडिया या नव्या माध्यमाचा प्रादुर्भाव वाढत्याने प्रचार अधिक व्यवस्थित झाला आहे.

उदाहरण

निवडणुकीचा वास्तविक खर्च 1952 साली पहिल्या लोकसभा निवडणुकीत देशात अंदाजे 17.30 कोटी मतदार होते आणि निवडणूक आयोगाच्या खर्वानुसार 10.40 लाख इतका खर्च झाला होता.2014 व्या लोकसभा त्याकाळी मतदारासाठी प्रति मतदार खर्च केवल काही पैशावे मात्र निवडणुकीसाठी केवळ आयोगाचा खर्च 3870 कोटी रुपये होता. 2024 मध्ये एका अहवालानुसार विविध पक्ष व उमेदवारांनी प्रतारासाठी सुमारे 3861.51 कोटी रुपये सार्च केले होते. पण वास्तविक सर्व पक्ष व उमेदवाराचा खर्च आणि अनधिकृत खर्च लक्षात घेतल्यानंतर निवडणुका भारतात जगातील सर्वात महाग लोकशाही बजत आहे.

धनशक्ती फायदे, धोके आणि नियम व वास्तव यामधील अंतर

अ) राजकीय पक्ष आणि संस्थात्मक क्षमता, धनशक्तीमुळे राजकीय पक्षांना देशभर प्रचार करता येतो. कर्मचारी, प्रचारक ठेवता येतात. सामाजिक बैठका रॅली शो आयोजित करता माध्यमावर प्रभावी जाहिरात करता येते. धनशक्तीमुळे उद्भवणारे धोके

आ) असमान संधी- पैसा असलेल्या उमेदवारांना प्रचारासाती, संपर्कासाठी, प्रसारासाठी अधिक संधी मिलते. यामुळे सामान्य किंवा आर्थिक दृष्ट्या दुर्बल पण सक्षम उमेदवाराचा प्रवेश अवघड असतो.

इ) भ्रष्टाचार व प्रभावित मतदान. पैसा मतदानावर गतदासच्या गजावर, मतदारांमध्ये प्रभाव निर्माण करण्यासाठी वापरला जातो. व्यक्तिगत भेटवस्तू यात्रा, सुविधा, आर्थिक प्रलोभण, अशा पद्धतीने ही लोकशाहीच्या तत्वाला बाधक ठरतात.

ई) नियंत्रण व पारदर्शकतेचा खर्चाचा लेखाजोखा निधीवे स्त्रोत, अनाधिकृत निधी यांचे विवरण किंवा तपास कमी होत असतो. पारदर्शकता का कमी आहे? काही पक्ष व उमेदवार खर्चाचे विवरण वेळेवर सादर करीत नाही. इलेक्ट्रॉल बॉन्य यासारख्या साधनांमुळे दान/निधीचे स्त्रोत गुप्त राहतात. त्यामुळे बाहानिधी व मोठ्या आर्थिक गटाचे दस्तक्षेप शक्य होतात.

2) जातीय व सामाजिक समीकरणे,

अ) भारतीय समाज रचना आणि राजकीय ओळख

भारतात समाज जीवनात जात, धर्म, भाषा, भाषिक समुदाय, उपजात, आर्थिक स्थिती, स्थानिक ओळख असे अनेक घटक आहे. निवडणुकीत हे सर्व घटक ओळखीचे आधार अनेक मतदार सामाजिक ओळखीमुळे उमेदवार व पक्ष निवडतात. जातीय राजकारणाचा उदय इतिहास आणि स्वातंत्र्यानंतर पहिल्या काही दशकात जातीय मुहा प्रधान नव्हता. अशा उमेदवारांना विकास विचार, आक्रमक राजकीय स्पर्धा यावर जोर होता. पण काळाबरोबर सामाजिक न्याय, आरक्षण, जात आधारित, आरोग्य शिक्षण, आर्थिकभेदभाव, जातीचे स्वतःची ओळख, या विषयावर प्रश्न वाढले. त्यामुळे जातीच्या आधार घेऊन राजकारण वाढले.

ब) 1980-90 नंतर विशेषता मंडल आयोगाच्या शिफारसी नंतर ओबीसी अल्पसंख्यांक, या समाजातील जागरूकता वाढली. त्यामुळे जातीय राजकारण अधिक सक्रिय झाले.

मागासवर्ग, दलित, जातीय समीकरणाचे उपयोग

1) राजकीय पक्ष उमेदवार ठरवताना त्या मतदार संघाची सामाजिक रचना अल्पसंख्याक, स्थानिक ओळख यांचा विचार करतात. म्हणजेच जात प्रभाव, यांचा विचार केला जातो. -जात संख्या, समुदाय, समुताय, संख्याबळ, स्थानिक
2) मतदारांना भावनिक व सामाजिक ओळख म्हणून मतदान करण्याची प्रवृत्ती.
3) एखादा जनसमुदाय, समाज, किंवा गट जर जास्त बहुसंख्यांक असेल तर त्याचा आवाज व त्याची ओळख राजकीय समावेशासाठी महत्त्वाची ठरते.
4) जागरूक वर्ग, कामगार, दलित, अल्पसंख्यांक समाज, हा समुदाय जर संघटित झाला तर राजकारणात प्रभाव वाढतो.

धनशक्ती विरुद्ध जातीय समीकरणे.. निवडणुकीचे वास्तव.

आर्थिक दृष्ट्या मजबूत जातीय समाज किंवा समुदाय पैसा, सामाजिक, राजकीय समर्थ, समाजातून उमेदवार पुढे येतात

2) या समाजाच्या मतदार संघात जाती आर्थिक शक्ती, संघटन असे तियांचे मिश्रण त्यामुळे त्यांचा प्रभाव मजबूत होतो.

3) राजकीय पक्ष अभा गटांना लक्षात घेऊन निधी आणि पक्षीय संसाधने त्या गटामध्ये समाविष्ट करतात परिणाम **जे लोक गरीब, अल्पसंख्यांक, आर्थिक दृष्ट्या दुर्बल आहेत त्याचा आवाज कमी होतो.**

अ) पैसा नसेल किंवा समाजात संघटना ओळख नसेल तर त्याचा आवाजाला कमी जागा असते

ब) विचारधारा, कामगिरी, गुण, विकास या मुद्द्यापेक्षा पैसा, जातीय ओळख हे निवडणुकीत निर्णायक ठरते.

क) त्यामुळे विकास मुख्खी, समाज निरपेक्ष, राजकारण नव्हे नेतृत्व यांना संधी कमी मिळते.

ड) राजकीय पक्षाचे तिकीट वाटप पैसा व जातीय समीकरणाचा संगम.

1) कोणत्या गटातील उमेदवार द्यायचा, कोणत्या प्रदेशात प्रचार किती करायचा कोणत्या माध्यमात लक्ष द्यायचे हे सर्व निर्णय करताना पैसा, जातीय ओळख, समाज स्वना याचा विचार केला जातो.

2) त्यामुळे राजकीय निवडणुकीची पद्धत आणि प्रक्रिया-सामाजिक बांधिलकी व आर्थिक शक्ती यांच्या हस्तक्षेपाखाली असते

निवडणूक व्यवस्थेतील नियम मर्यादा आणि वास्तव्य

कायद्याने खर्च मर्यादा प्रत्येक उमेदवारासाठी निवडणुकीदरम्यान खर्चाची कायदेशीर मर्यादा ठेवण्यात आलेली उमेदवारांना स्वतंत्र बैंक खाते उघडावे लागते खर्चाचा लेखा ठेवणे, अनिवार्य आणि प्रत्येक खर्च नोंदवावा लागतो. पक्षांना देखील निधी जमा, खर्च विवरण, देणग्याचे स्त्रोत, अधोरेखित करण्याची जबाबदारी आहे. तरी का होत नाही वास्तविक नियंत्रण. अनेकदा ही मर्यादा किंवा नियम फक्त कागदावरच असते प्रत्यक्षात उल्लंघन हो काही पक्ष किंवा उमेदवार खर्च विवरण देत नाही किंवा विलंब करतात. अनेक वेळा तपासणी देखील होत नाही इलेक्ट्रॉन बॉन्स यासारखे यंत्रणा व राजनीतिक निधीचे स्त्रोत गुप्त राहतात. त्यामुळे खऱ्या निधीचा मागवा ठेवणे कठीण होते.

जातीय राजकारण फायदे तोटे आणि समाजावर परिणाम

अ) समाजाचा भागीदारी व ओळख..

जातीय समुदाय आधारित राजकारणामुळे अल्पसंख्यांक महत्त्वहीन किंवा दुर्लक्षित मटाचे प्रतिनिधित्व समाजात होते. जसे दलित, मागासवर्ग, अल्पसंख्यांक समूह, त्यामुळे समाजांना राजकीय महत्व मिळतं स्थानिक समस्या, समाजाचे प्रश्न, समुदायाचे हित यांना राजकीय आराखड्यात स्थान मिळतो. समाजात सहभाग वाढतो.

दुष्परिणाम ध्रुवीकरण समाजाने जातीय ओळखीवर आधारित मत देणे त्यामुळे समाजात विभाजन वाढू शकते. विकासाऐवजी जातीय राजकारण ओळख, प्रतिष्ठा, जातीय आरक्षण, समुदाय विरोधातील तेढ यावर लक्ष जास्त विकास पायाभूत सुविधा सार्वजनिक धोरणे याचा मागोवा. नवे नेतृत्व नियत नाही. ज्यांना संसाधन किवा सामर्थ्य नसेल, त्यांना संधी कमी, ज्याचा धबधबा आहे अशांना संधी

एकीकडे भारताचे संविधान, कायदे निधी नियंत्रण खर्च मर्याता मतदानाचा स्वातंत्र्य यावर भर देतो. पण प्रत्यक्षात पैसा, जातीय ओळख, म्हणजे राजकीय सता मिळवण्याच्या मुख्यमार्क बनले आहे. हे विरोधाभास लोकशाहीच्या तत्वांना धक्का देतात. मतदाराच्या स्वातंत्र विचार पारदर्शक मतदान, निपक्ष स्पर्धा या तत्त्वाचा अवमूल्यन होतो

तंत्रज्ञान, निगराणी व अंमलबजावणी.

खतं च निधीचा डिजिटल रेकॉर्ड पारदर्शकता वितीय तपासून निबंध, भंग, करणाऱ्यासाठी कड़क दंड,उमेटतारी अहर्ता पासून वंचित ठेवणे. नामरिकांनी सक्रियपणे निधी खर्च तपासणे.

निष्कर्ष

१. भारतीय लोकशाही इतिहास विविधता सामाजिक समावेश, जनमत, हा सर्वाचा संगम आहे. मात्र जर राजकीय प्रक्रियेतील पैसा, जातीय ओळख, हे अनियंत्रित वर्चस्व प्राप्त करीत राहिले.

२. लोकशाहीचे मूळ तत्व--समानता, प्रामाणिक स्पधां, सामाजिक न्याय, जनप्रतिनिधी तो धोक्यात येते. आपल्या देशाला खरी आणि समृद्ध लोकशाही हवी असेल तर राजकीय निधी व खर्च यांती पारदर्शकता

३. सर्व समाजांना राजकीय संधी. मतदारांना जागरूकता. सामाजिक न्याय समान संधी. विकास व कामगिरीवर आधारित राजकारण, हे अंतिम ध्येय असले पाहिजे.

४. या बदलासाठी राजकीय पक्ष, शासन सामान्य नागरिक, सर्वांना संधी दिली पाहिजे. जर आपण हे करू शकलो तर भारताची लोकशाही फक्त नावापुरती नसून वास्तव्यात समावेशक, शक्तिशाली होईल.

संदर्भ ग्रंथ सूची

१. शिंदे सुनील, भालेराव सुरेश जून २०१३ महाराष्ट्र शासन आणि राजकारण, एज्युकेशन पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

२. दिवाण मोहन, ठेवदार जयंत, दिवाण विवेक डिसेंबर २००४ भारतातील राज्याचे राजकारण विद्या प्रकाशन महाल नागपूर.

३. फाडिया बि. एल. २००६ राजनीती विज्ञान, प्रतीयोगिता साहित्य शिरीज, साहित्य भवन पब्लिकेशन्स आग्रा.

"शासकीय आरोग्य सेवा योजनांचा रुग्णांच्या समाधान पातळीवर होणार परिणाम, विशेष संदर्भ- पुणे महानगरपालिका, पुणे"

राजेंद्र उत्तमराव डोके

संशोधक विद्यार्थी, प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, पुणे

डॉ. अर्चना जयंत माळी

मार्गदर्शक, प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, पुणे

सारांश-

प्रत्येक व्यक्तीला प्रगती करण्यासाठी शारीरिक स्वास्थ्य निरोगी असणे महत्त्वाचे असते. शिक्षणाबरोबरच स्वतःच्या वैयक्तिक विकासासाठी आरोग्य हे निरोगी असले पाहिजे, असे स्वामी विवेकानंदांनी म्हटले आहे. निरोगी आरोग्याचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. आरोग्य चांगले असल्यास त्या व्यक्तीचा, कुटुंबाचा तसेच समाजाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. निरोगी आरोग्य व आरोग्य संपन्न सामाजिक जीवन जगणे हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत हक्क आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला आरोग्य संपन्न जीवन जगण्यासाठी योग्य परिस्थितीची निर्मिती करणे ही त्या समाजासाठीची सरकारची जबाबदारी आहे. "सर्वांसाठी आरोग्य" किंवा "आरोग्य एक मूलभूत अधिकार" या संकल्पनेचा स्वीकार बहुसंख्य राष्ट्रांनी केला असून भारत देशही त्याला अपवाद नाही. भारतीय संविधानात देखील लोकांचे पोषण व राहणीमान वाढविणे तसेच लोकांचे आरोग्य सुधारणे ही राज्यांची मूळ जबाबदारी आहे असे म्हटले आहे.

प्रस्तुत अभ्यासांतर्गत वरील विषयाला अनुसरून "शासकीय आरोग्य सेवा योजनांचा रुग्णांच्या समाधान पातळीवर होणार परिणाम, विशेष संदर्भ- पुणे महानगरपालिका, पुणे." याचा अभ्यास करण्यात आला आहे. पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य सेवांमध्ये- आरोग्य विभाग व रुग्णालयांमार्फत कोणत्या आरोग्य सेवा पुरविल्या जातात? त्या सर्वसामान्यांना परवडणाऱ्या आहेत का? त्या आरोग्य सेवा गुणवत्तापूर्ण आहेत का? व त्या आरोग्य सेवांबाबत सर्वसामान्य समाजातील व्यक्ती (रुग्ण) समाधानी आहेत का? या सर्वांचा आढावा या अभ्यासातून घेतला गेला आहे.

प्रस्तावना-

नागरी आणि ग्रामीण जीवनपद्धतींमध्ये फरक असल्यामुळे नागरी आरोग्याच्या दृष्टीने काही गोष्टींकडे विशेष लक्ष पुरवावे लागते. नगरांची वाढ फार झपाट्याने होत असल्यामुळे काही कठीण समस्यांना तोंड द्यावे लागते. उदा. वाढत्या शहरांतून उत्पन्न होणाऱ्या झोपडपट्ट्या व त्यांपासून जनतेच्या आरोग्याला असणारा धोका. अशा झोपडपट्ट्या नाहीशा करणे शक्य नसल्यास त्यांना निदान किमान सुखसोई पुरविणे जरूरीचे असते. पाणी, शौचालये, उजेड वगैरे गोष्टी झोपडपट्ट्यांमध्ये उपलब्ध करून सार्वजनिक आरोग्याला असणारा धोका शक्य तेवढा कमी करण्याचा प्रयत्न करणे हे महानगरपालिकांचे कर्तव्य आहे. शिवाय सार्वजनिक शौचालये योग्य अंतरावर बांधून ते स्वच्छ ठेवणे, लोकांच्या मनोरंजनासाठी मोकळी मैदाने, बागा, वस्तुसंग्रहालये बांधणे या गोष्टीही नगरांमध्ये अत्यावश्यक असतात. सार्वजनिक कसाईखाने बांधून तेथे मारली जाणारी जनावरे रोगग्रस्त नाहीत अशी खात्री करण्यासाठी विशेष यंत्रणा ठेवावी लागते. सांसर्गिक रोग असलेल्या प्रदेशांतून येणाऱ्या प्रवाशांमुळे ते रोग नगरात फैलावू नयेत म्हणून विलग्नवासाची (क्वारंटाइनची) सोय करणे, लहान लहान उद्योगधंदे उदा. पिठाच्या गिरण्या, स्फोटक पदार्थ तयार करणारे कारखाने, विजेवर चालणारे कारखाने वगैरेसारख्या उद्योगांसाठी परवाना पद्धत घालून देऊन त्यांपासून सार्वजनिक आरोग्याला अपाय होणार नाही अशी तजवीज करणे वगैरे अनेक जबाबदाऱ्या नगरपालिकांवर कायद्याने घातल्या असून त्या पार पाडण्यासाठी त्यांना खास अधिकारही देण्यात आलेले असतात. व हा सर्व आरोग्य विभाग्याच्या अखत्यारीतील भाग आहे, की ज्याचा प्रत्यक्ष संबंध रुग्णांशी येतो. याचकरिता सदर

संशोधनातून "शासकीय आरोग्य सेवा योजनांचा रुग्णांच्या समाधान पातळीवर होणार परिणाम, विशेष संदर्भ- पुणे महानगरपालिका, पुणे." या विषयाचा संशोधनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

पुणे महानगरपालिकेमार्फत राबविल्या जाणाऱ्या शासकीय आरोग्य सेवा योजना-

१. पंडित दिनदयाळ उपाध्याय अपघात विमा योजना-

निवासी मिळकतकर धारक व त्यांचे कुटुंब तसेच गवनि सेवा शुल्क भरणारे नागरिक व त्यांचे कुटुंब यांच्यासाठी रु.५ लाखाचे अपघाती विमा संरक्षण. पुणे महानगरपालिका हद्दीत राहणाऱ्या व निवासी मिळकतकर धारक तसेच गवनि सेवा शुल्क भरणाऱ्या नागरिकांसाठी व त्यांच्या कटुंबासाठी पुणे महानगरपालिकेने ही अपघाती विमा योजना लागू केली असून अपघाताने मृत्यू तसेच अंशत:/कायमस्वरूपी अपंगत्व आणि अपघातामुळे होणारा १ लाख रुपयापर्यंतचा दवाखान्याचा खर्च इन्शुरन्स कंपनी कडून या योजनेत मिळणार आहे.

२. वैद्यकीय लसीकरण सेवा-

ऑक्टोबर १९७७ मध्ये लसीकरणाव्दारे प्रतिबंध करता येणा-या घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात, पोलिओ व क्षयरोग या पाच आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी "विस्तारित लस टोचणी कार्यक्रम (विलटो)" सुरु करण्यात आला. सन १९८५-८६ मध्ये "सार्वत्रिक लसीकरण" कार्यक्रम सुरु करण्यात आला. गोवर लसीचा समावेश सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमामध्ये करण्यात आला.

३. शहरी गरीब योजना / शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजना-

या योजनेअंतर्गत गरीब व गरजू नागरिकांना पुणे महापालिकेच्या दवाखान्यात मोफत उपचार मिळतात. याशिवाय, खासगी दवाखान्यांमध्ये कराव्या लागणाऱ्या आवश्यक त्या उपचाराच्या एकूण खर्चात ५० टक्के सूट मिळते. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांना या योजनेचे सभासदत्व घ्यावे लागते. योजनेचे सभासद झाल्यानंतर पुणे महानगरपालिकेद्वारे एक कार्ड उपलब्ध करुन दिले जाते. या कार्डावर लाभार्थ्याला पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाशी संलग्न खासगी दवाखान्यांमध्ये स्वस्त दरात उपचार मिळतात. महापालिकेच्या दवाखान्यातून आवश्यक औषधेदेखील मोफत उपलब्ध होतात.

४. जन्ममृत्यु विभाग-

आरोग्य सेवक, सेविका यांच्याकडून आपल्या भागातील जन्ममृत्यूच्या नोंदणीचे कामे केली जातात. केवळ जन्म-मृत्यू नोंदणीचे नव्हे, तर ठराविक वैधानिक अहवाल पाठविण्याचे काम सुद्धा शहरी व ग्रामीण केंद्रांकडून केले जाते. पुणे महानगरपालिकेने www.pmc.gov.in या संकेतस्थळा मार्फत जन्ममृत्यु प्रमाणपत्र मिळविण्याची सुविधा ऑनलाईन आर.टी.एस. सेवेद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

५. अन्न व परवाना विभाग-

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य अन्न व परवाना विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये व्यवसायांकरीता नविन कायम / हंगामी परवाने देण्यात येतात.

६. अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजना-

पुणे महानगरपालिकेच्या सेवेतील शेडयूलमान्य सेवक तसेच सेवानिवृत्त सेवक, विद्यमान सभासद व माजी सभासद तसेच मनपाच्या पॅनेलवर अंतर्भूत असलेल्या हॉस्पिटल्समधील सेवकांना अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेअंतर्गत औषधोपचारापोटी ९०% सवलतीचा लाभ देण्यात येतो. वैयक्तिक औषधोपचार खर्चापोटी सी.जी.एच.एस. नियमानुसार परतावा अदा करण्यात येतो.

७. प्राणी (कुत्रा) बंदोबस्त विभाग-

१९९३ साली भटक्या कुत्र्यांमुळे रेबिजचा प्रादुर्भाव वाढला आणि भटक्या कुत्र्यांची संख्यादेखील वाढली होती. त्यानंतर, जानेवारी १९९४ पासून नसबंदी (प्राणी जन्म नियंत्रण) हेच सरकारचे अधिकृत धोरण आहे. पुणे महानगरपालिकेच्या श्वानपथकाद्वारे अशा सर्व भटक्या कुत्र्यांची नसबंदी करून कायद्यानुसार ज्या जागेवरुन कुत्र्यांना उचलले आहे तेथेच परत आणून सोडले जाते.

८. साथरोग नियंत्रण कार्यक्रम-

साथरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत गॅस्ट्रो, कॉलरा, अतिसार, काविळ, विषमज्वर, या आजारांचे नियंत्रण केले जाते. साथरोग नियंत्रणासाठी औषधांचा व इतर साहित्यांचा पुरेसा पुरवठा, पिण्याच्या पाण्याची नियमित तपासणी, प्रत्यक्ष सर्वेक्षण इ. मार्फत सर्व साथीच्या आजाराच्या रुग्णांवर तसेच सहवासितांवर उपचार करण्यासाठी सर्व उपचार व्यवस्था सुसज्ज ठेवण्यात येते.

९. पीसीपीएनडीटी विभाग / वैद्यकीय विभाग-

पीसीपीएनडीटी विभाग, बनावट डॉक्टर शोधन आणि कृती समितीद्वारे गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध कायदा) १९९४, दुरुस्ती कायदा २००३ अंतर्गत गर्भधारणेनंतर होणारी लिंगनिदान चाचणी आणि इतर संबंधित आवश्यक प्रसुतीपुर्व चाचण्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी व त्याच्या दुरुपयोगातून होणाऱ्या स्त्रीभ्रूण हत्येला प्रतिबंध घालण्यासाठी गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायदा (पीसीपीएनडीटी) तयार करण्यात आला आहे.

१०. महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना-

महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेचा उद्देश राज्यातील जनतेला गंभीर आजारांवरील उपचारांसाठी पुर्णपणे नि:शुल्क गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधेचा लाभ विशेषज्ञ सेवांतर्गत पॅकेजेससाठी अंगीकृत रुग्णालयांमधून उपलब्ध करून देणे हा आहे. राज्यात सध्या महात्मा फुले जन आरोग्य योजना ही प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसह एकत्रितपणे राबवली जाते. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत लाभार्थी कुटुंबाला प्रति कुटुंब प्रति वर्ष ०५ लाख रुपये पर्यंत विमा संरक्षण व मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ही मर्यादा २.५० लाख रुपये ही नवीन मर्यादा करण्यात आली आहे.

या योजने अंतर्गत लाभ घेण्यासाठी पिवळी शिधापत्रिकाधारक, अंत्योदय अन्न योजना, अन्नपूर्णा योजना व केशरी (रु.१ लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न) शिधापत्रिका धारक कुटुंबातील नागरिक, शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थी, शासकीय महिला आश्रमातील महिला, शासकीय अनाथ आश्रमातील मुले, शासकीय वृद्धाश्रमातील जेष्ठ नागरिक, बांधकाम कामगार व त्यांची कुटुंबे हे सुद्धा योजनेचे लाभार्थी आहेत.

संशोधनाची उद्दिष्टे-

१) शासकीय आरोग्य सेवा योजनांच्या (पुणे महानगरपालिकेच्या) व्यवस्थापन पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
२) शासकीय आरोग्य सेवा योजना गुणवत्तापूर्ण आहेत का? याचा आढावा घेणे.
३) शासकीय आरोग्य सेवा योजनांमधून रुग्ण समाधानी आहेत की नाही हे जाणून घेणे.

संशोधनाची गृहीतके-

१) शासकीय आरोग्य सेवा योजना या गुणवत्तापूर्ण आहेत.
२) शासकीय आरोग्य सेवा योजनांमधून रुग्ण समाधानी आहेत.

संशोधन अभ्यासाचे महत्त्व-

पुणे महानगरपालिकेचा विचार करता पुणे शहर हे १४४ प्रभागांमध्ये विभागलेले आहे. जवळपास ३१ लाख लोकसंख्या असलेल्या या शहरात विविध प्रकल्पांद्वारे आधुनिकीकरणाच्या दृष्टिकोनातून महानगरपालिकेमार्फत सर्वसामान्यांसाठी पुण्याचा विकास घडून आलेला आहे. याच पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याचा देखील विचार होणे आवश्यक आहे व याच कारणामुळे "शासकीय आरोग्य सेवा योजनांचा रुग्णांच्या समाधान पातळीवर होणार परिणाम, विशेष संदर्भ- पुणे महानगरपालिका, पुणे." या विषयाचा संशोधनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

संशोधन पद्धती-

"शासकीय आरोग्य सेवा योजनांचा रुग्णांच्या समाधान पातळीवर होणार परिणाम, विशेष संदर्भ- पुणे महानगरपालिका, पुणे." या विषयाचा संशोधनात्मक अभ्यास करताना, जे रुग्ण आहेत त्यांनी घेतलेल्या सेवांबद्दल त्यांचा दृष्टिकोन सकारात्मक व नकारात्मक असू शकतो, त्यामुळे या संशोधन अभ्यासामध्ये वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

संशोधन अभ्यासाची नमुना निवड पद्धती-

पुणे शहरात, पुणे महानगरपालिकेच्या विविध रुग्णालयांमध्ये अनेक रुग्ण आहेत. त्यातून आरोग्य सेवा योजनांचा लाभ घेतलेल्या रुग्णप्रतिसादकांची निवड करताना, पुणे महानगरपालिकेच्या चार मोठ्या रुग्णालयांची (कमला नेहरू रुग्णालय, डॉ. नायडू हॉस्पिटल, कै. अण्णासाहेब मगर रुग्णालय, स्व. राजीव गांधी रुग्णालय) निवड करून साधा यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने त्यातील प्रत्येकी २५ रुग्ण अशा पद्धतीने १०० रुग्णांची निवड केली गेली आहे.-

संशोधन अभ्यासाची मर्यादा-

१. प्रस्तुत संशोधन हे पुणे महानगरपालिकेच्या विविध सेवा योजनांमधील फक्त आरोग्य सेवेशी निगडित आहे.
२. संशोधनात संशोधकाने काढलेले निष्कर्ष हे पुणे शहरातील पुणे महानगरपालिकेच्या निवडक रुग्णालयांच्या अभ्यासावर अवलंबून आहेत.
३. संशोधनाचा अभ्यास हा निवडलेल्या रुग्णालयातील रुग्णांनी पुरविलेल्या माहितीवर आधारित आहे.

माहिती संकलनाचे स्त्रोत-

या संशोधनामध्ये माहिती संकलनासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोत या पद्धतींचा वापर करण्यात आला आहे-

प्राथमिक स्त्रोत-

संशोधनाच्या सूक्ष्म अभ्यासाकरिता माहिती संकलनासाठी प्रश्नावलीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये ज्या रुग्णांनी शासकीय (पुणे महानगरपालिकेच्या) आरोग्य सेवा योजनांचा लाभ घेतलेला आहे, त्यांची प्रश्नावली सादर करून मुलाखत घेतली गेली व त्यानुसार माहिती संकलित केली गेली आहे.

दुय्यम स्त्रोत-

दुय्यम स्त्रोतांमध्ये पुणे महानगरपालिकेमार्फत प्रकाशित झालेले अहवाल व मासिके, आरोग्य विभागातील, रुग्णालयातील मागील वर्षातील संग्रहित माहिती, आरोग्य सेवेची पुस्तके, सदर विषयासंदर्भातील गतकालीन संशोधन, तसेच वर्तमानपत्रातील माहितीचा वापर केला गेला आहे.

संकलित केलेल्या माहितीच्या आधारे करण्यात आलेले विश्लेषण पुढीलप्रमाणे-

तक्ता क्र.- १. शासकीय आरोग्य सेवांच्या तुलनेत खाजगी आरोग्य सेवांना प्राधान्य देण्याबाबत-

अ.क्र.	तपशील	रुग्ण प्रतिसादक संख्या	संशोधन नमुना रुग्ण संख्या %
१	होय	१९	१९
२	नाही	४६	४६
३	काही प्रमाणात	२१	२१
४	तटस्थ	१४	१४
एकूण -		**१००**	**१००**

तक्ता क्र.-१. वरून असे निदर्शनास येते की, शासकीय आरोग्य सेवांच्या तुलनेत खाजगी आरोग्य सेवांना प्राधान्य देणाऱ्या रुग्ण प्रतिसादकांची संख्या १९% आहे, तर सर्वेक्षणातील २१% रुग्ण क्वचित व काहीप्रमाणात खाजगी आरोग्य सेवांचा वापर करतात. याचबरोबर १४% रुग्णांची याबाबत स्पष्ट अशी काही भूमिका दिसून आली नाही. मात्र सर्वेक्षणातील सर्वात जास्त म्हणजे ४६% रुग्ण हे शासकीय आरोग्य सेवेलाच प्राधान्य देत असल्याचे आढळून आले.



तक्ता क्र.- २. शासकीय आरोग्य सेवा खर्चिक आहे की नाही याबाबत-

अ.क्र.	तपशील	रुग्ण प्रतिसादक संख्या	संशोधन नमुना रुग्ण संख्या %
१	होय	२६	२६
२	नाही	६१	६१
३	तटस्थ	१३	१३
एकूण -		१००	१००

तक्ता क्र.-२. वरून असे निदर्शनास येते की, शासकीय आरोग्य सेवा खर्चिक आहे असे मत मांडणाऱ्या रुग्ण प्रतिसादकांची संख्या २६% आहे, तर सर्वेक्षणातील १३% रुग्णांची याबाबत स्पष्ट अशी काही भूमिका दिसून आली नाही. मात्र सर्वेक्षणातील सर्वात जास्त म्हणजे ६१% रुग्ण हे शासकीय आरोग्य सेवा खर्चिक नाही असे मत मांडणारे आढळून आले आणि त्यामुळेच सर्वाधिक रुग्ण शासकीय आरोग्य सेवांचा वापर करत असल्याचे निष्पन्न झाले.



तक्ता क्र.- ३. शासकीय आरोग्य सेवेमध्ये वेळेवर उपचार उपलब्ध होणेबाबत-

अ.क्र.	तपशील	रुग्ण प्रतिसादक संख्या	संशोधन नमुना रुग्ण संख्या %
१	होय	५९	५९
२	नाही	१५	१५
३	काही प्रमाणात	१९	१९
४	तटस्थ	०७	०७
एकूण -		**१००**	**१००**

तक्ता क्र.-३. वरून असे निदर्शनास येते की, शासकीय आरोग्य सेवेमध्ये वेळेवर उपचार होत नाहीत असे मत मांडणाऱ्या रुग्ण प्रतिसादकांची संख्या १५% आहे, तर सर्वेक्षणातील १९% रुग्णांनी शासकीय आरोग्य सेवेमध्ये क्वचित व काहीप्रमाणात वेळेवर उपचार होतात असे मत मांडले. याचबरोबर ०७ % रुग्णांची याबाबत स्पष्ट अशी काही भूमिका दिसून आली नाही. मात्र सर्वेक्षणातील सर्वात जास्त म्हणजे ५९% रुग्ण हे शासकीय आरोग्य सेवेमध्ये वेळेवर उपचार उपलब्ध होतात असे मत मांडणारे आढळून आले.



तक्ता क्र.- ४. नागरिकांना रुग्णवाहिकेची सुविधा जलदगतीने उपलब्ध होणेबाबत–

अ.क्र.	तपशील	रुग्ण प्रतिसादक संख्या	संशोधन नमुना रुग्ण संख्या %
१	होय	६६	६६
२	नाही	२४	२४
३	तटस्थ	१०	१०
एकूण -		**१००**	**१००**

तक्ता क्र.-४. वरून असे निदर्शनास येते की, शासकीय रुग्णवाहिकेची सुविधा वेळेवर उपलब्ध होत नाही असे मत मांडणाऱ्या रुग्ण प्रतिसादकांची संख्या २४% आहे, तर सर्वेक्षणातील १०% रुग्णांची याबाबत स्पष्ट अशी काही भूमिका दिसून आली नाही. मात्र सर्वेक्षणातील सर्वात जास्त म्हणजे ६६% रुग्ण हे शासकीय रुग्णवाहिकेची सुविधा वेळेवर उपलब्ध होते असे मत मांडणारे आढळून आले.



तक्ता क्र.- ५. शासकीय योजनांचे लाभ योग्य प्रमाणात मिळणेबाबत–

अ.क्र.	तपशील	रुग्ण प्रतिसादक संख्या	संशोधन नमुना रुग्ण संख्या %
१	होय	५८	५८
२	नाही	१२	१२
३	काही प्रमाणात	२५	२५
४	तटस्थ	०५	०५
एकूण -		१००	१००

तक्ता क्र.-५. वरून असे निदर्शनास येते की, सार्वजनिक रुग्णालयांमध्ये शासकीय योजनांचे लाभ योग्य प्रमाणात मिळत नाहीत असे मत मांडणाऱ्या रुग्ण प्रतिसादकांची संख्या १२% आहे, तर सर्वेक्षणातील २५% रुग्णांनी सार्वजनिक आरोग्य सेवेमध्ये क्वचित व काहीप्रमाणात शासकीय योजनांचे लाभ मिळतात असे मत मांडले. याचबरोबर ०५ % रुग्णांची याबाबत स्पष्ट अशी काही भूमिका दिसून आली नाही. मात्र सर्वेक्षणातील सर्वात जास्त म्हणजे ५८% रुग्ण हे सार्वजनिक रुग्णालयांमध्ये शासकीय योजनांचे लाभ योग्य प्रमाणात मिळतात असे मत मांडणारे आढळून आले.



तक्ता क्र.- ६. शासकीय आरोग्य सेवेमध्ये सकारात्मक बदल होत आहेत याबाबत-

अ.क्र.	तपशील	रुग्ण प्रतिसादक संख्या	संशोधन नमुना रुग्ण संख्या %
१	होय	५१	५१
२	नाही	१९	१९
३	काही प्रमाणात	२२	२२
४	तटस्थ	०८	०८
एकूण -		१००	१००

तक्ता क्र.-६. वरून असे निदर्शनास येते की, शासकीय आरोग्य सेवेमध्ये सकारात्मक बदल होत आहेत असे मत मांडणाऱ्या रुग्ण प्रतिसादकांची संख्या सर्वाधिक म्हणजे ५१% आहे, तर सर्वेक्षणातील १९% रुग्णांनी याबाबत नकारात्मक मत मांडले. याचबरोबर शासकीय आरोग्य सेवेमध्ये काही प्रमाणात सकारात्मक बदल होत आहेत असे मत २२% रुग्णांनी मांडले, तर ०८ % रुग्णांची याबाबत स्पष्ट अशी काही भूमिका दिसून आली नाही.



तक्ता क्र.- ७. शासकीय आरोग्य सेवांमधून समाधानी असणेबाबत -

अ.क्र.	तपशील	रुग्ण प्रतिसादक संख्या	संशोधन नमुना रुग्ण संख्या %
१	होय	५७	५७
२	नाही	२१	२१
३	काही प्रमाणात	२२	२२
एकूण -		**१००**	**१००**

तक्ता क्र.-७. वरून असे निदर्शनास येते की, शासकीय आरोग्य सेवांमधून ५७% रुग्ण हे समाधानी आहे, तर २१% रुग्ण असमाधानी आहेत, त्याचबरोबर सर्वेक्षणातील २२% रुग्ण हे काही प्रमाणात समाधानी असल्याचे आढळून आले.



तक्ता क्र.- ८. शासकीय आरोग्य सेवांमध्ये आणखी काही सुधारणा होणेबाबत -

अ.क्र.	तपशील	रुग्ण प्रतिसादक संख्या	संशोधन नमुना रुग्ण संख्या %
१	होय	४६	४६
२	नाही	०६	०६
३	काही प्रमाणात	४१	४१
४	तटस्थ	०७	०७
एकूण -		**१००**	**१००**

तक्ता क्र.-८. वरून असे निदर्शनास येते की, शासकीय आरोग्य सेवांमध्ये आणखी काही सुधारणांची आवश्यकता नाही असे मत मांडणाऱ्या रुग्ण प्रतिसादकांची संख्या केवळ ६% आहे, तर सर्वेक्षणातील ४१% रुग्ण काहीप्रमाणात का होईना शासकीय आरोग्य सेवांमध्ये आणखी सुधारणांची आवश्यकता असल्याचे मत मांडतात. याचबरोबर ०७% रुग्णांची याबाबत स्पष्ट अशी काही भूमिका दिसून आली नाही. मात्र सर्वेक्षणातील सर्वाधिक म्हणजे ४६% रुग्ण हे शासकीय आरोग्य सेवांमध्ये आणखी काही सुधारणांची आवश्यकता असल्याचे स्पष्ट मत मांडताना दिसून आले. म्हणजेच शासकीय आरोग्य सेवांबाबत रुग्ण सकारात्मक जरी असले, तरी सुद्धा शासकीय आरोग्य सेवांच्या सुधारणेला आणखी बराच वाव असल्याचे स्पष्ट होते.

शासकीय आरोग्य सेवा जास्त कार्यक्षम होण्यासाठी त्यामध्ये आणखी काही सुधारणा होणे आवश्यक आहे असे वाटते का ?



निष्कर्ष-

प्रस्तुत संशोधन अभ्यासातून करण्यात आलेल्या रुग्णांच्या सर्वेक्षणानुसार असे निदर्शनास येते की, दिवसेंदिवस वाढत चाललेल्या लोकसंख्येनुसार रुग्णालयांची गरज, त्यांची अत्याधुनिकता, वेळेवरील उपचार याबाबत नागरिक (रुग्ण) सजग होत आहेत, त्यामुळे शासनाची जबाबदारी सुद्धा वाढलेली आहे. खाजगी रुग्णालयांच्या खर्चाचा भार गरीब, सर्वसाधारण जनतेला न परवडणारा असल्याने शासन सार्वजनिक / शासकीय आरोग्य सुविधा देण्याच्या बाबतीत कटाक्षाने लक्ष घालत आहे. त्याचप्रमाणे शासन पुरवित असलेल्या शासकीय आरोग्य सेवा या वेळेवर, कमी खर्चिक व अत्याधुनिक स्वरूपाच्या असल्याने नागरिकांमध्ये शासकीय रुग्णालयांबाबत समाधानाचे वातावरण निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे.

संदर्भ-

१) पुणे महानगरपालिका अहवाल
२) रिसर्च मेथॉडोलॉजी मेथड्स अँड टेक्निक्स- कोठारी सी. आर.
३) पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील सुविधा- सुविधा पुस्तिका, ग्रंथालय, पुणे म.न.पा.
४) रुग्ण प्रतिसादकांच्या प्रश्नावली
५) www.pmc.gov.in
६) बदलते पुणे- मा.प.मुंगुडकर
७) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९- महेश वसंत घागे

तंट्या भिल यांचा ब्रिटीश सत्तेविरुद्धचा संघर्ष

डॉ. डी. एन. रिठे

इतिहास विभाग, र. भ,अट्टल महाविद्यालय गेवराई, जि .बीड

प्रास्तावना

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात आदिवासी समाजाचा सहभाग अनेकदा इतिहासाच्या मुख्य लेखनातून लपलेला आहे. परंतु वास्तव हे आहे की, आदिवासी समाजातील अनेक वीरांनी सशस्त्र संघर्षातून ब्रिटिशांना आव्हान दिले. त्यापैकी सर्वात प्रभावी, संघटित आणि प्रभावशाली नेता म्हणजे तंट्या भिल जे की आजही इतिहासाच्या मुख्य प्रवाहापासून दुर्लक्षित राहिले आहे. तंट्या भील, ज्यांना जनतेने प्रेमाने "भारतीय रॉबिनहुड", "जंगलांचा बादशाह" आणि "आदिवासी रणरागिण्यांचा नेता" असे संबोधले ज्यांनी 19व्या शतकात ब्रिटिश सत्तेविरुद्ध भील समुदायाला एकत्र आणून ब्रिटीश सत्तेविरुद्ध सशस्त्र संघर्षाचे नेतृत्व केले. त्यांचा संघर्ष हा फक्त इंग्रजांविरुद्ध नव्हता, तर अन्याय, करव्यवस्था, जमीन हस्तगत आणि आदिवासींच्या अस्तित्वासाठी दिलेला लढा होता.

शोधनिबंधाचे उद्दिष्टे

- तंट्या भिल यांच्या जीवनाचा ऐतिहासिक अभ्यास करणे
- ब्रिटिश शासनाविरुद्ध त्यांच्या संघर्षाचे विश्लेषण करणे
- आदिवासी समाजातील तंट्या भिल यांच्या भूमिकेचे मूल्यमापन करणे

संशोधन पद्धती

सदरील संशोधन पेपरसाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून त्यासाठी दुय्यम साधनाचा आधार घेण्यात आला आहे.

तंट्या भिल यांचा जन्म १८४० मध्ये तत्कालीन मध्य प्रांतातील खंडवा जिल्ह्यामध्ये झाला.तंट्या भिल यांचे खरे नाव तोतिया असे होते. त्यांना प्रेमाने तंट्या मामा म्हणूनही ओळखले जात असे. सर्व लोक त्यांना आदराने "मामा" म्हणत असत. तात्या भिल्ल लहानपणापासूनच धाडसी आणि बुद्धिमान होते. ते एक उत्तम निशानेबाज होते आणि पारंपारिक धनुर्विद्येत कुशल होते, तसेच गनिमी युद्धातही अत्यंत कुशल होते. त्यांना बंदूक कशी चालवायची हे देखील माहित होते.

एकोणीसाव्या शतकात ब्रिटिशांनी आदिवासी जमीन, जंगल आणि संसाधने हडप करण्यास सुरुवात केली. गरिबांवर अन्याय, कर वाढ आणि नैसर्गिक संसाधनांवरील बंदीमुळे लोक त्रस्त झाले.ब्रिटिशांनी जंगल कायदे लागू केल्यानंतर आदिवासींची उपजीविका थेट संकटात आली.शिकार बंद, जंगलातील फळ-लाकूड घेण्यास बंदीशोषण करणाऱ्या अधिकाऱ्यांचे अत्याचार वाढलेल्याच पार्श्वभूमीवर तंट्या भिल यांनी असंतोषित जनता आणि भिल योद्धे एकत्र आणून गनिमी लढ्याची शक्ती तयार केली.आणि उठाव करून ब्रिटिशांना थेट सशस्त्र आव्हान दिले. तंट्या भिल्ल यांचे शौर्य पाहून, लोकांमध्ये, विशेषतः भिल्ल जमातींमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती निर्माण झाली. त्यांनी एकमेकांना धनुष्यबाण, कुऱ्हाडी आणि इतर शस्त्रांनी इंग्रजांवर हल्ला करण्यास प्रोत्साहित केले आणि घोषित केले की जंगले, शेते, ओढे, कालवे आणि इतर मालमत्ता स्थानिक लोकांच्या आहेत. या मालमत्तांमध्ये हस्तक्षेप करणाऱ्या कोणालाही शिकार करून ठार मारले पाहिजे. इंग्रज आमच्या संपत्तीवर मेजवानी करत असताना आम्ही उपाशी कसे राहू शकतो? अशा प्रकारे, त्यांनी संपूर्ण भिल्ल जमातीमध्ये जागरूकता निर्माण करण्यास सुरुवात केली.

सशस्त्र लढ्याची उभारणी

तंट्यां भिल्ल यांनी त्यांच्या चळवळीसाठी भिल आदिवासी परंपरेतील युद्धतंत्र, म्हणजे गनिमी कावा,अचानक हल्ला आणि जलद मागे हटणे, जंगलाचा अभ्यास, भूगोलाचा वापर लोकसहकार्य म्हणजे जनता गुप्त माहिती त्यांना

पुरवत होती. यावर आधारित तंट्या भिल यांनी ब्रीतीशाविरूढ लढा दिला. निशाणेबाजी,धनुष्यबाण आणि बंदूकीचा उत्कृष्ट वापर या तंत्रांच्या मदतीने त्यांनी ब्रिटिश सैन्याला अनेक वर्षे चकवले.

अन्यायाविरुद्ध जनआंदोलन

तंट्या भिल फक्त सशस्त्र योद्धे नव्हते, तर ते जनतेचे संरक्षक आणि न्यायनायक होते.ते श्रीमंत साहूकार व जमींदारांकडून अन्यायाने मिळवलेले धन घेतले आणि ते गरीब, शोषित, आदिवासी आणि शेतकरी वर्गाला वाटले. म्हणूनच लढ्याच्या काळात ग्रामीण जनता तंट्या भिल्ल यांना अन्न,आसरा,माहिती आणि शस्त्रे पुरवत असे. त्यांना पकडण्यासाठी ब्रिटिशांनी कठोर शिक्षा, दहशत आणि गाव तोडण्यासारखी उपाययोजना केली, तरीही जनता त्यांच्याशी निष्ठावान राहिली.

ब्रिटिशांविरुद्ध सतत छापामार कारवाया

तंट्या भिल यांनी ब्रिटिश पोलिस चौक्या नष्ट केल्या, शस्त्रसाठा जप्त केला. शासनाच्या तिजोरीवर हल्ले केले, गव्हर्नमेंट पोस्ट व रेल्वेला लक्ष्य केले. ब्रिटिशांना तंट्यां भिल यांनी इतके त्रास दिले की त्यांना शोधण्यासाठी विशेष सैन्य पथके, बक्षिसे आणि गुप्तहेर नेमले गेले.

अटक, न्यायालयीन खटला आणि फाशी

अनेक वर्षांच्या अपयशानंतर ब्रिटिशांनी तंट्या भिलांचा सर्वात विश्वासू सहकारी लालू उईके याला फाशीची भीती आणि पैशाचे आमिष दाखवून आपल्या बाजूला वळवले.त्याच्या मदतीने तंट्यांना 1889 मध्ये पकडण्यात आले.तंट्यांवर ब्रिटिश न्यायालयाने खालील आरोप ठेवले शासनाविरुद्ध बंड, शस्त्राने युद्ध छेडणे, सार्वजनिक संपत्ती लुटणे, जनतेला ब्रिटिशांविरुद्ध भडकवणे न्याय्य सुनावणी न देता 19 ऑक्टोबर 1889 रोजी खंडवा येथे त्यांना फाशी देण्यात आली.

निष्कर्ष

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास मुख्यत्वे शहरी नेतृत्व, प्रमुख नेते आणि राष्ट्रीय आंदोलनांवर आधारित लिहिला गेला आहे. त्यामुळे आदिवासी समाजातील स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान इतिहासाच्या मुख्य प्रवाहातून अनेकदा वगळले गेले आहे. तंट्या भिल हा असा आदिवासी नेता होता ज्याने ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र संघर्ष केला, पण त्यांचे योगदान पुरेशा संशोधनाअभावी जनमानसात व शैक्षणिक इतिहासात कमी प्रतिबिंबित झाले आहे. तंट्या भिलांचा संघर्ष हा भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. त्यांनी दिलेला लढा हा:अस्मिता, स्वातंत्र्य समाजन्याय, प्रतिबंधक सत्तेविरुद्ध प्रतिकार यांच्या विचारांवर आधारित होता. तो आजही आदिवासी समाजासाठी जिवंत प्रेरणा आणि प्रतिकाराचे प्रतीक आहेत. या पार्श्वभूमीवर, तंट्या भिलांच्या जीवन, संघर्ष आणि योगदानाचा शास्त्रीय, संदर्भाधारित आणि विश्लेषणात्मक अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.

संदर्भ सूची:

१. डॉ. बाबा भांड,जननायक तंट्या भिल्ल (मराठी अनुवाद: विश्वनाथ देशपांडे) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग 2014

२. चारुचंद्र मुखर्जी, तंट्या भिल्ल याचे जीवनचरित्र, कोल्हापूर प्रिंटिंग प्रेस 1923

३. विलास वाघ, तंट्या भिल्ल आदिवासींचा स्वातंत्र्यवीर,सुयश प्रकाशन, पुणे 2011

४. प्रा. महादेव परते,भिल्ल क्रांती आणि तंट्या भिल्ल, विश्वभारती पब्लिकेशन, नागपूर 2018

५. दुर्गम डोंगरांचा योद्धा — तंट्या नंदकुमार सरोदे साहित्य सदन प्रकाशन, नाशिक 2020 मराठी

"विट बालकामगार समस्येची प्रमुख कारणांचा समाजशास्त्रीय अभ्यास"

दिगांबर फकिरराव हरदडकर
संशोधक विद्यार्थी
सामाजिक शास्त्रे संकुल,
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ नांदेड

डॉ. डी. एस. धारवाडकर
सहाय्यक प्राध्यापक व
समाजशास्त्र विभागप्रमुख
तोष्णीवाल आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स
कॉलेज सेनगाव, जिल्हा हिंगोली.

प्रस्तावना:

प्रस्तुत शोधनिबंध विट बालकामगार समस्येची उत्पत्ती, त्यास जबाबदार असणारे विविध कारणे आणि कुटूंबाचे सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे. स्वातंत्र्योत्तर भारतात मोठमोठ्या औद्योगिक कंपन्यांची निर्मिती झाली. याकरिता अनेक कामगारांची आवश्यकता होती. विविध वस्तु कंपनीतून निर्माण केल्या जातात. कंपन्यांचे बांधकाम करण्यासाठी विटांची आवश्यकता असते. विट देखील मानव बनवित असतो. विटांच्या कारखान्यावर अनेक व्यक्ती जात असतात. सोबत कुटूंबातील सदस्य आणि लहान मुलांना घेवून जातात. लहान मुले देखील आई-वडिलांना मदत म्हणून काम करीत असतात. कोणत्याही राष्ट्राची प्रगती ही त्या राष्ट्रांमध्ये असणाऱ्या बालकांवर अवलंबून असते. बालक हे राष्ट्राचे फक्त प्रतिकच नाही तर ते त्या राष्ट्राची अमुल्य संपदा असते. या बालकांवरच देशाचे भवितव्य अवलंबून असते. ज्या देशाचे बालक हे शिस्त, आरोग्यदायी, साक्षर आणि प्रशिक्षीत असतील तर त्या देशाला विकासापासून कोणीही रोखू शकत नाही. आजचे बालक हे देशाचे उदयाचे नागरिक आहेत. ज्यांच्या हाथामध्ये देशाचे उदयाचे भवितव्य आहे, म्हणून बालकांना कमी वयामध्ये कामावर जावू नये यामुळे देशाच्या विकासामध्ये अडचणी येत आहेत. बालवयात बालकांची त्याला जी वाट दाखवली जाते तिकडे जात असतात. कमी वयात त्यांना कामावर पाठवल्यामुळे त्याचे व्यक्तीमत्व नष्ट होते कारण ते योग्य शिक्षण घेवू नाहीत शकत नाहीत यामुळेच ते देशाच्या विकासात हातभार लावू शकत नाहीत.

बालकामगार समस्येच्या व्याख्या : बाल मजुरीच्या अनुषंगाने वरील काही व्याख्या अभ्यासल्या नंतर काही विचारवंतानी बालकामगार समस्येच्या व्याख्या स्पष्ट केल्या आहेत, त्यातील काही व्याख्या खालील प्रमाणे आहेत.

दुसरी राष्ट्रीय श्रमिक परिषद : बालकामगार म्हणजे असे बालक होत जे आपल्या आई-वडील व इतर कुटुंबीयापासून दूर राहत असतात तसेच ते अत्यंत कमी मोबदल्यामध्ये काम करत असतात व त्यांच्या कामाची परिस्थीती ही अत्यंत वाईट असते.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटना : बालकामगार म्हणजे ती मुले होत जी शिक्षण आणि इतर विकास विषयक बाबींपासून दूर असतात तसेच त्यांना त्यांच्या भविष्याबदल काळजी.

शोध निबंधाची उद्दिष्ट्ये :

1) विट बालकामगार समस्येचा अभ्यास करणे.
2) विट बालकामगार समस्येच्या कारणांचा अभ्यास करणे.
3) विट बालकामगारांच्या कुटूंबाची सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

संशोधन पध्दती : प्रस्तुत शोध निबंधाचे लिखान करतांना वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब केला आहे. तसेच तथ्य संकलनाकरीता द्वितीय तथ्य संकलन साधनांचा अवलंब केला आहे.

बालकामगार समस्येची कारणे : विट बालकामगार समस्या ही बालकामगारमधून उदयास आलेली आहे. अनेक कुटूंब विट निर्मिती करण्यासाठी जात असतात. सोबत लहान मुलांना घेवून जातात. लहान मुलेदेखील आई-वडिलांना विट बनवण्यासाठी मदत करतात. विट बालकामगारांचे प्रमुख कारणे खालीलप्रमाणे :

1) अज्ञान :

अनेक बालक हे अज्ञानी असल्यामुळे सूध्दा बालकामगार बनत असतात, कारण की एखादया लहान मुलांचे पालक किंवा कुटुंबातील व्यक्ती कुटुंबातील एखादे काम करत असतील तर काही बालक आपल्या कुटुंबातील सदस्याला मदत करण्यासाठी काम करतात आणि कालांतराने ते स्वतः बालकामगार म्हणून काम करत असतात. तसेच एखादया बालकाचा मित्र जर काम करत असेल तर तो त्याच्या सोबत काम करण्यासाठी जातो आणि तो बालकामगार म्हणून काम करतो.

2) सामाजिक समतेचा अभाव:

भारतीय समाजामध्ये अनेक जाती, धर्म, वंश, पंथाचे लोक हे राहत आहेत आणि त्या प्रत्येकांची जीवन जगण्याची पध्दती आणि धार्मीक प्रथा-परंपरा आहेत. परंतू भारतीय समाजामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये वर्णव्यवस्था होती आणि या वर्ण व्यवस्थेमध्ये प्रत्येक वर्णातील लोकांची कार्य ठरवून देण्यात आली होती. तेव्हापासूनच उच्च वर्णातील लोक हे त्यांच्या पेक्षा कनिष्ठ या वर्णातील लोकांवर अन्याय-अत्याचार करत होते आणि त्यांना हिन वागणूक देत असत. याप्रमाणेच आज घडीला सुध्दा भारतीय समाजमध्ये जातीभेद हा मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसून येतो आणि यामुळेच उच्च जातीतील लोक हे त्यांच्या पेक्षा कनिष्ठ जातीतील लोकांना समानतेची वागणूक देत नाहीत व यामुळे समाजमध्ये सामाजीक समतेचा अभाव आहे आणि या अभावामुळेच बालकामगारांच्या संख्येत वाढ होत आहे.

3) शिक्षणाचा अभाव:

बालकामगार या समस्येमध्ये वाढ होण्याचे आणखी एक कारण म्हणजे बालकांमध्ये असलेला शिक्षणाचा अभाव, कारण अनेक बालक हे शाळेमध्ये जात नाहीत आणि त्यामुळे त्यांना चांगले काय? आणि वाईट काय? यामध्ये भेद करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये विकसीत होत नाही आणि त्यांच्या या शिक्षणाच्या अभावामुळे ते अतिशय कमी मोबदल्यामध्ये बालकामगार म्हणून काम करत आहेत.

4) पालकाचे अज्ञान :

अनेक पालक हे आपल्या मुलांकडे व्यवस्थित लक्ष देत नाहीत. तसेच तो शाळेत जातो का किंवा कुठे आपल्या मित्रांसोबत फिरत आहे किंवा काम करत आहेत याकडे त्यांचे लक्ष नसते तसेच अनेक पालक हे अज्ञानी असल्यामूळे त्यांची मुले हि बालकामगार होत आहेत.

5) शाळेच्या उपलब्धतेचा अभाव :

अनेक लहान-लहान गावे अशी आहेत की त्या गावामध्ये शाळाच नाहीत किंवा अनेक गावे अशी आहेत की चार ते पाच गावांसाठी एक शाळा आहे. यामूळे लहान मुले हि शाळेत जात नाहीत. ते शाळेत जात नसल्यामुळे ते मनोरंजन म्हणून कोणाच्या शेतामध्ये, एखादया दूकानामध्ये, एखादया हॉटेल्समध्ये, एखादया कारखाण्यामध्ये काम करण्यास

सूरूवात करतात आणि हळूहळू त्यांना ती काम करण्याची सवय लागते आणि कालांतराने ती लहान बालके हि बालकामगार म्हणून काम करत असतात.

6) स्थलांतर :

स्थलांतर हे बालकामगार समस्येचे महत्वाचे कारण आहे. अनेक लोक कामाच्या शोधामध्ये आपली गावे सोडून शहरामध्ये येवून राहतात. तसेच काही लोक हंगामी स्वरूपाचे स्थलांतर करत असतात जसे की, ऊसतोड कामगारांचे स्थलांतर, विटभट्टीवर काम करणाऱ्या कामगारांचे स्थलांतर. या स्थलांतरीत कामगारांची लहान मुले हि त्याच्या सोबत स्थलांतरीत होतात तसेच ती आपल्या कुटुंबीयांना त्यांच्या कामात मदत करत असतात व ती लहान बालके हळूहळू बालकामगार म्हणून ओळखले जातात.

7) निरक्षरता :

बालकामगार समस्ये मागील सर्वात महत्वाचे कारण म्हणजे निरक्षरता होय. अनेक बालकांचे पालक हे निरक्षर असतात आणि त्यांना आपल्या बालकांच्या भविष्याची काही प्रमाणात काळजी नसते किंवा त्यांच्या निरक्षरतेमुळे त्यांना ते समजत नाही त्यामुळे ते आपल्या लहान बालकांकडे लक्ष देत नाहीत. दोन वेळेच्या भाकरी कमविण्याच्या स्पर्धेत मुलांकडे त्यांचे दुर्लक्ष होते व याचा परिणाम असा होतो की, ते बालक हे बालकामगार म्हणून काम करण्यास सुरूवात करते. तसेच अनेक बालक शाळेत जात नसल्यामुळे सुध्दा निरक्षरच राहतात व शिक्षणाच्या अभावामुळे त्यांना शिक्षणाच्या चांगले काय? आणि वाईट काय? हे समजत नाही आणि ते अनभिज्ञपणे बालकामगार म्हणून उदयास येतात.

8) व्यसनाधीन पालक :

व्यसनाधीन पालक ही पालक एक बालकामगार समस्येचे प्रमूख कारण आहे. बालकाचे पालक म्हणजेच आई-वडिल हे जेव्हा व्यसनाधीन असतात तेव्हा त्यांना आपल्या बालकाकडे लक्ष देण्यास वेळ नसतो. ते एखादया व्यसनाच्या आहारी जावून त्यातच गुरफटलेले असतात. त्यामुळे त्यांना आपल्या बालकांन शिक्षण दिले पाहिजे किंवा आपल्या बालकांनी चांगले जीवन जगले पाहिजे याकडे त्यांचे लक्ष नसते व व्यसनाधीनतेमूळे त्यांच्या कुटुंबामध्ये नेहमीच वाद होत असतात व याचा जास्तीत जास्त वेळ घालवत परिणाम असा होतो की, ते बालक जास्तीत जास्त वेळ घरा बाहेर घालवत असते व कालांतराने बालकामगार म्हणून काम करू लागते.

9) बेरोजगारी :

बेरोजगारी ही बालकामगार समस्येचे एक कारण आहे. एखादया व्यक्तीला जर रोजगार उपलब्ध होत नसेल तर त्याला आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे अतिशय अवघड जाते. बेरोजगारीची समस्या उद्भवण्या मागचे मुळे कारण म्हणजे निरक्षरता तसेच कौशल्यांचा अभाव हे आहे. बेरोजगार व्यक्ती हा आपल्या कुटुंबातील लहान बालकांना हॉटेल्स, कापड असतात दूकाने व इतर ठिकाणी कामावर पाठवत असतात आणि ते बालक बालकागार म्हणून नाईलाजास्वत काम करत असते कारण नकळतपणे कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी ही त्याच्यावरच पडते.

10) शाळेतील गळतीचे प्रमाण:

शाळेतील गळतीचे प्रमाण हे सुध्दा बालकामगार समस्या वाढी मागचे एक कारण प्रमाण आहे. जेव्हा एखादया गावामध्ये कामाची उपलब्धता नसल्यामुळे त्या गावातील बरेचसे लोक हे हंगामी स्वरूपाचे स्थलांतर करत असतात. उदा. वीटभट्टीवर काम करणारे कामगार, ऊस तोड कामगार इत्यादी. त्यांच्या बरोबर ते आपल्या लहान बालकांना

सूध्दा घेवून जात असतात यामूळे ते बालक शाळे मधून गळती होत असते व ग्रामीण भागात यांचे प्रमाण अधिक दिसून येते.

11) कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचा मृत्यू :

बालकामगार समस्या वाढी मागचे आणखी एक प्रमुख कारण म्हणजे त्या कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचा झालेला मृत्यू. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर त्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे अत्यंत अवघड होवून बसते आणि यामुळेच त्या कुटुंबातील बालकांना बालकामगार उपलब्ध नसतो म्हणून काम करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नसतो ते बालकामगार म्हणून काम करत असतात आणि यामुळेच बालकामगार समस्येमधे वाढ होत आहे.

12) व्यसनाधिनता :

बालकामगार समस्येचे आणखी एक कारण म्हणजे व्यसनाधीनता हे होय. एखादया कुटुंबातील पालक हे व्यवसनाधीन असतात आणि ते कोणतेही काम करत नाहीत किंवा एखादया कुटुंबातील पालक हे तर काम करतात परंतू ते काम करून मिळवलेला सर्व पैसा हा आपल्या व्यसनावर खर्च करत असतात आणि कुटुंबातील उदरनिर्वाहासाठी कोणतेही पैसे देत नाहीत आणि त्यामुळेच त्या कुटुंबातील अन्य व्यक्तीना आपला उदरनिर्वाह करण्यासाठी अन्य काम करावे लागते व यामध्ये त्या घरातील बालकांचा सुध्दा समावेश असतो आणि हे बालक जेव्हा काम करण्यास सुरूवात करतात तेव्हा त्यांना बालकामगार असे म्हणतात.

13) अंध्दश्रध्दा:

आज भारतातील बालकामगारांच्या समस्ये मागील महत्वाचे कारण जर कोणते असेल तर ते अंध्दश्रध्दा हे आहे. भारतामध्ये आज घडीलासुध्दा अनेक लोक हे विविध प्रकारच्या अंध्दश्रध्देने ग्रासलेले आहेत आणि त्या मुळेच अनेक कुटुंबातील पालक हे आपल्या बालकांना चांगले शिक्षण देवू शकत नाहीत किंवा त्यांचे योग्य प्रकारे पालनपोषण करत नाहीत त्याचे बालक हे भविष्यामधे बालकामगार म्हणून काम करत असतात आणि बालकामगाराची समस्या वाढतच जाते.

14) बालक विषयक शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील त्रुटी :

भारतामध्ये सध्या केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या कडून बालकांसाठी अनेक योजना राबविण्यात येत आहेत. परंतू त्या योजनांची योग्य अंमलबाजावणी होत नसल्यामुळे पात्र बालकांना त्या योजनेचा लाभमिळत नाही. तसेच बालकागमार निर्मूलनासाठी सुध्दा या दोन्ही शासनाकडून योजना राबविण्यात येत आहेत परंतू त्या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये त्रुटी असल्यामुळे बालकामगार समस्येमध्ये वाढ होताना दिसत आहे. अशा प्रकारे वरील ह्या सर्व कारणांमुळे भारतातील बालकामगारांची समस्या ही वाढतच आहे आणि त्यामुळे देशाच्या विकासाला बाधा निर्माण होत आहे.

संदर्भ सुची :

1) मायी सुनील (1998), भारतीय सामाजिक समस्या, नागपूर, अंशुल पब्लिकेशन, प्रथमावृत्ती.

2) माने माणिक (1997) भारतातील सामाजिक समस्या, नागपूर, विद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती.

3) गायकवाड एस.पी. (2013) (संपादक), मानवी हक्क आणि बालकामगार, लातूर पब्लिकेशन प्रा.लि., प्रथमावृत्ती.

4) जाधव तुकाराम, शिरापूरकर महेश (2018) मानवी हक्क, पुणे युनिक अॅकडमी पब्लिकेशन, प्रथमावृत्ती.

5) साळुंके सर्जेराव, (2000) समकालीन भारतातील सामाजि समस्या, पुणे, नरेंद्र प्रकाशन, प्रथमावृत्ती.

उसतोड कामगारांच्या मुलांचे शिक्षण एक अभ्यास

डॉ. योगेंद्रकुमार वसंतराव पवार
मार्गदर्शक
फोस्टर डेव्हलपमेन्ट अध्यापक महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर.

नारायण बाबासाहेब पडूळ
संशोधक विद्यार्थी
एम. ए. .एम.एड. , सेट (शिक्षणशास्त्र)

सारांश

महाराष्ट्रातील ग्रामीण कुटुंबे ऊसतोडणीसाठी काही महिन्यांसाठी स्थलांतर करतात, त्यामुळे त्यांच्या मुलांचे नियमित शिक्षण खंडित होते. शाळेपासून दूर राहिल्यामुळे विद्यार्थ्यांची वाचन–लेखन क्षमता कमी राहते आणि शिकण्यातील मागासलेपणा वाढतो. स्थलांतरित ठिकाणी शाळांचा अभाव, भाषेतील फरक, अभ्यासक्रमातील बदल, साहित्याची कमतरता आणि असुरक्षित वातावरण यामुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात. शासनाने शिक्षण हमी कार्ड, हंगामी शाळा आणि वस्तीगृहे अशा योजना केल्या असल्या तरी त्यांची अंमलबजावणी मर्यादित आहे. या समस्येचे समाधान म्हणजे स्थानिक रोजगारनिर्मिती, तात्पुरत्या शाळा, पूरक तासिका, पुनर्प्रवेश कार्यक्रम आणि पालक जागृती. एकूणच, उसतोड कामगारांच्या मुलांचे शिक्षण सुधारण्यासाठी शाळा, पालक, शासन आणि समाज यांचे संयुक्त प्रयत्न आवश्यक आहेत.

१. प्रस्तावना

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांसाठी ऊसतोडणी हा प्रमुख हंगामी रोजगाराचा स्रोत आहे. ऊस कापणीचे काम अत्यंत कष्टदायी, असंघटित व हंगामी स्वरूपाचे असून कामगारांना दरवर्षी ५ ते ६ महिन्यांसाठी इतर जिल्ह्यांत स्थलांतर करावे लागते. या स्थलांतरात प्रौढांसोबत लहान मुलेसुद्धा जावे लागतात. मुलांच्या सुरक्षिततेची, सांभाळाची किंवा शैक्षणिक व्यवस्थेची सोय नसल्याने त्यांना पालकांसोबत जाणे अपरिहार्य ठरते. यामुळे त्यांच्या नियमित शिक्षणात मोठा खंड पडतो. शिक्षणाचा पाया असणाऱ्या प्राथमिक स्तरातच विद्यार्थी शाळेपासून दूर राहिल्याने वाचन–लेखन कौशल्ये विकसित होत नाहीत व शैक्षणिक मागासलेपणा वाढतो. स्थलांतरामुळे मुलांच्या मानसिक, शारीरिक व शैक्षणिक विकासावर दुष्परिणाम होतो. त्यामुळे उसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाची समस्या ही फक्त शैक्षणिक नसून सामाजिक आणि आर्थिक न्यायाशी निगडित आहे. या निबंधात स्थलांतराची कारणे, मुलांना भेडसावणाऱ्या शैक्षणिक समस्या, शासकीय योजनांची उपयुक्तता, तसेच उपाययोजना यांचा सविस्तर अभ्यास केलेला आहे.

२. उसतोड कामगारांचे स्थलांतर : स्वरूप आणि आव्हाने

महाराष्ट्रातील आणि शेजारच्या राज्यांतील अनेक साखर कारखान्यांमध्ये ऊस कापणीसाठी मोठ्या प्रमाणावर मजुरांची गरज असते. या कामासाठी बीड, लातूर, नांदेड, उस्मानाबाद, परभणी, आणि छत्रपती संभाजीनगर या भागांतून मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होते. स्थलांतरामागील प्रमुख कारण म्हणजे आर्थिक अस्थिरता आणि स्थानिक रोजगाराचा अभाव. कुटुंबांसाठी गावात वर्षभर रोजगार उपलब्ध नसल्याने ते ऊसतोडणीसाठी दूरवर स्थलांतर करतात. स्थलांतर प्रामुख्याने अनुसूचित जमाती, विमुक्त भटक्या जमाती आणि दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांमध्ये अधिक दिसून येते. स्थलांतराच्या काळात मुलांसाठी स्वतंत्र सांभाळ व्यवस्था नसल्यामुळे तेही पालकांसोबत जातात. स्थलांतरित ठिकाणी राहणीमान अत्यंत असुरक्षित असते. तात्पुरती झोपडी, पिण्याच्या पाण्याचा अभाव, स्वच्छतेची कमतरता, रस्त्यांची अनुपलब्धता, वाहतूक व्यवस्था आणि आरोग्य सुविधा नसल्याने मुलांमध्ये असुरक्षितता वाढते. या अस्थिर जीवनशैलीमध्ये शिक्षण हे मुलांसाठी दुय्यम ठरते.

३. स्थलांतरित मुलांच्या शिक्षणातील अडथळे

उसतोड कामगारांच्या मुलांना भेडसावणाऱ्या शैक्षणिक अडचणी विविध स्वरूपाच्या आहेत. सर्वात प्रमुख अडथळा म्हणजे शाळेतील अनियमित उपस्थिती. स्थलांतरामुळे विद्यार्थी ४–६ महिन्यांपर्यंत शाळेत जाऊ शकत नसल्याने त्यांच्या शिकण्याची सातत्यपूर्ण प्रक्रिया खंडित होते.दुसरा मोठा अडथळा म्हणजे स्थलांतरित ठिकाणी शाळांची अनुपलब्धता. ऊसतोडणीच्या ठिकाणी बहुतेकवेळा जवळपास शाळा नसते किंवा शाळेतील भाषा व अभ्यासक्रम वेगळा असल्याने मुले शिक्षणात सामावू शकत नाहीत. अनेक ठिकाणी मुले पाणी आणणे, लहान भावंडांची देखरेख, कापणीच्या कामात मदत यात व्यस्त राहतात. त्यामुळे अभ्यासासाठी वेळ आणि ऊर्जा दोन्ही कमी पडतात.तिसरा अडथळा म्हणजे शैक्षणिक साहित्याचा अभाव. स्थलांतराच्या दरम्यान पुस्तके, वह्या, गणवेश यांची हानी होते. अभ्यासासाठी योग्य जागा नसल्याने मुले वाचन करू शकत नाहीत. चौथा अडथळा म्हणजे वाचन–लेखन कौशल्याची घट. शाळेत दीर्घ अनुपस्थितीमुळे मुले अक्षर, शब्द आणि वाक्य वाचनात मागे पडतात. काही विद्यार्थ्यांना इयत्ता पुढे गेल्यावरही मूलभूत पातळीवरच शिकवावे लागते.

४. शासकीय योजना आणि त्यांची प्रभावशीलता

स्थलांतरित मुलांच्या शिक्षणासाठी शासनाने काही महत्त्वाच्या योजना राबवल्या आहेत. त्यात शिक्षण हमी कार्ड, हंगामी शाळा, तात्पुरत्या साखर शाळा, वस्तीगृहे, मोफत शैक्षणिक साहित्य, पोषण आहार, प्रवास भत्ता इत्यादींचा समावेश आहे. तथापि, प्रत्यक्षात या योजनांची अंमलबजावणी अनेक ठिकाणी अपुरी ठरते. अनेक पालकांना या योजनांची माहिती नसते किंवा स्थलांतरित ठिकाणी व्यवस्था नसते. शिक्षण हमी कार्ड असूनही विद्यार्थ्यांच्या तात्पुरत्या दाखल्याची प्रक्रिया सुरळीत राहत नाही. हंगामी शाळांची संख्या मर्यादित असून साधनसंपत्ती अपुरी असते. त्यामुळे मुलांना शैक्षणिक सातत्य राखणे कठीण होते. योजनांच्या अंमलबजावणीतील कमतरता ही स्थलांतरित मुलांच्या शिक्षणातील मोठी समस्या आहे.

५. उपाययोजना

उसतोड कामगारांच्या मुलांचे शिक्षण सुधारण्यासाठी काही प्रभावी उपाययोजना पुढीलप्रमाणे

- ऊसतोडणी क्षेत्रात तात्पुरत्या शाळा किंवा छावणी शाळा सुरू करणे.
- गावात स्थायी रोजगार उपलब्ध करणे, ज्यामुळे स्थलांतराची गरज कमी होईल.
- विद्यार्थ्यांच्या वाचन–लेखनासाठी पूरक तासिका, वाचन पेटी, गणित पेटी यांचा वापर वाढवणे.
- स्थलांतरापूर्वी पालक–शिक्षक बैठका घेऊन जागृती करणे.
- स्थलांतरित मुलांसाठी वस्तीगृहे, सुरक्षित निवारा, पोषण आहार देणे.
- शाळेत परत आल्यावर पुनर्प्रवेश कार्यक्रम, ब्रिज कोर्स, वैयक्तिक मार्गदर्शन देणे.
- स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक युवकांचा सहभाग वाढवणे.

६. निष्कर्ष

१. हंगामी स्थलांतरामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सातत्यात मोठा खंड पडतो. उसतोड कामगारांच्या मुलांची उपस्थिती वर्षातून निम्म्याहून अधिक काळ खंडित होते, ज्यामुळे शिकण्याची साखळी तुटते. ही पोकळी पुढे जाताना भरून निघत नाही.

२. स्थलांतरित कुटुंबे सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल असल्याने शिक्षण दुय्यम ठरते. बहुसंख्य पालक अनुसूचित जमाती, भटक्या जाती-जमाती व अल्पभूधारक कामगार असल्याने मुलांच्या शिक्षणाला पुरेशे प्रोत्साहन मिळत नाही.

३. स्थलांतरित ठिकाणी शाळांची अनुपलब्धता मुलांच्या शिक्षणाला गंभीरपणे रोखते. शाळा नसणे, वाहतूक नसणे, किंवा भाषा–अभ्यासक्रमातील फरक यामुळे मुले शाळेत समाविष्ट होऊ शकत नाहीत.

४. वाचन–लेखन व गणितीय कौशल्ये अत्यंत खालावलेली आढळतात. शिक्षण खंडित झाल्याने मुले अक्षर किंवा शब्द स्तरावर अडकून राहतात, काहीजण इयत्ता पुढे गेल्यावरही मूलभूत स्तरात असतात.

५. बालमजुरी, कामात मदत व घरगुती जबाबदाऱ्या शिक्षणाला अडथळा आणतात. पालकांच्या मदतीसाठी मुले वेळ देतात, ज्यामुळे अभ्यासास वेळ मिळत नाही आणि शैक्षणिक मागे पडणे वाढते.

६. शासकीय योजना उपयुक्त असल्या तरी त्यांची अंमलबजावणी मर्यादित असल्यामुळे परिणाम कमी दिसतो. शिक्षण हमी कार्ड, छावणी शाळा, मोफत साहित्य यांचा उपयोग मुलांना पूर्णपणे मिळत नाही.

७. शिक्षक व शाळांकडून प्रयत्न असूनही स्थलांतर अपरिहार्य असल्याने समस्या कायम राहते. प्रबोधन, संपर्क, पुनर्प्रवेश सर्व असूनही आर्थिक दडपणामुळे पालकांना मुलांना घेऊन जावेच लागते.

८. अध्ययनातील तूट पुढील शिक्षणात अडथळा ठरते व विद्यार्थ्यांची आत्मविश्वासही खालावतो. मागे पडलेले विद्यार्थी वर्गात जुळवून घेऊ शकत नाहीत, ज्यामुळे शाळा सोडण्याचे प्रमाण वाढते.

९. स्थानिक रोजगारनिर्मिती हे स्थलांतर कमी करण्याचे मूलभूत समाधान आहे. मनरेगा, कौशल्य प्रशिक्षण, स्थानिक उद्योग यांमुळे पालकांना गावातच रोजगार मिळू शकतो.

१०. हंगामी शाळा, वस्तीगृहे, पूरक तासिका या उपाययोजना अत्यंत प्रभावी ठरू शकतात. अशा सुविधा उपलब्ध केल्यास स्थलांतरित मुलांचे शिक्षण खंडित होण्याचे प्रमाण कमी होईल.

संदर्भ सूची

१. डॉ भांडारकर .पु(१९७६) .ल ., सामाजिक संशोधन पद्धती, प्रथम आवृत्ती, नागपुर, महाराष्ट्र ग्रंथनिर्मीती मंडळ नागपुर(१ .

२. मुळे, राव उमाठे .श., विशैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे (१९८७) .तु., नागपुर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मीती मंडळ

३. भिंताडे, वि(१९९४) .रा., शैक्षणिक संशोधन पद्धती पुणेनित्य नुतन प्रकाशन .

४. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ ,

५. महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम२०११ ,

६. .महाराष्ट्र शासन — शालेय शिक्षण विभाग. स्थलांतरित मुलांसाठी शैक्षणिक उपाय योजना (अहवाल).

७. UNICEF India (2018). Education of Seasonal Migrant Children.

८. National Commission for Protection of Child Rights (NCPCR). Children of Migrant Labourers and Education.

९. Joshi, S. (2019). Seasonal Migration and Educational Deprivation in Maharashtra.

"आधुनिक भारतीय कृषी विकासातील डॉ. पंजाबराव देशमुख यांचे योगदान"

प्रा. डॉ. कऱ्हाळे उत्तम सीताराम

(सहाय्यक - प्राध्यापक इतिहास विभाग)

नारायणराव वाघमारे महाविद्यालय, आ. बाळापुर जि.हिंगोली.

प्रस्तावना -

आधुनिक भारताच्या कृषी विकासाचे प्रणेते म्हणून ज्यांचे नाव अग्रगण्य पध्दतीने घेतले जाते ते म्हणजे डॉ. पंजाबराव देशमुख हे होय. भारताला 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वातंत्र्य मिळाले. 150 वर्षे ब्रिटिशांच्या गुलामीत खितपत पडलेल्या भारतीयांना विविध राजकीय लढ्यांच्या माध्यमातून स्वातंत्र्य प्राप्त झाले. भारत जरी स्वतंत्र् झाला तरी ते अजूनही आर्थिक, राजकीय, शैक्षिणक व कृषीक्षेत्र व उद्योग यामध्ये अजून सुध्दा मागासच होता. त्यामुळे भारत हा देश कृषी प्रधान असल्याने शेती हा प्रमुख उद्योग समजला जात होता तर भारतीय 75% लोक शेती व्यवसाय करीत होते तर 25 टक्के यामध्ये नौकरी, व्यापार व उद्योगांचा समावेश होता त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचीमुळे ही भारतीय कृषीप्रधान क्षेत्रातच रूजलेली शेती हे अनेक कृषी व अर्थतज्ञांना वाटत होते. त्यापैकी कृषी क्षेत्राविषयी सर्वांगिण अभ्यास असणारी व्यक्ती म्हणजे डॉ. पंजाबराव देशमुख हे होते. एकीकडे भारतीय राजकारणाखाली नव्याने घडी बसविण्यासाठी भारतीय राष्ट्रीय पातळीवर प्रयत्न हे चालू होते. तसेच भारतीय कृषी क्षेत्राचा विकास झाल्याशिवाय भारत देशाचा उध्दार होवू शकणार नाही हे अनेक तज्ञाना वाटत होते त्यामुळे डॉ. पंजाबराव देशमुख यांनी भारतीय शेतकरी मजूर व कष्टकरी यांना न्याय देण्यासाठी कृषी क्षेत्रात अनेक क्रांतीकारी प्रयोग अंमलात आणून कृषी क्षेत्राच्या कायापालाट डॉ. भाऊसाहेब देशमुख यांनी केला कारण शेकडो वर्षापासून शेतकरी, कष्टकरी व मजूर हा वर्ग आपले दयनिय अवस्थेत जीवन जगत होता, तो शेटजी, भटजी व लालटी यांच्या कॅचीत पक्काच अडवून बसला होता. कारण भारतीय शेती ही निसर्ग निर्भर असल्याने दुष्काळ, पूर, इ. या नैसर्गिक आपत्तीच्या संकटात भारतीय शेतकरी सापडला असल्याने त्याचे राहणीमान हे निकृष्ट बनले होते. जगाच्या पोशिंदा असणाऱ्या शेतकरी वर्गाला कुणीच मदतीची भिक घालेना झाला त्यामुळे तो सदैव आर्थिक संकटात सापडला होता. शेतकरी वर्गाला सामाजिक प्रवाहात आणण्याचा जर कोणी प्रयत्न केला असेल तर तो डॉ. पंजाबराव देशमुख यांनी. तसेच त्यांनी कृषीक्षेत्र व शेतकरी वर्ग हा अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत आहे. यातून हयांची कायमची सुटका करण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी कृषी क्षेत्राला वैज्ञानिक तांत्रिक पध्दतीचे प्रयोग अंमलात आणून कृषीक्षेत्राला आधूनिक बनविण्याचा प्रस्ताव केला म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख हे भारतीय शेतकऱ्यांचा मसीहा म्हणून ओळखले जातात. त्यांच्या या यशस्वी प्रयोगामुळे भारतीय कृषी व्यवस्था ही प्रगतीच्या दिशेने वाटचाल करू लागली यांचे सर्व श्रेय डॉ. भाऊसाहेब देशमुख यांना द्यावे लागेल.

1) कृषीमंत्री या नात्याने डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कार्य -

भारतानंतर भारतीय प्रजासत्तकाचे मंत्रिमंडळ जाहिर झाले. 1952 च्या निवडणूकीत डॉ. पंजाबराव देशमुख हे अमरावती लोकसभा मतदार संघातून निवडून आले. डॉ.पंजाबराव देशमुख याच्या प्रचंड मताधिक्याने विजय झाल्याने भारताचे पंतप्रधान पंडीत नेहरू यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जनाधाराची दाखल होवून व डॉ. पंजाबराव देशमुख यांना 12 ऑगस्ट 1952 रोजी डॉ. पंजाबराव देशमुख यांना कृषीमंत्री म्हणून नियुक्ती केली होती.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषीमंत्री म्हणून केलेले कार्य हे अत्यंत उल्लेखनीय व मार्गदर्शक होते. कारण भारत हा अन्न धान्यांच्या बाबतीत सपूर्ण नव्हता अनेक दुष्काळ प्रसंगी भारतीय लोकाना अमेरिकेतल्या डुकराच्या खाद्य हे भारतीय लोकांना खावे लागते ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट होती ही डॉ. भाऊसाहेबांच्या लक्षात आली म्हणून भारत अन्नधान्य क्षेत्रात स्वयंपूर्ण बनण्याकरिता डॉ. पंजाबराव देशमुख यांनी कृषीक्षेत्रातील संशोधक डॉ. स्वामीनाथ्न यांना कामाला लावले.[1]

2) शेतकरी परिषद (7 जानेवारी 1953)

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी कृषीक्षेत्रात सर्वांगिण प्रगती व्हावी यासाठी भारतातील प्रमुख 13 राज्याच्या कृषी मंत्र्याची परिषद दिल्ली येथे दि.07 जानेवारी 1953 रोजी घेतली. या परिषदेला भारताचे तत्कालिन पंतप्रधान पंडित नेहरू हे उपस्थित होते. "भारतीय कृषी पंडित शास्त्रज्ञ यांनी फक्त आपले मत न नोंदविता प्रत्यक्ष उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न करावे असे पंडीत नेहरू यांचे मत होते. या कृषीविषयक परिषदेत डॉ. पंजाबराव देशमुख यांनी कृषीशास्त्रज्ञ शेती उत्पन्न वाढविण्यासाठी कामाला लावले".[2]

3) सकस आहार योजना (इ.स.1955) -

"डॉ. पंजाबराव देशमुख यांनी भारताचे कृषीमंत्री बनण्यासाठी अमेरिकतील 'लाखोसाठी अन्न योजना' या योजनेच्या धर्तीवर भारतात गरिब शेतकरी व कष्टकरी मजूर वर्गासाठी इ.स.1955 साली भारतात सकस आहार योजना लाखोसाठी अन्न योजना ही अंमलात आणली. या संस्थेचा प्रमुख उद्देश अविकसीत व विकसनशील राष्ट्रातील गरीब लोकांना योग्य प्रकारचे प्रोटीन्स व जीवनसत्व् युक्त् अन्न मिळून या वर्गाचे आरोग्य सुदृढ बनावे हा उद्देश होता. कारण या काळात प्लेग, कॉलरा, देवी यासारखे आजारामुळे अनेक भारतीयांचा मृत्यू होत होता ही योजना यशस्वी करण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी अध्यक्षपद स्विकारून या योजनेचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला."[3] सकस अन्न योजना ही यशस्वी करण्यासाठी त्यांनी विदेशातील ब्रिटानिया बिस्कीट कंपनी सोबत करार करून प्रोटीन्स युक्त विस्कीटे तयार करून ते भारतीय लोकांना पुरवण्याचे पवित्र कार्य त्यांनी या योजनेच्या माध्यमातून केले.

डॉ. पंजाबराव देशमुख हे भकेल्यासाठी भारतीयांचे देवदतू म्हणून ओळखले जातात. कारण डिसेंबर 1959 च्या दिल्ली येथील जागतीक कृषी प्रदर्शन कार्य प्रणाली त्यांनी अमेरिकेचे अध्यक्ष आयरोन टॉवर, भारताचे पंतप्रधान पंडितजी नेहरू तसेच राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांना याच परिषदेत बोलावले होते. या परिषदेच्या माध्यमातून भारतात भूक मुक्ती ट्रस्ट फंड हा भारत कृषक समाजाद्वारे स्थापन केला"[4] यातून डॉ. भाऊसाहेब देशमुख यांचे दुरदृष्टी दिसून येते.

4) जागतीक कृषी प्रदर्शन (इ.स.1959) दिल्ली.

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेतक़ऱ्यांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी व कृषीक्षेत्रातील आमूलाग्रबद्दल घडवून आण्ण्यासाठी दिल्ली येथे दि.11 डिसेंबर 1959 रोजी जागतिक कृषी प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाचा प्रमुख उद्देश कृषीक्षेत्रातील अन्नधान्य, जनावेर, कृषी तंत्रज्ञान, बी-बियाने, खते व इतर सर्व अंगानी जागतीक कृषी तज्ञ, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ यांचा वापर कृषीक्षेत्रातील विकासासाठी करणे व कृषीक्षेत्रातील भारतीय शेतक़ऱ्यांचे उत्पन्न व दर्जा सुधारणे हा प्रमुख उद्देश होता. हा कृषी मेळावा भारत कृषक समाजाने आयोजित केला होता. "हे संम्मेलन **प्रदर्श्न** खुल्या पध्दतीचे होते. या संम्मेलनात जगातील प्रमुख देश, भारतीय केंद्र सरकार व राज्य सरकार, विविध मंडळे, समित्या, आयोग, संघटना व संस्था या कृषी प्रदर्शनात सहभागी झाल्या होत्या. या प्रदर्शनात

कृषी क्षेत्रातील उत्पादक, वितरक व उत्पादन वस्तू प्रदर्शन करणाऱ्या समस्त नागरिकांसाठी कृषी क्षेत्रातील ही जणू पर्वतीय डॉ. पंजाबराव देशमुख यांनी उपलब्ध करून दिली."[5]

हे कृषी प्रदर्शन दिल्लीला मथुरा रोडवरील शेतकरी मैदानावर भरणार होते. या मैदानाचे क्षेत्रफळ 52 लाख चौ.फुट एवढे विस्तारीत होते म्हणजे एकूण 118 एकरावर हे जागतीक कृषी प्रदर्शन भरणार होते. या जागतीक कृषी प्रदर्शात एकूण 06 विभाग पाडण्यात आले होते हे प्रदर्शन भरविण्यामागे डॉ. पंजाबराव देशमुख यांचा दृष्टकोन सुधारणावादी व व्यापक स्वरूपाचा होता.

या जागतीक कृषी प्रदर्शनाला जगातील व भारतातील काना-कोपऱ्यातून लाखो शेतकरी, कृषी तज्ञ, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ उपस्थितीत राहिले होते. या प्रदर्शनात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी देशी-विदेशी कृषीतज्ञ व शास्त्रज्ञांना पाचारण करण्यात आले होते. या तज्ञाच्या मार्गदर्शनातून भारतीय शेतकऱ्यांना कृषी विषयक मार्गदर्शन मिळणार होते. भारतीय शेतकऱ्यांना आधूनिक व नविन तंत्रावर आधारित कृषी विषयक माहिती प्राप्त होणार होती. त्यामुळेच डॉ. पंजाबराव देशमुख यांनी या जागतिक कृषी प्रदर्शनासाठी जागतिक प्रगतीचा आरसा असे संबोधले.

"या जागतिक कृषी प्रदर्शनाला दि.11 डिसेंबर 1959 रोजी दुपारी 4.00 वाजता सुरूवात झाली. या कृषी प्रदर्शनाचे प्रमुख पाहूणे म्हणून भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद हे होते. तसेच प्रमुख पाहणे म्हणून अमेरिकेचे राष्ट्रपती ड्राईट आयसेन हॉवर हे उपस्थित होते तसेच या अधिवेशनाला भारताचे पंतप्रधान पंडितजी नेहरू व भारत कृषक समाजाचे अध्यक्ष तथा भारताचे कृषी मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख हे व्यासपिठावर या अधिवेशनाला उपस्थित होते."[6]

या अधिवेशनाला भारतातून व जगातील शेतकऱ्यांचा प्रतिसाद एवढा प्रतिसाद होता की, व्यासपीठावरील प्रमुख मंडळींना आनंद झाला. या अधिवेशनाला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आयझेन हॉवर, रशीयन अध्यक्ष मार्शल बुल्गानीन व रशियाचे पंतप्रधान निकीत **खुश्चेव्ह्,** इंग्लंडची राणी एलिझाबेथ, युगोस्लीव्हियाचे अध्यक्ष **मार्श्ल** टिटो, जपानचे कृषी मंत्री फुक्रडा ही जगातील क्षेत्रातील नामांकित मंडळी या अधिवेशनाला उपस्थितीत होती यातून डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेतकऱ्यांविषयी व कृषी क्षेत्राविषयी किती तळमळ होती हे दिसून येते.

निष्कर्ष :-

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी स्वातंत्र्योत्तर भारताला नविन कृषी संजीवनी प्राप्त करून देण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरून विविध योजनांच्या माध्यमातून कृषी क्षेत्राचा सर्वांगिण विकास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांनी भारतीय शेतकरी वर्गाला सुखी व संपन्न करण्याकरिता अहोरात्र प्रयत्न कृषीमंत्री या पदावरून केले. त्यांनी 1953 ते 1959 या काळात कृषीमंत्री असतांना कृषीक्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन करण्यासाठी भारतीय राजकीय मंडळी कृषीतज्ञ, वैज्ञानिक व परकीय क्षेत्रातील नामांकित कृषी क्षेत्रातील देशातील कृषी तज्ञाना भारतीय कृषी विकासाच्या कामाला लावले व या तंज्ञाच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात वैज्ञानिक व तंत्रज्ञानाच्या आधारे कृषी क्षेत्रात हरितक्रांती आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. भारतीय परंपरागत शेतीला त्यांनी विज्ञान व तंत्रज्ञानाचा आधार देवून कृषी क्षेत्र बळकट बनविले. त्यांनी दिल्ली येथे 1959 साली आयोजित केलेले जागतिक कृषी प्रदर्शन हे तर त्यांचा कृषी विकासाच्या ध्येयाचे अंतिम प्रयोग होता हे आपणांस दिसून येते. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषीक्षेत्रातील कार्य हे भारतीया कृषीक्षेत्राला एक नविन आयाम प्राप्त करून देणारा होता त्यांच्या या कृषी धोरणाचा आजपर्यंत भारतीय

शासनातर्फे कृषी क्षेत्रात सातत्याने कार्य करीत आहेत त्यामुळे डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी क्षेत्रातील कार्य हे भारतीयांना नेहमीच मार्गदर्शक व दिशादर्शक ठरले यात अजिबात शंका नाही.

संदर्भ ग्रंथ :-

1.प्रा. मेधे ज्ञानेश्वर / प्रा. मेधे कुलभूषण - पुत्रसर्व श्रेष्ठ निर्मात्याचा, डॉ. पंजाबराव देशमुख, स्वंयम प्रकाशन नागपूर-2004.

2.गौरव ग्रंथ - लोक महर्षी डॉ. भाऊसाहेब देशमुख, संपादक महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुणे - 1985.

3.स्वा.मोहिते विर उत्तमराव - जागतिक कृषी क्रांतीचा विधाता, लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, अमरावती 1990.

4.स्मरणीका - भारत कृषक समाज (2005), सुवर्ण महोत्स्व**,** राष्ट्रीय अधिवेशन 2005.

5.डॉ. पंजाबराव देशमुख - मराठा मार्ग (विशेषांक) मराठा सेवा संघ, अमरावती 1998.

6.स्मरणीका जागतिक कृषी प्रदर्शन, 1959.

कुणबी समाजातील महिलांचा राजकीय सहभाग आणि सामाजिक दृष्टिकोन : एक अभ्यास

प्रा. ॲड. प्रियांका विलास झोळे पाटील

(संशोधन अभ्यासक) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

संशोधन केंद्र -पीपल्स कॉलेज नांदेड.

प्रस्तावना

भारतीय लोकशाही व्यवस्था ही जगातील सर्वात मोठी आणि व्यापक लोकशाही मानली जाते. संविधानाने स्त्री-पुरुष समानतेचा अधिकार दिला असला तरी प्रत्यक्षात ग्रामीण समाजरचनेत महिलांचा राजकीय सहभाग तुलनेने कमी प्रमाणात आढळतो. भारतातील अनेक समाजघटकांप्रमाणेच महाराष्ट्रातील कुणबी समाज हा शेतकरीप्रधान समाज पारंपरिक दृष्ट्या घर, शेती आणि उत्पादन प्रक्रियेत सक्रिय राहिला आहे. परंतु सार्वजनिक जीवन, विशेषतः राजकारण, निर्णय प्रक्रिया आणि नेतृत्व या क्षेत्रात महिलांचा सहभाग मर्यादित राहिला.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रसार, समाजसुधारणा चळवळी, पंचायतराज व्यवस्था, आरक्षण धोरण आणि महिला चळवळींच्या प्रभावामुळे कुणबी समाजातील महिलांचे राजकारणात प्रतिनिधित्व हळूहळू वाढले आहे. हा बदल केवळ औपचारिक नसून सामाजिक दृष्टिकोनातही काही प्रमाणात परिवर्तन दिसून येते. तथापि, अजूनही पितृसत्ताक मानसिकता, आर्थिक मर्यादा, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि "प्रॉक्सी उमेदवार" पद्धती यांसारखे अडथळे कायम आहेत. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधन पेपरात कुणबी समाजातील महिलांचा राजकीय सहभाग, त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, वर्तमान स्थिती, सामाजिक दृष्टिकोन, अडचणी व उपाययोजना यांचा अभ्यास केला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

१ कुणबी समाजातील महिलांच्या राजकीय सहभागाचा ऐतिहासिक मागोवा घेणे.

२ शिक्षण, आरक्षण आणि समाजसुधारणा चळवळींचा महिलांच्या सहभागावर झालेला परिणाम तपासणे.

३ महिलांविषयी समाजाचा दृष्टिकोन व मानसिकता जाणून घेणे.

४ महिलांच्या राजकीय सहभागातील अडथळे व मर्यादा शोधणे.

५ भविष्यातील संधी व उपाययोजना सुचवणे.

संशोधन पद्धती

या अभ्यासासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतींचा वापर केला आहे.

- प्राथमिक माहिती : काही निवडून आलेल्या महिला सरपंच, सदस्य, नगरसेविका यांच्याशी मुलाखती, प्रश्नावली व वैयक्तिक अनुभव.
- द्वितीयक माहिती : पुस्तके, संशोधन लेख, सरकारी अहवाल, नियतकालिके व ऑनलाईन स्त्रोत.
- डेटा विश्लेषण : गुणात्मक (Qualitative) व परिमाणात्मक (Quantitative) विश्लेषण.

सुचनक शब्द (Key-words)

१. राजकीय सहभाग

२. सामाजिक दृष्टिकोन

३. महिला सक्षमीकरण

४. शिक्षण

५. नेतृत्व

६. स्थानिक स्वराज्य

७. नगरपालिका

८. महानगरपालिका

९. आर्थिक स्वावलंबन

१०. कुणबी समाज

ऐतिहासिक पार्श्वभूमी

कुणबी समाज परंपरागत शेतीवर अवलंबून राहिला आहे. त्यामुळे महिलांचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने शेती, पशुपालन, घरकाम व उत्पादन प्रक्रियेत सीमित होते.

- **पारंपरिक काळात :** महिलांचे सार्वजनिक जीवनात स्थान गौण होते. निर्णय प्रक्रियेत त्यांचा थेट सहभाग जवळजवळ नव्हताच.
- **सामाजिक सुधारणा काळात :** फुले-शाहू-आंबेडकर यांच्या चळवळींनी शिक्षण, समानता आणि स्त्री-पुरुष समतेवर भर दिला. त्यामुळे पुढील पिढीतील महिलांना शिक्षणाचा लाभ मिळाला.
- **स्वातंत्र्य लढ्यात :** काही महिलांनी सहभाग नोंदवला; मात्र तो मर्यादित होता.
- **स्वातंत्र्योत्तर काळात :** आरक्षण धोरण आणि पंचायतराज व्यवस्थेमुळे महिलांना राजकारणात प्रवेशाची संधी निर्माण झाली.

कुणबी समाज पारंपरिकपणे कृषिप्रधान असल्यामुळे महिलांची भूमिका दीर्घकाळ घर, शेती आणि कुटुंबव्यवस्थेभोवती केंद्रित राहिली. घरातील श्रम, उत्पादन व्यवस्थापन, पशुपालन आणि कुटुंबातील निर्णयप्रक्रिया या पातळीवर त्या सक्रिय असल्या तरी राजकारणाच्या औपचारिक क्षेत्रात त्यांची उपस्थिती मर्यादित होती. परंतु काळ बदलत गेला तसे महिलांच्या शिक्षणात, जागरूकतेत आणि स्वावलंबनात वाढ झाली, आणि त्यामुळे त्यांच्या सामाजिक तसेच राजकीय दृष्टिकोनातही लक्षणीय बदल दिसू लागला.

आज कुणबी समाजातील महिला केवळ घरापुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. त्या गावाच्या प्रश्नांवर मत मांडू लागल्या आहेत, ग्रामसभेत उपस्थिती दर्शवू लागल्या आहेत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नेतृत्व स्वीकारायला सज्ज झाल्या आहेत. आरक्षणामुळे निर्माण झालेली संधी आणि वाढलेला आत्मविश्वास यांच्या जोडीने कौटुंबिक पाठबळही या बदलाला बळ देत आहे. अनेक ठिकाणी गावपातळीवर महिला सरपंच किंवा उपसरपंच म्हणून कार्य करताना दिसतात; यामुळे त्यांच्या निर्णयक्षमता, तडजोडीची वृत्ती आणि जबाबदारीची भावना अधिक दृढ होत आहे. शासनाच्या योजना, लाभ घेण्याची प्रक्रिया, तसेच विकासकामांमध्ये समाजहिताचा विचार करण्याचा त्यांचा दृष्टीकोन अधिक संवेदनशील आणि व्यवहार्य असतो.

सामाजिक दृष्टिकोनातही जाणवण्यासारखा बदल आहे. पूर्वी परंपरा, रुढी आणि सामाजिक दबावामुळे राजकारण हे 'पुरुषांचे क्षेत्र' मानले जात होते. परंतु शिक्षण आणि आधुनिक माध्यमांनी महिलांची विचारसरणी विस्तारली आहे. त्या आता स्वतःचे अधिकार ओळखतात, मतदानाचा योग्य वापर करतात, आणि राजकीय उमेदवारांची कार्यक्षमता समजून निवड करण्याकडे कल वाढला आहे. महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था आणि

सामाजिक संघटनांत सहभागी होताना त्यांच्या नेतृत्वाच्या गुणांना आकार मिळतो, आणि या सामाजिक अनुभवातूनच त्यांचा राजकीय सहभाग वृद्धिंगत होतो.

तरीही काही मर्यादा स्पष्ट दिसतात. आर्थिक अवलंबित्व, घरगुती जबाबदाऱ्या, काही प्रमाणात पुरुषप्रधान विचारसरणी आणि सामाजिक टीकेची भीती यामुळे अनेक महिलांना सक्रिय राजकारणात पूर्णपणे सहभागी होता येत नाही. काही ठिकाणी निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींच्या वतीने प्रत्यक्ष काम पुरुषच करतात यामुळे 'प्रॉक्सी नेतृत्व' ही समस्या उद्भवते. परंतु हे चित्र संपूर्ण समाजाचे प्रतिनिधित्व करत नाही; कारण नव्या पिढीतील महिला अधिक आत्मनिर्भर, जाणीवसंपन्न आणि ठाम आहेत.

एकूण पाहता, कुणबी समाजातील महिलांचा राजकीय सहभाग हा हळूहळू पण सातत्याने वाढणारा प्रवाह आहे. सामाजिक बदल, शिक्षण आणि संधी यांच्या संगतीत महिलांची मतनिर्मिती, नेतृत्वगुण आणि सामाजिक-जागृती अधिक परिपक्व होत आहे. त्यांच्या सहभागामुळे केवळ राजकारणाचा चेहरामोहरा बदलत नाही, तर समाजातील समतोल, उत्तरदायित्व आणि विकासाची दिशा अधिक व्यापक बनत आहे. म्हणूनच कुणबी समाजातील महिला आज 'मतदार' या भूमिकेपुरत्या मर्यादित न राहता 'निर्णायक' आणि 'नेतृत्वक्षम' घटक म्हणून उभ्या राहत आहेत.

सध्याचा राजकीय सहभाग

(अ) स्थानिक स्वराज्य संस्था

- १९९२ च्या ७३व्या व ७४व्या घटनादुरुस्तीनंतर ग्रामीण व नागरी संस्थांमध्ये ३३% आरक्षण मिळाल्याने महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर वाढला.
- कुणबी समाजातील महिला ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, पंचायत समिती व जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आल्या.
- काही ठिकाणी महिलांनी गावविकास, पाणीपुरवठा, शिक्षण, महिला सक्षमीकरण आदी विषयांवर काम केले.
- तथापि, अनेकदा त्यांना "प्रॉक्सी" उमेदवार म्हणून पुढे आणले जाते आणि प्रत्यक्ष निर्णय पती किंवा पुरुष नातेवाईक घेतात.

कुणबी समाजातील महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सहभाग हा गेल्या दोन दशकांत सर्वांत महत्त्वाचा सामाजिक बदल ठरला आहे. पूर्वी राजकारण किंवा सार्वजनिक जीवनाबद्दल जिज्ञासा असूनही भीती, संकोच, घरगुती जबाबदाऱ्या आणि समाजाच्या अपेक्षांमुळे त्या पुढे येऊ शकत नव्हत्या. परंतु शिक्षणाची पातळी वाढली, बचत गटांच्या माध्यमातून महिलांना सार्वजनिक व्यवहारांची सवय झाली आणि ग्रामपंचायत ते जिल्हा परिषद या संस्थांमध्ये महिलांसाठी राखीव जागा उपलब्ध झाल्यानंतर परिस्थितीत आमूलाग्र बदल दिसू लागला.

आज गावपातळीवर अनेक कुणबी महिला प्रत्यक्ष निवडून येऊन सरपंच, उपसरपंच किंवा सदस्य म्हणून कार्यरत आहेत. सुरुवातीला ही पदे फक्त औपचारिक स्वरूपात मिळत असली, तरी कालांतराने त्यांनी स्वतंत्रपणे निर्णय घेण्यास सुरुवात केली. शालेय शिक्षण, पाणीपुरवठा, आरोग्य, स्वच्छता, अंगणवाडी, घरकुल योजना, रस्ते-विकास अशा विषयांमध्ये त्या संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने सहभाग घेतात. गावातील दैनंदिन समस्यांचा त्यांना जवळून अनुभव असल्यामुळे त्यांच्या निर्णयांमध्ये व्यवहारज्ञान आणि प्रामाणिकपणा जाणवतो. महिला बचत गट आणि स्वयंसेवी संस्थांनी दिलेली प्रशिक्षणंही त्यांच्या व्यक्तिमत्त्वविकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. यामुळे बोलण्याचा आत्मविश्वास, कागदपत्रे हाताळण्याचे कौशल्य, सरकारी कार्यालयांत काम करण्याची प्रक्रिया आणि लोकांशी संवाद साधण्याची क्षमता वाढते. अनेक वेळा महिला प्रतिनिधींनी गावसभांना प्राणप्रतिष्ठा दिल्यासारखे वातावरण निर्माण केले आहे कारण त्यांनी लोकांना उपस्थित राहण्यास उद्युक्त केले, विषय स्पष्टतेने मांडले आणि निर्णय प्रक्रियेला पारदर्शक रूप दिले .

निश्चितच काही अडचणीही आहेत. घर आणि राजकीय जबाबदाऱ्या सांभाळण्याचा ताण, काही ठिकाणी पुरुषसत्ताक हस्तक्षेप, प्रॉक्सी नेतृत्वाचा धोका, आर्थिक मर्यादा आणि सामाजिक टीका—या सर्व गोष्टी अजूनही त्यांच्या पुढचा प्रवास कठीण करतात. तरीही, या मर्यादांच्या पलीकडे जाऊन अनेक महिलांनी प्रभावी नेतृत्व सिद्ध केले आहे. त्यांनी विकासकामांना गती दिली, भ्रष्टाचाराला विरोध केला, आणि गावांच्या प्रशासनात लोकशाही मूल्यांची रुजवात घडवली.एकूणच पाहता, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कुणबी समाजातील महिलांचा सहभाग हा केवळ प्रतिनिधित्वाचा भाग नाही; तो समाजाच्या सशक्तीकरणाचा, बदलत्या विचारसरणीचा आणि महिलांच्या कर्तृत्वाची ओळख देणारा प्रवाह आहे. त्यांच्या उपस्थितीने ग्रामीण प्रशासन अधिक संवेदनशील, सर्वसमावेशक आणि लोकाभिमुख बनत आहे.

(आ) नगरपालिका व महापालिका

- नागरी भागातील शिक्षित महिलांचा सहभाग वाढला आहे.
- त्यांनी नागरी स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य सेवा, शाळा, बालकल्याण या विषयांवर कार्य केले.
- काही ठिकाणी महिला नगरसेविका स्वतंत्र निर्णय घेऊन स्वतःचे राजकीय अस्तित्व निर्माण करताना दिसतात.

(इ) राज्य व राष्ट्रीय पातळी

- काही कुणबी महिला विधानसभा व संसदेत पोहोचल्या आहेत, विशेषतः राजकीय घराण्यांशी संबंधित उमेदवार म्हणून.
- परंतु, स्वतंत्र नेतृत्व निर्माण झालेले क्वचितच दिसते.
- महिलांची उपस्थिती तुलनेने अत्यल्प आहे, त्यामुळे धोरणनिर्मिती पातळीवर त्यांचा प्रभाव मर्यादित राहतो.

सामाजिक दृष्टिकोन

(अ) शिक्षणाचा प्रभाव

- स्त्रीशिक्षणामुळे महिलांचा आत्मविश्वास, जागरूकता आणि नेतृत्वगुण वाढले.
- महिलांनी स्वतःच्या हक्कांबद्दल आवाज उठवायला सुरुवात केली.
- उच्चशिक्षित महिलांचा राजकीय सहभाग ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात अधिक दिसतो.

(आ) समाजातील बदल

- पारंपरिक "स्त्री घरापुरती" ही धारणा बदलू लागली आहे.
- महिलांच्या यशस्वी कारकीर्दीमुळे समाज त्यांना स्वीकारू लागला आहे.
- राजकारणात महिला आल्याने सामाजिक प्रश्नांना नवा दृष्टिकोन मिळतो.

(इ) अडथळे व मर्यादा

1. पितृसत्ताक मानसिकता – पुरुषप्रधान व्यवस्था महिलांना निर्णय प्रक्रियेत दुय्यम स्थान देते.
2. कौटुंबिक जबाबदाऱ्या – मुलांची देखभाल, शेती व घरगुती कामांमुळे महिलांना राजकारणासाठी पुरेसा वेळ मिळत नाही.
3. आर्थिक मर्यादा – निवडणुकीतील खर्च भागवणे कठीण जाते.
4. प्रॉक्सी उमेदवार पद्धती – अनेक ठिकाणी महिला केवळ नावापुरत्या प्रतिनिधी राहतात.

5. राजकारणातील गुंतागुंतीचे वातावरण – पैशाचा, गुंडगिरीचा व गटबाजीचा दबाव.

निष्कर्ष

कुणबी समाजातील महिलांचा राजकीय सहभाग वाढला आहे हे निर्विवाद सत्य आहे. शिक्षण, आरक्षण आणि समाजचळवळींमुळे महिलांना पुढे येण्याची संधी मिळाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्यांचा प्रभाव वाढला आहे, तर शहरी भागात शिक्षित महिलांनी सक्रिय नेतृत्व दाखवले आहे.तथापि, अजूनही या सहभागाचे स्वरूप मर्यादित आहे. पितृसत्ताक मानसिकता, आर्थिक असमानता, प्रॉक्सी उमेदवार पद्धती आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यामुळे महिलांचा प्रभावी व स्वतंत्र सहभाग अडथळयांत सापडतो. समाजाचा दृष्टिकोन सकारात्मक बदलत असला तरी महिलांच्या नेतृत्वाला व्यापक स्वरूप मिळण्यासाठी धोरणात्मक व सामाजिक पातळीवर आणखी प्रयत्नांची गरज आहे.

शिफारसी

1. राजकीय प्रशिक्षण शिबिरे – महिला प्रतिनिधींना कायदा, अर्थसंकल्प, प्रशासन आणि नेतृत्व याबाबत प्रशिक्षण द्यावे.
2. आर्थिक सक्षमीकरण – स्वयं-सहायता गट, महिला सहकारी संस्था आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना बळकटी द्यावी.
3. सामाजिक जनजागृती – स्त्री-पुरुष समानतेची जाणीव शाळा, महाविद्यालये आणि समाजमाध्यमांतून सतत रुजवावी.
4. राजकीय पक्षांची जबाबदारी – पक्षांनी महिला उमेदवारांना संधी द्यावी आणि पक्षरचनेत अंतर्गत आरक्षण लागू करावे.
5. यशस्वी उदाहरणांचा प्रसार – सक्षम महिला नेतृत्वाची उदाहरणे पुढे आणून प्रेरणा द्यावी.
6. संशोधन व दस्तऐवजीकरण – महिलांच्या कामगिरीचा शास्त्रीय अभ्यास करून त्यावर सतत लेखन व संशोधन घडवून आणावे.

संदर्भग्रंथ

- गावकर, भीमराव. *महाराष्ट्रातील शेतकरी समाजाचा इतिहास.*
- पाटील, सौ. आशा. *महिलांचा राजकीय सहभाग : एक अभ्यास.*
- Government of India, Ministry of Panchayati Raj – Reports.
- Deshpande, Rajeshwari. *Women in Local Governance: A Study of Maharashtra.*
- विविध ऑनलाईन संशोधन लेख व वृत्तपत्रीय लेख.

भारतीय लोकशाहीतील जमातवाद: एक आव्हान

श्री. इब्राहीम जमन तडवी

सहा. प्रा. राज्यशास्त्र विभाग, पी. डी. कारखानीस कला व वाणिज्य महाविद्यालय, अंबरनाथ (पूर्व) जि. ठाणे.

प्रस्तावना:

भारतीय लोकशाहीसमोरील गंभीर आव्हानांपैकी जमातवाद हे अत्यंत महत्त्वाचे सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय आव्हान मानले जाते. संकुचित धार्मिक ओळख, धार्मिक अभिमान आणि परस्परविरोधी धार्मिक दृष्टिकोनातून जमातवादाची निर्मिती होताना दिसते. धर्मांधता ही जमातवादाच्या वाढीस कारणीभूत ठरते, ज्यामुळे राष्ट्रीय हिताच्या व्यापक दृष्टिकोनाचा विसर पडतो. विविध धार्मिक समुदायांमध्ये संशय, अविश्वास आणि वैमनस्य वाढत जाते. स्वातंत्र्यानंतरही भारतातील सांस्कृतिक विविधतेला जमातवादाने मोठी बाधा आणलेली दिसते. लोकशाहीच्या विस्तारासोबतच जमातवादी प्रवाह अधिक गुंतागुंतीचे स्वरूप धारण करत गेले आहेत. इतिहास, धर्म, धार्मिक राष्ट्रवाद, सामाजिक संबंध आणि राजकीय विचारसरणी याभोवती जमातवादाची चर्चा केंद्रित राहिलेली दिसते.

जमातवाद: एक संकल्पनात्मक आकलन:

'Communalism' या संज्ञेला मराठीमध्ये 'जमातवाद' किंवा 'सांप्रदायिकता' असे म्हटले जाते. धार्मिक मूलतत्ववादाशी याचा घनिष्ठ संबंध असल्याने अनेकदा जमातवादाचा अभ्यास धार्मिक आस्थेच्या अतिरेकातून केला जातो. सामान्य लोकांच्या रूढीप्रियता, आंधळ्या श्रद्धा आणि धार्मिक भोळेपणाचा उपयोग राजकीय आणि धार्मिक गट स्वतःच्या हितासाठी करतात. दोन धार्मिक समुदायांमध्ये धार्मिक ओळखीतून संघर्ष निर्माण होणे म्हणजे जमातवाद होय. यामुळे धर्मावर आधारित राजकारणाला चालना मिळते आणि धार्मिक ओळख ही राजकीय प्रेरकशक्ती बनते.

भारतीय लोकशाही आणि जमातवाद:

हिंदू आणि मुस्लिम समाजातील मध्यम व उच्च वर्गाचे जमातवादीकरण ब्रिटिश राजवटीच्या उत्तरार्धात सुरू झाले. पाश्चिमात्य विचारवंतांनी राष्ट्रवादाची व्याख्या करताना धर्म आणि संस्कृतीला मध्यवर्ती मानले. यामुळे भारतीय समाजात धार्मिक ओळख अधिक ठळकपणे समोर आली. अनेक समाजशास्त्रीय अभ्यास दर्शवितात की भारतातील मोठा मुस्लिम समाज हा पूर्वीच्या जाती-जमातींमधून तयार झालेला आहे. हिंदू आणि मुस्लिम समाजामध्ये धार्मिक आचारांचे फरक असले तरी भाषिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवर बरीच एकरूपता दिसून येते. तथापि, या साम्यांकडे दुर्लक्ष करून धार्मिक ओळख हीच समाजरचनेचा मुख्य आधार असल्याचा समज रूजविण्यात आला आणि जमातवादी विचारसरणीचा विस्तार झाला.

भारतीय राज्यघटनेत धर्मनिरपेक्षतेला विशेष स्थान देण्यात आले आहे. राज्य कोणत्याही धर्माचे समर्थन करणार नाही आणि सर्व नागरिकांना समान वागणूक देईल, अशी संविधान निर्मात्यांची भूमिका होती. परंतु जमातवादामुळे धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यांना धोका निर्माण होत आहे. समाजवादाच्या संकल्पनेऐवजी भांडवलशाहीकडे आणि धार्मिक राष्ट्रवादाकडे झुकल्याचेही निदर्शनास येते.

जागतिकीकरण आणि जमातवाद:

जागतिकीकरणाच्या सांस्कृतिक परिणामांमुळे धर्मनिरपेक्ष लोकशाही मूल्यांना धक्के बसताना दिसतात. भांडवलशाही आणि सांस्कृतिक उद्योगांच्या हितसंबंधांमुळे सांस्कृतिक आक्रमकता वाढली आहे. संस्कृतीचे सवंग सादरीकरण आणि जमातवादी प्रवाहांना चालना देणारी माध्यमे यामुळे धार्मिक ओळख अधिक तीव्र बनते.

१९७० नंतर जागतिक नाणेनिधी आणि जागतिक बँकेमार्फत भांडवलशाहीची पुनर्रचना सुरू झाली. ८० च्या दशकात 'थॅचरीझम' आणि 'रीगनवाद' या नवीन आर्थिक विचारसरणी उदयास आल्या. नव-उदारमतवादाच्या या प्रवाहामुळे खुल्या बाजारपेठांची भलावण झाली.

स्त्रीवादी विचारवंत शर्मिला रेगे यांच्या मते, खुल्या बाजारपेठेचे अर्थकारण, नव-सांस्कृतिक राष्ट्रवाद, प्रतिगामी राजकारण आणि धार्मिक मूल्यांचा प्रसार हे जागतिकीकरणाचे मूळ तत्त्व बनले. मुक्त बाजारपेठेची दुसरी बाजू म्हणजे जमातवादाचा उदय होय. भारतात १९९० नंतर उदारीकरण आणि हिंदू राष्ट्रवाद यांची सांगड घातली गेली. साम्राज्यवादी शक्तींशी हातमिळवणी आणि देशांतर्गत जमातवादी राजकारण हे एकत्र वाढले.

जमातवाद आणि भारतीय स्त्रियांची स्थिती:

स्त्रीवादी अभ्यासकांचे मत आहे की जमातवाद आणि लिंगभाव यांचा परस्परसंबंध अत्यंत गुंतागुंतीचा आहे. जमातवादी राजकारणात स्त्रियांचा वापर समूहाच्या अस्मितेचे प्रतीक म्हणून केला जातो. आपल्या किंवा विरोधी समुदायाच्या स्त्रियांचा सन्मान, सुरक्षितता किंवा छेडछाड हे मुद्दे दंगलींच्या कारणांमध्ये रूपांतरित केले जातात. मुजफ्फरनगर दंगलीसारख्या घटनांमध्ये स्त्री छेडछाडीचा मुद्दा हिंसाचाराचे औचित्य ठरविण्यात आला. धार्मिक संघटनांमध्ये स्त्रिया प्रतीकात्मक स्वरूपात मांडल्या जातात. इतिहासाला बाजूला सारून मिथके, महाकाव्ये, टीव्ही मालिका आणि उत्सव यांच्या माध्यमातून स्त्रियांच्या विचारसरणीवर परिणाम केला जातो. भारत-पाकिस्तान फाळणीच्या काळातही स्त्रिया समूहाच्या इज्जतीचे प्रतीक मानल्या गेल्या.

जमातवादी दंगलींच्या विश्लेषणासाठी जात, वर्ग, लिंगभाव आणि समुदाय यांचे संबंध समजून घेणे अत्यावश्यक आहे. बाबरी मशीद किंवा गोधरा प्रकरणांनंतर झालेल्या दंगलींमध्ये स्त्रियांवरील हिंसा मोठ्या प्रमाणात वाढली असल्याचे अभ्यास दर्शवतात. जमातवादी दंगलींमध्ये बलात्कार हा शस्त्र म्हणून वापरला जातो. स्त्रियांच्या शरीरावर सत्ता गाजवून संपूर्ण समुदायाला दडपण्याचा प्रयत्न केला जातो. सामूहिक बलात्कारासारखी अमानुष कृत्ये जमातवादी संघर्षांचे भयावह स्वरूप उघड करतात.

सारांश:

जमातवाद ही भारतीय लोकशाही, धर्मनिरपेक्षता, सामाजिक एकोपा आणि मानवी मूल्यांसाठी गंभीर समस्या आहे. त्याचे परिणाम वैयक्तिक, सामाजिक, धार्मिक, मानसिक आणि आर्थिक पातळ्यांवर दिसून येतात. जागतिक भांडवलशाही आणि पुरुषसत्ता यांसोबत जमातवादाचे असलेले निकटचे संबंध त्याच्या वाढीस हातभार लावतात. जमातवादाचे समाजशास्त्रीय, ऐतिहासिक आणि राजकीय आकलन झाल्याशिवाय त्यावर प्रभावी उपाययोजना करणे शक्य नाही.

संशोधन अभ्यास पद्धती:

१. वर्णनात्मक अभ्यास पद्धती (Descriptive Method):

जमातवाद, लोकशाही, जागतिकीकरण आणि स्त्रियांचे स्थान या संकल्पनांचा सविस्तर आणि तथ्याधारित परिचय करून देण्यासाठी वर्णनात्मक अभ्यास पद्धतीचा अवलंब करण्यात आला. यामुळे विषयाचे बारकावे स्पष्टपणे समजण्यास मदत झाली.

२. दस्तऐवजीकरण पद्धत (Documentary Method):

संशोधनासाठी उपलब्ध असलेली पुस्तके, संशोधन लेख, सरकारी अहवाल, आयोगांचे निष्कर्ष, ऐतिहासिक नोंदी आणि शैक्षणिक दस्तऐवज यांचा अभ्यास केला गेला. विश्वसनीय स्त्रोतांमधून माहिती संकलित करण्यासाठी ही पद्धती उपयुक्त ठरली.

३. सामग्री विश्लेषण पद्धती (Content Analysis):

वृत्तपत्रे, मासिके, डिजिटल माध्यमे, राजकीय भाषणे आणि सामाजिक माध्यमांवरील माहितीचे विश्लेषण करून जमातवादाच्या अभिव्यक्तीची कारणमीमांसा करण्यात आली. घटनांचे स्वरूप, भाषा व प्रतिमा यांचे विश्लेषण करण्यात आले.

४. तुलनात्मक अभ्यास पद्धती (Comparative Method):

विविध दंगली, सांप्रदायिक संघर्ष, राजकीय चळवळी आणि संबंधित धोरणांची तुलना करून जमातवादाच्या स्वरूपातील बदल, त्याची तीव्रता आणि त्याचे कारणरूप घटक ओळखले गेले.

५. गुणात्मक अभ्यास पद्धती (Qualitative Approach):

जमातवादाचे सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक पैलू समजून घेण्यासाठी गुणात्मक दृष्टीचा अवलंब करण्यात आला. संकल्पनांचे अर्थ, परस्परसंबंध आणि परिणाम यांचे सखोल विश्लेषण करण्यात आले.

संशोधनाची साधने:

१. दुय्यम स्त्रोतांचा अभ्यास – पुस्तके, जर्नल्स, अहवाल आणि संशोधन लेखांचा अभ्यास.

२. दस्तऐवज विश्लेषण – सरकारी धोरणे, आयोगांचे अहवाल, लोकशाही व जमातवादासंबंधी दस्तऐवज.

३. सामग्री विश्लेषण (Content Analysis) – वृत्तपत्रे, डिजिटल माध्यमे आणि प्रसारमाध्यमातील घटना व अहवालांचे विश्लेषण.

४. तुलनात्मक पद्धत (Comparative Method) – विविध दंगली, सामाजिक संघर्ष आणि राजकीय घटनांची तुलना करून निष्कर्ष काढणे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये:

१. जमातवादाची संकल्पना आणि त्याचे सामाजिक-राजकीय स्वरूप समजून घेणे.

२. भारतीय लोकशाहीसमोरील जमातवादाची आव्हाने तपासणे.

३. जागतिकीकरण आणि स्त्रियांवरील जमातवादाचे परिणाम अभ्यासणे.

गृहितके:

१. जमातवादामुळे भारतीय लोकशाहीची धर्मनिरपेक्ष रचना कमकुवत होते.

२. राजकीय हितसंबंध जपण्यासाठी जमातवादाचा जाणीवपूर्वक प्रसार केला जातो.

३. जागतिकीकरणामुळे वाढणारे सांस्कृतिक ताण जमातवादाला पोषक वातावरण निर्माण करतात.

४. जमातवादाचा सर्वाधिक दुष्परिणाम स्त्रिया आणि वंचित गटांवर होतो.

संदर्भ:

१. चव्हाण दिलीप, समकालीन भारत जाती अंताची दिशा, पुणे, २०१९.

२. देहडराय स्वाती, लिंगभेदाचे राजकारण आणि जमातवादाचे आकलन, पुणे, २००६.

३. पळशीकर सुहास, जमातवाद धर्म, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही, पुणे, २००६.

४. पानसरे मेवा (संपादित), धर्मनिरपेक्ष लोकशाही आणि जमातवाद, कोल्हापूर, २०१८.

५. भोळे भास्कर, धर्मनिरपेक्ष लोकशाही पुढील जमातवादाचे आव्हान, सातारा, २००२.

६. Indian Democracy and Diversity – Oxford Publications.

भारतीय समाज व स्त्री भृणहत्या

प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर

स्व. नि. पा. वाघाये महाविद्यालय, सौंदड, ता. सडक अर्जूनी, जि. गोंदिया

सारांश:-

व्यक्तीमत्व विकासात व सामाजिकरणात स्त्रियाचे फार मोठया प्रमाणात योगदान आहे. बहिन, पत्नी, मुलगी, मैत्रीन, आई, माता अशा अनेक रूपात मानवी विकासात स्त्रिचे महत्वाचे स्थान आहे. ती एक महान शक्ती आहे. तिने केलेल्या कार्याचा कुटूंबाने व समाजाने गौरव केलेला आहे. स्त्रिला शिक्षण यश शक्ती व संपत्तीचे प्रतीक मानले गेले आहे. मानवजातीची निर्मिती व पालनकर्ती सुध्दा मानल्या जातो.

प्रस्तावना :–

प्राचीन काळात भारतीय स्त्रियांना अत्यंत मानाचे व आदराचे स्थान दिल्या गेले. तो समाज विकषीत समाज मानल्या गेला. वेदोत्तर आणि स्मृतीपुराणकाळात अनेक परिवर्तन होवून स्त्रियांचा समाजातील व कुटूंबातील दर्जा कमी व्हायला लागला. स्त्रियांचे अधिकार कमी झाले फक्त आई म्हणुनच तिचा सन्मान होवू लागला. स्मृतीकारांनी सांगितले की, स्त्रिला स्वतंत्र ठेवू नये. तर लहानपणी पित्यावर, लग्नानंतर पतीवर आणि वृध्दापकाळात मुलावर अवलंबून राहावे म्हणजे वेगवेगळया वयात कोणत्यातरी पुरूषांनी स्त्रियांचे संरक्षण करावे पति, कसाही असला तरी त्याला परमेश्वर मानून त्याची सेवा करणे हेच पत्नीचे कर्तव्य आहे असे मानल्या जावू लागले व अशातच विधवा, विवाह व पुनर्विवाहावर बंधने आलीत व त्यातूनच सती प्रथा सरू झाली.

मध्ययुगीन भारतीय स्त्रियांची स्थिती अधिकच दयनीय झाली कमी वयात लग्न व्हायला लागले. पडदा पध्दतीला सुरूवात झाली आणि स्त्रियांचे सर्व अधिकार हिरावून घेतल्या गेल्यामुळे स्त्रि ही जन्मापासून तर मृत्यपर्यंत पुरूषावरच अवलंबून राहू लागली. उत्तर वैदिक काळापासूनच स्त्रियांचा दर्जा घसरला. चूल आणि मुल एवढेच तीचे कार्यक्षेत्र ठरवून दिल्या गेले स्त्रि ही फक्त उपभोगाची वस्तु म्हणुन तिच्याकडे हिनतेने बघू लागले. स्वामी विवेकानंद म्हणतात की, पाश्चिमात्य स्त्री प्रथम पत्नी व नंतर आई परंतु भारतातील स्त्री मात्र प्रथम आई व नंतर पत्नी असते. पूर्वी पत्नी, बहिण आणि आई यांना श्रध्देने व्यक्त करायचे. म्हणजेच पूर्वीच्या काळीसुध्दा स्त्रिया शिक्षित होत्या. आजची शिकलेली स्त्रि मात्र पुरूषानांच आपल्या पारतंत्र्याचे व पिडीत असल्याचे मुख्य कारण माणते; हे काही प्रमाणात खरे असले तरी आजही स्त्रि लोकसेविका होण्यापेक्षा एक गृहिणी आणि आई होण्यातच धन्यता माणत असते.

इंग्रज भारतात आल्यानंतर भारतीय समाजात फार मोठया प्रमाणात परिवर्तन व्हायला सुरूवात झाली. इंग्रजांनी, स्त्री–शिक्षणासाठी विशेष कामगिरी केली, सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे यांनी स्त्रि शिक्षणासाठी विशेष कार्ये केलेत. ईश्वरचंद विद्यासागर कर्वे यांनी विधवासाठी आश्रम सुरू केलेत. अशा प्रकारे समाजसुधारकांच्या प्रयत्नांमुळे, प्रबोधनामुळे स्त्रियांमध्ये जागृती होवून पुरूषांच्या विचारातही परीवर्तन व्हायला सुरूवात झाली. स्त्रि–पुरूष स्त्रियांच्या उध्दारासाठी प्रयत्न करू लागल्यामुळे स्त्रि शिक्षणाला सुरूवात झाली. शिक्षण घेवून स्त्रिया प्रथम छोटी–मोठी नौकरी करू लागल्या म्हणजेच शिक्षणामुळे महिला सबलीकरणाला सुरूवात झाली.

आपल्या देशाला इंग्रजांच्या तावडीतून सोडविल्यासाठी म.गांधीनी अनेक चळवळी चालविल्यात त्या चळवळीमध्ये म.गांधीनी पुरूषांबरोबरच स्त्रियांना सुध्दा सामील करून घेतले. स्त्रिया – पुरूषांच्या खांदयाला खंदा लावून चळवळींमध्ये सहभागी झाल्यात अशाप्रकारे म.गांधीनी स्त्रियांमध्ये राजनैतिक जागृती निर्माण केली. शिक्षणाचा प्रसार व औद्योगिकरण यामुळे स्त्रियांमध्ये एक स्वतंत्र चेतना निर्माण होवून प्रत्येक क्षेत्रात स्त्रि ही पुरूषांच्या बरोबरीने काम करू लागली. ते 1950 च्या भारतीय संविधानानी दिलेल्या स्त्रियांच्या समान हक्कामुळे आपल्या देशात मुलींपेक्षा मुलांना जास्त महत्व दिल्या जाते. आईच्या गर्भात मुलगी असेल तर तीला जन्माला येण्याआधिच मारल्या जातो. लिंगतपासणी करने कायदयाने गुन्हा असला तरी लोक कायदयांचे उल्लंघन करून लिंगतपासणी करतात. व मुलगी असले तर तीला जन्माला येवूच देत नाहीत. यामुळे भारतात मुलींची संख्या कमी व्हायला लागली आहे. मुलींच्या पालण–पोषणावर किंवा शिक्षणावर खर्च करणे फायदयाच नाही असे पालकांचे, समाजाचे मत असते. त्यामुळे स्त्रि–भृणहत्येचे प्रमाण वाढत चालले आहेत. भारतात गरीब वर्गामध्ये कुपोषण व आरोग्याची काळजी न घेता मुलींना मारल्या जाते. पहिली मुलगी झाल्यानंतर दुसऱ्या वेळी तपासणी करूण मुलगी आढळली तर स्त्रि–भृणहत्या जाते. कौटोबिंक त्रास मुलाची लालसा कुटूंबात व समाजात मुलींची किंमत कमी मुलगी ही कुटूंबासाठी ओझे समजल्या जाते. त्यामुळे स्त्रि ही स्त्रि–भृणहत्या करायला कारणीभूत ठरते. मुलगी झाली म्हणुन याला कारणीभूत स्त्रि घरची

सुन आहे. त्यामुळे तीचा छळ केल्या जातो. खेडयांमध्ये आजही मुलींच्या बाबतीत हाच दृष्टीकोण ठवेतात व मुलींच्या शिक्षणावर मुलांच्या तुलनेत कमी पैसे, खर्च करतात. आपण आज 21 व्या शतकात वावरत असो वा आधुनिकतेचे धडे घेत असलो तरी शेवटी कुटूंब/समाज हाच विचार करतो की, मुलगा असावा, मुलगा वंशाचा दिवा असतो आणि आपला वंश पुढे चालावा यासाठी मुलगा असणे फार गरजेचे आहे. नाही तर आपल्या वंशाचा नाव नष्ट होईल किंवा मिटेल आजही काही प्रमाणात का होईला परंतु डॉक्टरकडे येतात आणि गर्भातील मुंलाचे आरोग्य विचारण्या ऐवजी मुलगा की मुलगी हे, विचारतात. सोनोग्राफी ही फक्त लिंगनिदान करण्यासाठी नसते तर बाळाचे आरोग्य तपासण्यासाठी असते हे हया लोकांना कसे समजावून दयायचे हाच प्रश्न डॉक्टरसमोर पडतो. भारतामध्ये आर्थिक विकषनशिलता येत असली तरी स्त्रियांबद्दलचा दृष्टीकोन अजुनही बदललेला नाही. आजही मुलीच लग्न करतांना हूंडा दिल्या जातो फक्त त्याचे स्वरूप बदलेले आहे. काही वस्तुच्या स्त्री मध्यता म्हणून कोणत्या ना कोणत्या कारणानी वधुपक्षांकडून वरपक्षाकडे पैसा जातोच. त्यामुळे कटूंबात किंवा समाजात मुलीच्या जन्माचे स्वागत करीत नाहीत.

ज्या देशामध्ये राणी लक्ष्मीबाई राजमाता जिजाऊ, अहिज्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, प्रतीभाताई पाटील, इंदिरा गांधी, कीरण बेदी जन्माला आल्या त्या देशातच मुलींचा जन्म नाकारण्यात यावा हि या देशाची फार मोठी शोकांतिका आहे.

निष्कर्ष :–

वैदिक काळात मुला–मुलींमध्ये समानता असल्याचे दिसून येते परंतु उत्तर वैदिक कालखंडापासून स्त्रियांचे महत्व कमी झाल्याचे आढळुन आले. आज आपला भारत 21 व्या शतकाच्या उंबरठयावर उभा आहे. आधुनिकतेचे स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतू स्त्रियाबद्दल समाजात/कुटूंबात फारसे परिवर्तन झाल्याचे दिसून येत नाहीत. विशेषतः ग्रामीण भागात हे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येत आहे. जेवढे शहर मोठे तेवढे स्त्रिया बद्दलचे विचार अधिक चांगले पण जेवढे खेडे छोटे आणि अशिक्षीत त्यामध्ये स्त्रियांवर बंधणे जास्त प्रमाणात असल्याचे दिसून येत आहेत. स्त्रियांमध्ये वैवाहिक समस्या, वैवाहीक जीवनात असंतोष असणे ही फार मोठी समस्या दिसून येते. स्त्रि–पुरूष सहजीवन सहज व सरळ आनंदमय जगता यावा म्हणून काहीतरी उपाययोजना करणे गरजेचे आहे. स्त्रियांमध्ये सहनशिलता व साहस हे गुण जन्मतःच असतात कारण मुलगी जन्माला आली की तीला वाढवत असतांना किंवा तीच्यावर संस्कार करतांना लहानपणापासून तिच्या मनावर बिंबविल्या जाते की, तु मुलगी पराया धन म्हणून मुलीच्या उच्च शिक्षणावर फारसे पैसे खर्च केल्या जात नाही. लग्नानंतर नौकरीचे पैसे आई–वडिलांना देणार नाही म्हणून मुलींच्या शिक्षणावर विशेष पैसे खर्च करीत नाहीत. तर उलट लग्नानंतर पतीसोबत पटत नसेल तर आई–वडिल मुलीला सांगतात की, लग्नानंतर सासरच तुझ घर आहे. तु आमच्यासाठी परायाधन आहेस असे जर आपण मुलींना सांगितले तर त्याच्या पाठीशी कोणीही उभा नाही असे विवाहीत स्त्रियांना वाटेल ते त्यामुळे आत्महत्येचेही प्रमाण वाढेल आणि गुन्हेगारी वाढेल यासाठी मुलींना अबला नाही तु सबला आहेस तु तुझे रक्षण करू शकते अशा प्रकारचे शिक्षण, संस्कार मुलींना जन्मापासून दयायला हवेत. आज स्त्रियांनी प्रत्येक क्षेत्रात गगनभरारी घेतली आहे.पुरूषांच्या खांदयाला खंदा लावून प्रत्येक क्षेत्रात काम करीत आहे. कायदयानी स्त्रियांना समान अधिकार दिले आहेत त्या अधिकाराचा वापर करून. परंतु स्त्रिया आपल्या अधिकार आणि कर्तव्यांचा पुरेपूर वापर करून घेत नाही तर कुटूंबातील लोकच तीच्या कामात हस्तक्षेप करतात. स्वनिर्णयानी स्त्रियांना पुढे जावू दिले तर निश्चितच समाजात परीवर्तन होवुन स्त्रि–पुरूष समानता निर्माण होईल व स्त्रि–भृणहत्या थांबेल यात काही वाद नाही.

उपाय :–

1) स्त्रि सुरक्षित नाही तर स्वरक्षीत असावी.
2) शैक्षणिक विकासाबरोबरच स्त्रियांमध्ये सामंजस्य व शिस्त असावी
3) शिक्षणाचा परिणाम विनयशिलतेमध्ये व्हायला पाहिजे 'विद्या विनेयन शोभते'
4) स्त्रि–पुरूषांनी एक दुसऱ्यांसोबत मैत्रीपूर्वक राहायला हवी
5) मुलगा–मुलगी यांच्यात भेदभाव न करणे.
6) मुलीसुध्दा वंशाचा दिवा लावू शकता म्हणजेच मुलांचे सर्व कामे मुली करू शकतात अशाप्रकारे समाजात प्रबोधन करणे किंवा परीवर्तन घडवून आणणे.
7) लिंग तपासणी न करता सुदृढ बाळाला जन्म देणे
8) मुलगा किंवा मुलगी असो दाम्पत्यांनी, खुश राहणे.
9) मुलींच्या उच्च व तांत्रीक शिक्षणाकडे लक्ष देणे.
10) बदलल्या सामाजिक परिस्थितीची जाणीव करून देणे.

11) वैचारीक परीवर्तन घडवून आणणे.
12) स्त्रि–पुरूष समान वागणूक व स्त्रियांविषयी सकारात्मकता समाजात निर्माण करणे.
13) स्त्रियांमध्ये असलेल्या संघटन शक्तीचा विकास करणे.
14) स्त्रियांना त्यांच्या अधिकार व कर्तव्याविषयी जागृक करणे.
15) स्त्रियांना स्वावलंबी बनविणे.

संदर्भसूची :–

1) जडिया, प्रभावती : 'हिन्दु नारी' अर्जुन पब्लिशिंग हाऊस दिल्ली 2010.
2) राजकुमार : 'नारी–शोषण' अर्जुन पब्लिशिंग हाऊस दिल्ली 2001.
3) राजकुमार : 'महिला एवं विकास' अर्जुन पब्लिसिंग हाऊस दिल्ली 2010.
4) मिश्रा, प्रिती : 'हिंदू महिलाओं के जीवन में धर्म काम महत्व' आदित्य पब्लिशर्स दिल्ली 2009.
5) प्रा. कवि; माधवी : 'स्त्रि विचारधन' उन्मेष प्रकाशन पुणे 2000.
6) साने; गिता : 'भारतीय स्त्रि जीवन' मौज प्रकाशन मुंबइ 2001.

भारताच्या जीडीपी'त (GDP) ८.२ % दराने वाढ

डॉ. राजेश गं. उंबरकर
अर्थशास्त्र विभाग
नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड.

गेल्या १० वर्षांतील भारताच्या जीडीपी वाढीचा दर बदलता राहिला आहे, ज्यात काही वर्षांमध्ये वाढ झाली आहे, तर काही वर्षांमध्ये कमी झाली आहे. उदाहरणार्थ, २०१६ मध्ये वाढीचा दर 6.98% होता, तर २०१७ मध्ये नोटाबंदीमुळे तो 5.56% पर्यंत खाली आला होता. २०२३-२४ च्या चौथ्या तिमाहीत, भारतीय अर्थव्यवस्थेत ६.३% ची वाढ झाली.

आज दि २८ नोव्हेंबर २०२५ भारताने जगाला आपली ताकद दाखवली १८ महिन्यांतील सर्वोत्तम आकडे, जीडीपी'त ८.२% दराने वाढ झाली. २०२५-२६ च्या दुसऱ्या तिमाहीत भारताचा वास्तविक जीडीपी ८.२% दराने वाढला. भारताची राजकोषीय तूट ८.२५ लाख कोटी होती.

दुसऱ्या तिमाहीत भारताच्या अर्थव्यवस्थेने उल्लेखनीय कामगिरी केली. चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या दुसऱ्या तिमाहीत भारताचा वास्तविक जीडीपी ८.२% दराने वाढला, सरकारी आकडेवारीनुसार, मागील आर्थिक वर्षाच्या याच तिमाहीत तो ५.६% होता. सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, जुलै-सप्टेंबर तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्थेने ८.२% विकास दर गाठला, जो सहा तिमाहींमधील सर्वाधिक आहे. जीएसटी दरांमध्ये कपात झाल्यामुळे कारखान्यांनी वापर वाढण्याची अपेक्षा ठेवून अधिक उत्पादने तयार केली म्हणून हे घडले. दुसऱ्या तिमाहीत जीडीपी (GDP) वाढ मागील तीन महिन्यांतील ७.८% आणि वर्षापूर्वी याच कालावधीत ५.६% वाढीपेक्षा चांगली होती. जीडीपीमध्ये १४% वाटा असलेल्या उत्पादन क्षेत्राने दुसऱ्या तिमाहीत ९.१% वाढ नोंदवली.

२०१४ ते २०२२ दरम्यान, भारताचे सकल देशांतर्गत उत्पादन (GDP) दरडोई (दरडोई उत्पन्नाचे मोजमाप) US$५,००० (£४,०००) वरून US$७,००० पेक्षा जास्त झाले - आठ वर्षांत सुमारे ४०% वाढ. ही गणना क्रयशक्ती समता वापरते, जी कालांतराने आणि देशांमधील सामान्य क्रयशक्तीची तुलना करण्याचा एक मार्ग आहे.

काहींच्या मते, मोदींच्या पहिल्या कार्यकाळात ₹५०० (£४.८०) आणि ₹१००० (£९.६०) च्या नोटा चलनातून काढून टाकण्याचा चुकीचा प्रयत्न करूनही ही वाढ झाली. नोटा रद्द केल्याने रोख रकमेची तीव्र टंचाई निर्माण झाली, ज्यामुळे दरडोई जीडीपीची वाढ २०१६ मध्ये ६.९८% वरून २०१७ मध्ये ५.५६% झाली. 2025-26 या आर्थिक वर्षात तो 6.5 ते 7% दरम्यान राहण्याचा अंदाज आहे.

अर्थव्यवस्थेतील काही महत्वपूर्ण बाबी :

- **GDP मध्ये वाढ (2014-2024):** भारताचा GDP $2 ट्रिलियन वरून $3.7 ट्रिलियन डॉलर्सवर पोहोचला. म्हणजेच, या काळात $1.7 ट्रिलियन डॉलर्सची वाढ झाली आहे.
- ३ ऑक्टोबर २०२५ रोजी भारताचा परकीय चलन साठा ६२,१४,३६४ कोटी रुपये (यूएस$ ७०१.२४ अब्ज) होता.
- सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या (MOSPI) आकडेवारीनुसार, सप्टेंबर २०२५ मध्ये भारताचा ग्राहक किंमत निर्देशांक (CPI) आधारित महागाई आठ वर्षांपेक्षा जास्त काळातील नीचांकी १.५४% वर पोहोचला, जो ऑगस्ट २०२५ मध्ये २.०५% होता. अन्न आणि इंधनाच्या किमती कमी झाल्यामुळे हा दर कमी झाला.
- सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने (MoSPI) जारी केलेल्या आकडेवारीनुसार, भारताचा ग्राहक किंमत निर्देशांक (CPI) - एकत्रित महागाई मार्च २०२५ मध्ये ३.३४% होती, जी मार्च २०२४ मध्ये ४.८५% होती.
- २२ मे २०२५ पर्यंत भारताची आर्थिक वर्ष २६ साठीची गहू खरेदी २९.७ दशलक्ष टनांवर पोहोचली आहे, जी चार वर्षातील सर्वाधिक आहे आणि १३.५% वार्षिक वाढ आहे. ११५.४३ दशलक्ष टनांचे मजबूत उत्पादन, अनुकूल हवामान आणि प्रमुख राज्यांमध्ये किमान आधारभूत किमतीपेक्षा (MSP) जास्त बोनस यामुळे ही वाढ झाली आहे. भारतीय अन्न महामंडळाला हंगामाच्या अखेरीस खरेदी ३२.५ दशलक्ष टनांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे साठा ४४ दशलक्ष टनांपर्यंत वाढेल, जो सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी आवश्यक असलेल्या १८.४ दशलक्ष टनांपेक्षा खूपच जास्त आहे.
- ऑगस्ट २०२५ मध्ये भारताचे उत्पादन क्षेत्र आणखी मजबूत झाले, ज्यामुळे मागणीत वाढ झाली ज्यामुळे कारखाना ऑर्डर आणि उत्पादन वाढले. कंपन्यांनी इनपुट खरेदी आणि भरती वाढवली, ज्यामुळे व्यवसायाचा आत्मविश्वास वाढला. इनपुट इन्व्हेंटरीजमध्ये वाढ होत राहिली आणि नऊ महिन्यांत पहिल्यांदाच तयार वस्तूंचा साठा वाढला. एचएसबीसी इंडिया मॅन्युफॅक्चरिंग परचेसिंग मॅनेजर्स इंडेक्स (पीएमआय) जुलैमधील ५९.१ वरून ऑगस्टमध्ये ५९.३ वर पोहोचला, जो १७ वर्षांहून अधिक काळातील ऑपरेटिंग परिस्थितीत सर्वात मजबूत सुधारणा आहे, ज्यामध्ये मध्यम खर्चाचा दबाव आणि विक्री किंमतींमध्ये तीव्र वाढ झाली आहे
- जुलैपासून परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार (FII) भारतीय शेअर बाजारात निव्वळ विक्रेते आहेत, त्यांनी १ जुलै २०२५ ते ८ सप्टेंबर २०२५ दरम्यान १ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त (US$ ११.३६ अब्ज) गुंतवणूक काढून घेतली आहे, ज्यामध्ये सप्टेंबरमधील ७,८०० कोटी रुपये (US$ ८८६.४ दशलक्ष) गुंतवणूक समाविष्ट आहे, तर ऑगस्ट २०२५ मध्ये, देशांतर्गत

संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (DIIs) सलग २५ व्या महिन्यात निव्वळ गुंतवणूक नोंदवली, ९४,८२९ कोटी रुपये (US$ १०.८ अब्ज) गुंतवणूक केली, जी १० महिन्यांतील सर्वाधिक आहे.

- २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत भारताने ४९,७४५ कोटी रुपये (५.७ अब्ज अमेरिकन डॉलर्स) किमतीचे ३०१ प्रायव्हेट इक्विटी (पीई) सौदे नोंदवले, जे मागील तिमाहीच्या तुलनेत ७% वाढले. भारत-केंद्रित पीई-व्हीसी फंडांनी २२ फंडांमधून २१,५७६ कोटी रुपये (२.४७ अब्ज अमेरिकन डॉलर्स) उभारले, जे आयटी आणि आयटीईएस क्षेत्रात (२.४ अब्ज अमेरिकन डॉलर्स) जोरदार गुंतवणूकीमुळे १४८% वार्षिक वाढ आहे. गुंतवणूक मूल्यात मुंबई आघाडीवर आहे, तर करारांच्या प्रमाणात बंगळुरू अव्वल आहे, ज्यामुळे भारतातील आघाडीचे गुंतवणूक केंद्र म्हणून त्यांचे स्थान पुन्हा सिद्ध झाले.

८.२५ लाख कोटींवर राजकोषीय तूट;

दरम्यान, या आर्थिक वर्षांच्या पहिल्या सात महिन्यांत, एप्रिल ते ऑक्टोबर दरम्यान भारताची राजकोषीय तूट ८.२५ लाख कोटी होती. ही वार्षिक अंदाजाच्या ५२.६% आहे. ही राजकोषीय तूट गेल्या वर्षीच्या ४६.५% पेक्षा जास्त आहे.

लोकांच्या परिश्रम व उद्यमशीलतेचे परिणाम :

जीडीपीच्या मजबूत आकड्यांबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM Narendra Modi) म्हणाले, २०२५-२६ च्या दुसऱ्या तिमाहीत ८.२ टक्के जीडीपी विकास दर लोकांच्या कठोर परिश्रम आणि उद्यमशीलतेचे प्रतिबिंबित करतो. २०२५-२६ च्या दुसऱ्या तिमाहीत ८.२ टक्के जीडीपी विकास दर खूप उत्साहवर्धक आहे. हे आमच्या विकास समर्थक धोरणांचा आणि सुधारणाचा प्रभाव प्रतिबिंबित करते. हे आमच्या लोकांच्या कठोर परिश्रम आणि उद्योजकतेचे देखील प्रतिबिंबित करते आमचे सरकार सुधारणांना पुढे नेत राहील."

औद्योगिक उत्पादन डेटा १ डिसेंबरला होणार जाहीर

सरकारने असेही जाहीर केले की, ऑक्टोबर २०२५ साठी भारताचा औद्योगिक उत्पादन डेटा १ डिसेंबर रोजी जाहीर केला जाईल, अखिल भारतीय औद्योगिक उत्पादन निर्देशांक (आयआयपी) डेटा सहसा दर महिन्याच्या २८ तारखेला किंवा २८ तारखेला सुट्टी असल्यास पुढील कामकाजाच्या दिवशी जाहीर केला जातो. सरकारने एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे की ऑक्टोबर २०२५ चा आयआयपी २८ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध होणार होता. २०२५-२६ च्या दुसऱ्या तिमाहीसाठी (जुलै-सप्टेंबर) जीडीपीचा तिमाही अंदाज आयआयपी प्रकाशनासोबत प्रकाशित होणार असल्याने, ऑक्टोबर २०२५ साठी आयआयपी प्रकाशनाची तारीख बदलण्यात आली आहे,

अमेरिकेन टेरिफ लावले तरी GDP त वाढ:

अमेरिकेनं भारतावर ५० टक्के टॅरिफ लावलाय. भारत आणि चीन रशियाकडून तेलाची खरेदी करतात. या पैशांचा वापर रशिया हा युक्रेनविरोधातील युद्धात फंड म्हणून करत आहे, त्यामुळे

युद्धविराम होत नसल्याचा आरोप डोनाल्ड ट्रम्प यांनी केला. दरम्यान डोनाल्ड ट्रम्प यांनी लावलेल्या टॅरिफचा मोठा परिणाम भारताच्या जीडीपीवर होईल असा अंदाज तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत होता. मात्र हे सगळे अंदाज चुकीचे ठरताना दिसत आहेत. कारण जीडीपीची आकडेवारी समोर आली असून, भारतानं मोठी झेप घेतल्याचं दिसत आहे.

इतर क्षेत्रातील वाढ:

चालू आर्थिक वर्षाच्या जुलै-सप्टेंबर कालावधीत देशाचा नाममात्र जीडीपी ८.७ टक्के दराने वाढला असल्याची माहिती मंत्रालयानं दिलीय. दरम्यान दुय्यम आणि तृतीयक क्षेत्रांची मजबूत कामगिरीमळे जीडीपी वाढीचा दर आठ टक्क्यांपेक्षा जास्त राहिलाय, असं सरकारने जारी केलेल्या निवेदनात म्हटलंय. आर्थिक वर्ष २५ च्या दुसऱ्या तिमाहीत दुय्यम क्षेत्राचा विकास दर ८.१ टक्के आणि तृतीयक क्षेत्राचा विकास दर ९.२ टक्के होता.

दुय्यम क्षेत्रात येणाऱ्या उत्पादन क्षेत्राचा विकास दर ९.१ टक्के आणि बांधकाम क्षेत्राचा विकास दर ७.२ टक्के राहिला आहे. तृतीयक क्षेत्रातील वित्तीय, रिअल इस्टेट आणि व्यावसायिक सेवांमध्ये १०.२ टक्के वाढ झालीय. सरकारी आकडेवारीनुसार, कृषी आणि संलग्न क्षेत्रांमध्ये ३.५ टक्के वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष २५ च्या दुसऱ्या तिमाहीत खासगी उपभोग खर्च (PFCE) पीएफसीई ७.९ टक्क्यांनी वाढला. हा मागील आर्थिक वर्षात ६.४ टक्के होता. आर्थिक वर्ष २५ च्या दुसऱ्या तिमाहीत निर्यात ५.६ टक्क्यांनी वाढली आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या याच कालावधीत ३ टक्के होती. चालू आर्थिक वर्षाच्या जुलै-सप्टेंबर कालावधीत आयात १२.८ टक्क्यांनी वाढली आहे.

मजबूत उत्पादन क्षेत्र आणि वाढलेला ग्राहक खर्च यामुळे ही वाढ शक्य झाली आहे. गेल्या वर्षीच्या याच तिमाहीत (FY24-25) ही वाढ 5.6 % होती. तर, चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत ती 7.8% होती, जी पाच तिमाहींमधील सर्वाधिक होती.

भारतीय रिझर्व्ह बँकेने (RBI) 7% वाढीचा अंदाज वर्तवला होता, त्यापेक्षा ही वाढ खूपच जास्त आहे. महागाई विचारात न घेता मोजलेली नॉमिनल जीडीपी वाढ या तिमाहीत8.7% राहिली. विशेष म्हणजे, पहिल्या तिमाहीत नॉमिनल जीडीपी वाढ तीन तिमाहींच्या नीचांकी पातळीवर, म्हणजे 8.8% वर आली होती. या जबरदस्त वाढीचा शेअर बाजार, सोन्याच्या किमती आणि व्याज दरांवर काय परिणाम होईल, हे आपण सोप्या भाषेत समजून घेऊया.

GDP वाढल्याने होणारा परिणाम

सोन्याच्या किंमतीवर परिणाम

जीडीपीची वेगवान वाढ आणि सोन्याच्या किंमती यांच्यात व्यस्त संबंध असतो. याचा अर्थ असा की जेव्हा अर्थव्यवस्था (जीडीपी) वेगाने वाढते, तेव्हा सोन्याच्या किमतीत सामान्यतः घट होते किंवा त्या स्थिर राहतात. जेव्हा जीडीपीची गती वाढते, तेव्हा ते अर्थव्यवस्थेचे मजबूत आरोग्य आणि कंपन्यांच्या नफ्यात वाढ होण्याची अपेक्षा दर्शवते. यामुळे गुंतवणूकदारांचा धोका पत्करण्याचा कल वाढतो. गुंतवणूकदार सोन्यासारख्या सुरक्षित गुंतवणुकीतून पैसे काढून शेअर्स, रिअल इस्टेट आणि

बॉण्ड्ससारख्या अधिक जोखमीच्या मालमत्तांमध्ये गुंतवतात, कारण त्यांना त्यातून अधिक परतावा मिळण्याची अपेक्षा असते. सोन्याची मागणी कमी झाल्यामुळे त्याच्या किमतीवर दबाव येतो.

शेअर बाजारावरील परिणाम :

दुसऱ्या तिमाहीतील जीडीपीचे आकडे अपेक्षेपेक्षा चांगले आले असले तरी, तज्ज्ञांच्या मते याचा शेअर बाजारावर फारसा मोठा परिणाम होणार नाही. याचे कारण म्हणजे अमेरिकेच्या टॅरिफचा पूर्ण परिणाम ऑक्टोबर-डिसेंबर तिमाहीच्या जीडीपी आकडेवारीत दिसेल. मात्र, तिसऱ्या तिमाहीत जीएसटीमधील कपात आणि सणासुदीच्या काळात वाढलेली मागणी यांचाही सकारात्मक परिणाम दिसून येईल. तरीही, सेंसेक्स आणि निफ्टी 50 मध्ये थोडी तेजी येण्याची शक्यता आहे. पण, मिड-कॅप आणि स्मॉल-कॅप कंपन्यांच्या शेअर्समध्ये फारशी उलथापालथ होण्याची अपेक्षा नाही. याचे मुख्य कारण म्हणजे या कंपन्यांच्या शेअर्सची किंमत आधीच खूप वाढलेली आहे. तसेच, बाजारात पैशांची कमतरता जाणवत आहे.

इक्विनॉमिक्स रिसर्च प्रायव्हेट लिमिटेडचे संस्थापक आणि हेड ऑफ रिसर्च जी. चोक्कलिंगम यांनी मिंटला सांगितले की, 'जीडीपीचे आकडे सकारात्मक आहेत. पण, मला वाटत नाही की पैशांच्या कमतरतेमुळे याचा व्यापक बाजारावर मोठा परिणाम होईल.' ते पुढे म्हणाले, 'सेंसेक्स आणि निफ्टी 50 वाढत राहतील. या आर्थिक वर्षाच्या अखेरपर्यंत यात 3-5% वाढ शक्य आहे, जी मजबूत आर्थिक आकडेवारीमुळे टिकून राहील.'

व्याज दर

जिओजित इन्व्हेस्टमेंट्सचे चीफ इन्व्हेस्टमेंट स्ट्रॅटेजिस्ट व्ही. के. विजयकुमार यांच्या मते, दुसऱ्या तिमाहीतील जीडीपीचे आकड्यांमुळे बाजारातील तेजीला आणखी बळ मिळेल. पण, यामुळे रिझर्व्ह बँकेकडून व्याज दरात कपात होण्याची शक्यता कमी होऊ शकते. विजयकुमार यांनी सांगितले की, 'या आकडेवारीचा एक परिणाम असा आहे की डिसेंबरमध्ये व्याज दरात कपात होण्याची शक्यता नाही. अर्थव्यवस्थेला सध्या कोणत्याही अतिरिक्त मौद्रिक प्रोत्साहनाची गरज नाही.' भारतीय रिझर्व्ह बँकेची मौद्रिक धोरण समिती ३ ते ५ डिसेंबर दरम्यान बैठक घेणार आहे. याच बैठकीत व्याज दरांबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल.

थोडक्यात अल्पावधीत चढ-उतार असले तरी, भारताची अर्थव्यवस्था जगात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जात आहे. गेल्या काही वर्षांत भारताचा आर्थिक प्रवास उल्लेखनीय वाढ आणि जागतिक स्तरावर त्याच्या स्थानात सातत्याने वाढ होत आहे. भारत २०२७ पर्यंत ४,२६,४५,००० कोटी रुपये (५ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्स) च्या जीडीपीपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे आणि २०२८ पर्यंत जर्मनीला मागे टाकण्याच्या मार्गावर आहे. वाढत्या रोजगार आणि वाढत्या खाजगी वापरामुळे, वाढत्या ग्राहकांच्या भावनेमुळे, येत्या काही महिन्यांत जीडीपी वाढीला चालना मिळेल. भारत ही प्रामुख्याने देशांतर्गत मागणीवर आधारित अर्थव्यवस्था आहे, जिथे वापर आणि

गुंतवणूकीचा वाटा ७०% आर्थिक क्रियाकलापांमध्ये आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेत लवचिक वाढ दिसून येत आहे, त्याला मजबूत देशांतर्गत मागणी, धोरणात्मक सुधारणा आणि निरोगी गुंतवणूक पाइपलाइनचा पाठिंबा आहे, त्यामुळे प्रमुख क्षेत्रांमध्ये अनेक नवीन प्रकल्प आणि विकास सुरू आहेत. जागतिक बँकेच्या मते, भारताने अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी विकासाभिमुख धोरणे लागू करताना असमानता कमी करण्यास प्राधान्य दिले पाहिजे.

संदर्भ:

1. दैनिक सकाळ
2. लोकसत्ता
3. लोकमत
4. RBI वेबसाइट
5. Times of India

भारतीय स्वातंत्र्य चळवळ आणि २०व्या शतकातील कला प्रवाहांचा प्रभाव

डॉ. मुक्तानंद नवघरे
नागपूर

सारांश

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत चित्रकार आणि शिल्पकार यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. २०व्या शतकातील कला-जागृती, बंगाल स्कूलचा पुनरुज्जीवनवाद, स्वदेशी चळवळीची सांस्कृतिक अभिव्यक्ती आणि आधुनिक भारतीय कलाप्रवाह यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्य संघर्षात लोकजागृतीची महत्त्वाची भूमिका बजावली. नंदलाल बोस, अबनिंद्रनाथ ठाकूर, रामकिंकर बैज यांसारख्या कलाकारांनी आपल्या कलाकृतींच्या माध्यमातून ब्रिटिश राजवटीचे अत्याचार उघड केले, ऐतिहासिक घटनांचे दृश्य दस्तावेजीकरण केले आणि जनमानसात राष्ट्रभावनेची जागृती निर्माण केली. प्रस्तुत संशोधनपत्रात या कलाकारांच्या योगदानाचा, बंगाल स्कूलच्या प्रभावाचा आणि कलाप्रवाहांच्या राष्ट्रवादी विचारप्रवाहावर झालेल्या परिणामांचा सखोल अभ्यास केला आहे.

कीवर्ड्स

भारतीय स्वातंत्र्य चळवळ, बंगाल स्कूल, स्वदेशी आंदोलन, आधुनिक भारतीय कला, नंदलाल बोस, अबनिंद्रनाथ ठाकूर, रामकिंकर बैज, राष्ट्रवाद, शिल्पकला, कंपनी पेंटिंग, दृश्य दस्तावेजीकरण.

प्रस्तावना

भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही केवळ राजकीय आणि सामाजिक लढाई नव्हती, तर सांस्कृतिक प्रतिकाराचीही एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया होती. २०व्या शतकातील भारतीय चित्रकला व शिल्पकला ही राष्ट्रवादी भावनांचे प्रभावी माध्यम ठरली. कलाकारांनी केवळ कलाकृती निर्माण केल्या नाहीत, तर जनतेत देशभक्ती जागविणे, ब्रिटिश अत्याचारांचे चित्रण करणे आणि स्वावलंबनाचा संदेश पोहोचविणे या सर्व भूमिका निभावल्या. स्वातंत्र्यलढ्यातील कलाकारांनी परंपरागत भारतीय कलाभाषेचा पुनर्शोध घेत पश्चिमेकडील कलाशैलींचे नव्याने रूपांतर केले. चळवळीतील राजकीय घटनांची दृश्यरूपे, स्वातंत्र्यसैनिकांचे प्रतीकात्मक चित्रण आणि स्वातंत्र्याची आस या सगळ्यांनी कलाक्षेत्राला नवीन दिशादर्शन दिले. बंगाल स्कूल, बॉम्बे प्रोग्रेसिव्ह ग्रुप यांसारख्या कलचळवळींनी भारतीय ओळख दृढ करण्यास हातभार लावला. कलाकृतींमधील रंग, रेषा, प्रतिमा आणि प्रतीकांमध्ये भारतीयत्व, अध्यात्म आणि संघर्षाची जाणीव प्रकर्षाने जाणवते. या कलानिर्मितीमुळे स्वातंत्र्यलढ्याला व्यापक सांस्कृतिक अभिव्यक्ती मिळाली. म्हणूनच भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे अध्ययन करताना कला आणि कलाकारांचे योगदान हे अत्यंत मौल्यवान व आवश्यक ठरते. कला ही केवळ सौंदर्यभानाची भाषा नसून समाजपरिवर्तनाचे साधन ठरू शकते, याची सशक्त साक्ष भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या कलाकृती आजही देतात.

औपनिवेशिक काळातील भारतीय कला व 'कंपनी पेंटिंग'

ब्रिटिश आगमनानंतर भारतीय पारंपरिक चित्रशैलींचा ऱ्हास झाला. १८व्या शतकात उदयास आलेल्या 'कंपनी पेंटिंग' या वास्तववादी जलरंग शैलीने भारतीय कलात्मकता दडपली. या कालखंडाने कला व सांस्कृतिक ओळखीवरील औपनिवेशिक प्रभाव स्पष्टपणे दाखवला. 'कंपनी पेंटिंग'चा मुख्य हेतू भारतीय समाज, निसर्ग, प्राणी-पक्षी, पोशाख, उत्सव आणि लोकजीवन यांचे दस्तऐवजीकरण करणे हा होता. त्यामुळे या शैलीत भारतीय विषय असले तरी दृष्टिकोन औपनिवेशिक होता. कलाकारांना ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या अपेक्षेनुसार निसर्गनिष्ठ, तपशिलप्रधान व शास्त्रीय शैलीचा अवलंब करावा लागत असे. यामुळे भारतीय चित्रकलेतील प्रतीकात्मकता, अध्यात्मिकता, शैलीगत साधेपणा आणि कल्पनारम्यता यांना दुय्यम स्थान मिळाले. भारतीय कलावंतांचा मूळ दृष्टिकोन बाजूला सारून ब्रिटिशांच्या नजरेतून भारत दर्शविण्याची प्रक्रिया सुरू झाली. परिणामी, कला भारतीय सांस्कृतिक ओळखीचा अभिन्न भाग राहिला नाही; ती प्रशासनिक

नोंदीसारखी 'दृश्य माहिती' पुरवणारी गोष्ट बनली. 'कंपनी पेंटिंग'मुळे विविध प्रादेशिक चित्रशाळांना राजस्थानी, पहाडी, मुगल किंवा दखनी—नवीन ग्राहक मिळाले, परंतु कलात्मक स्वातंत्र्य हरपले. औपनिवेशिक दडपशाहीमुळे भारतीय चित्रकलेचे केंद्र बदलले; राजाश्रयी कला मागे पडली आणि व्यापारी आश्रय वाढला. याच काळात भारतीय कलाकारांनी जगण्यासाठी शैलीत फेरबदल केले, परंतु त्यांच्या कलेतील स्वाभाविक भारतीयत्व कमी होत गेले. तथापि, या परिस्थितीने पुढे भारतीय कलाचळवळीला राष्ट्रवादी जागृतीसाठी प्रवृत्त केले. बंगाल स्कूलसारख्या चळवळींनी औपनिवेशिक प्रभावाला उत्तर देत भारतीय कलाभाषेचा नव्याने शोध घेतला. या सर्व प्रक्रियेत 'कंपनी पेंटिंग' भारतीय कलाविश्वातील संक्रमणाचा महत्त्वपूर्ण टप्पा ठरला—एक असा टप्पा ज्याने औपनिवेशिक नियंत्रण, सांस्कृतिक हस्तक्षेप आणि कलात्मक ओळखीचे राजकारण स्पष्ट केले. भारतीय कला कशी एका सत्ताधारी नजरेखाली बदलली आणि नंतर तिच्या पुनर्जागरणाचा मार्ग कसा मोकळा झाला, याचे हे अचूक ऐतिहासिक उदाहरण आहे.



भारत मत अबनिंद्रनाथ टागोर

बंगाल स्कूलचा उदय आणि अबनिंद्रनाथ टागोर

२०व्या शतकाच्या प्रारंभी बंगाल स्कूल ऑफ आर्टने भारतीय चित्रकलेला नवजीवन दिले. या चळवळीचे नेतृत्व अबनिंद्रनाथ टागोर यांनी केले. बंगाल स्कूलने भारतीय परंपरेतील अध्यात्मिकता, रंगरचना, प्रतीकात्मकता आणि लोककला यांना प्राथमिकता दिली. त्यांचा उद्देश स्वदेशी चळवळीच्या संदर्भात भारतीय ओळख दृढ करणे आणि पाश्चात्त्य भौतिकतावादाला प्रतिसाद देणे हा होता. टागोर यांनी विद्यार्थ्यांना मुघल मिनिएचरच्या शैलीत चित्रकलेची शिकवण दिली आणि जपानी व चिनी कलाशैलीतून प्रेरणा घेण्यास प्रोत्साहित केले. "भारत माता" हे त्यांचे चित्र या चळवळीचे प्रमुख प्रतीक ठरले.

भारतीय राष्ट्रवादी कला चळवळ व तिची वैशिष्ट्ये

राष्ट्रवादी चळवळीमध्ये कला हा जनजागृतीचा प्रभावी माध्यम बनली. चित्रकारांनी भारतीय संस्कृती, ऐतिहासिक प्रसंग, पुराणकथा आणि सामाजिक जीवन यांचे चित्रण करून जनतेत देशभक्तीची जाणीव निर्माण केली. या चळवळीच्या वैशिष्ट्यांमध्ये स्वदेशी कलाप्रणालींचा प्रचार, पाश्चात्त्य शैलींचा बहिष्कार, आणि भारतीय विषयांचा सांस्कृतिक अभिव्यक्तीमधून प्रसार यांचा समावेश होता. लोकजीवन, ग्रामीण जीवन, नैसर्गिक दृश्ये आणि ऐतिहासिक प्रसंग यांना कलाकृतींमध्ये अधोरेखित केले गेले.

स्वातंत्र्यलढ्यातील चित्रकला व प्रचारकला

चित्रकलेचा वापर स्वातंत्र्यलढ्यात जनजागृतीसाठी केला गेला. नंदलाल बोस, अबनिंद्रनाथ टागोर यांसारख्या कलाकारांनी ऐतिहासिक नेते, युद्धदृश्ये आणि राष्ट्रवादी प्रतीक चित्रित करून लोकांना प्रेरणा दिली. कलाकृतींच्या माध्यमातून स्वातंत्र्यवादी संदेश प्रसारित होतो, लोकांच्या मनात अन्यायाविरुद्ध संघर्षाची भावना जागृत होते. प्रदर्शन, पोस्टर आणि चित्रफलकाद्वारे कलाकृती जनमानसापर्यंत पोहोचवल्या जात.

स्वातंत्र्यसैनिकांचे चित्रण व कलात्मक प्रतिमा

स्वातंत्र्यलढ्यातील नेत्यांचे चित्रण केवळ स्मरणार्थ नव्हते तर प्रेरणादायीही होते. झाशीची राणी, महात्मा गांधी, बाल गंगाधर टिळक यांची शौर्य व त्याग यांचे चित्रण केले गेले. अशा कलाकृतींमुळे समाजात स्वातंत्र्यासाठी

लढण्याची प्रेरणा निर्माण झाली. या चित्रकलेत ऐतिहासिक सत्य, प्रतीकात्मकता आणि भावनात्मक दृष्टिकोन यांचा सुंदर संगम दिसतो.

ब्रिटिशविरोधी व्यंगचित्रे व लोकप्रिय मुद्रणकला (ओलिओग्राफी/लिथोग्राफी)

ब्रिटिश अत्याचारांविरुद्ध व्यंगचित्रे आणि मुद्रणकलांचा वापर करून लोकजागृती केली गेली. ओलिओग्राफी व लिथोग्राफीच्या माध्यमातून स्वातंत्र्यलढ्यातील दृश्य प्रसार शक्य झाला. व्यंगचित्रांमध्ये ब्रिटिश प्रशासनाचे विनोदात्मक, टीकात्मक चित्रण करून जनतेत प्रतिकाराची भावना निर्माण केली गेली. हे दृश्य-राजकीय साधन स्वातंत्र्यसैनिकांना जनसमर्थन मिळवण्यास सहाय्यक ठरले.

भारतीय कला शिक्षणावर औपनिवेशिक प्रभाव

औपनिवेशिक काळात भारतीय कला शिक्षणावर ब्रिटिश धोरणाचा स्पष्ट प्रभाव पडला. पारंपरिक कलाशाळा कमी केल्या गेल्या, पाश्चात्त्य शैलीवर भर देण्यात आला. परंतु बंगाल स्कूल आणि शांतिनिकेतनसारख्या संस्थांनी भारतीय कलाभाषेचा पुनरुज्जीवन केला. विद्यार्थ्यांना भारतीय पारंपरिक तंत्र व प्रतीकात्मकता शिकवून कला स्वदेशी चळवळीशी जोडली गेली. ही प्रक्रिया भारतीय कलाक्षेत्रात स्वावलंबी दृष्टिकोन निर्माण करण्यास महत्त्वाची ठरली.

२०व्या शतकातील पुनरुज्जीवन आणि बंगाल स्कूल ऑफ आर्ट

२०व्या शतकाच्या प्रारंभी स्वदेशी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बंगाल स्कूलने भारतीय कलेला नवजीवन दिले. अबनिंद्रनाथ ठाकूर आणि हेवल यांचे योगदान महत्वाचे आहे. अबनिंद्रनाथ ठाकूर हे बंगाल स्कूल ऑफ आर्टचे संस्थापक आणि भारतीय चित्रकलेतील एक अग्रगण्य नेते होते. त्यांनी भारतीय परंपरेतील अध्यात्मिकता, लोककला, मिनिएचर शैली, अजन्ता व राजस्थानी चित्रकलेचा अभ्यास करून कलाकृतींमध्ये त्याचा समन्वय साधला. त्यांच्या शैलीत पारंपरिक भारतीय कलाविषयक चिन्ह, धार्मिक प्रतीक आणि ऐतिहासिक संदर्भ यांचा संगम दिसतो. रामायण, महाभारत, ऐतिहासिक घटना आणि सांस्कृतिक विषयांवर आधारित त्यांच्या चित्रांतून भारतीयत्व, स्वाभिमान आणि सांस्कृतिक पुनरुज्जीवन यांचा प्रभाव दिसतो. त्याचबरोबर त्यांनी जपानी व चिनी कलाशैलींचे तंत्र, वॉश तंत्र व सूक्ष्म रंगसंगती यांच्या प्रभावातून आपल्या कलाकृतींना एक वैशिष्ट्यपूर्ण रूप दिले.

अबनिंद्रनाथांचा उद्देश फक्त सौंदर्यनिर्मिती नव्हता, तर पाश्चात्त्य भौतिकतावादाला सांस्कृतिक उत्तर देणे आणि भारतीय स्वाभिमान व राष्ट्रीय ओळख कलाकृतींमध्ये साकार करणे हा होता. त्यांची कलाकृती लोकांच्या मनात भारतीयत्वाची जाणीव जागृत करीत आणि स्वदेशी चळवळीला कलात्मक आधार प्रदान करीत होती. त्यांच्या सगळ्यात प्रसिद्ध कलाकृतींपैकी "भारत माता" हे चित्र अत्यंत प्रभावी उदाहरण आहे. या चित्रात चार हात असलेली भारत माता विविध राष्ट्रीय आकांक्षा, स्वातंत्र्याची इच्छा आणि सामाजिक एकतेचे प्रतीक म्हणून उभी आहे. चित्रातील सौंदर्य, रंगसंगती आणि प्रतीकात्मकता एकत्र येऊन ते तत्कालीन स्वदेशी चळवळीसाठी जनजागृतीचे साधन बनले. हे चित्र भारतीय जनतेत देशभक्तीची जाणीव, स्वातंत्र्यासाठी लढण्याची प्रेरणा आणि औपनिवेशिक दडपशाहीविरुद्ध प्रतिकाराची भावना जागृत करणारे ठरले.

हेवल (E.B. Havell) यांनी बंगाल स्कूलला महत्त्वपूर्ण पाठिंबा दिला. त्यांनी भारतीय चित्रकलेचा अभ्यास केला, पारंपरिक तंत्र व शैली विद्यार्थ्यांना शिकवली आणि कलाकारांना भारतीय कलाक्षेत्राच्या पुनरुज्जीवनासाठी मार्गदर्शन केले. हेवलच्या मार्गदर्शनाखाली अबनिंद्रनाथ आणि त्यांच्या शिष्यांनी भारतीय कला व राष्ट्रवादाचा संगम साधला. या प्रयत्नांमुळे बंगाल स्कूलच्या चित्रकारांनी स्वदेशी चळवळीला कलात्मक शक्ती दिली, लोकांच्या मनात राष्ट्रभावना जागृत केली आणि भारतीय चित्रकलेत नव्या चेतनेचे संचार केला. आजही अबनिंद्रनाथ ठाकूर आणि हेवल यांच्या कार्याचा प्रभाव भारतीय चित्रकलेत स्पष्ट दिसतो. त्यांच्या कलाकृतींमध्ये अध्यात्मिकता, राष्ट्रीयता आणि सांस्कृतिक अभिव्यक्ती यांचा संगम, औपनिवेशिक काळातील प्रतिकाराची साक्ष आणि स्वदेशी चळवळीची प्रेरणा अद्याप भारतीय कलाविश्वात ताजगी राखते.

बंगाल स्कूलची वैशिष्ट्ये

बंगाल स्कूल ऑफ आर्ट हे २०व्या शतकाच्या सुरुवातीस भारतीय चित्रकलेच्या पुनर्जागरणासाठी स्थापन झाले. या शाळेच्या शैलीला काही ठळक वैशिष्ट्ये आहेत, जी या चळवळीच्या कलात्मक आणि राष्ट्रीय उद्देशांची स्पष्ट ओळख देतात.

१. वॉश तंत्राचा वापर – बंगाल स्कूलच्या चित्रकलेत पारंपरिक जलरंग तंत्राचा (वॉश तंत्र) प्रभाव मोठ्या प्रमाणावर दिसतो. हलक्या रंगसंगतीसह सूक्ष्म रंगरचना वापरल्यामुळे चित्रकृतींमध्ये सौम्य प्रभाव आणि आध्यात्मिकता स्पष्ट होते.

२. अजन्ता, मुघल, राजस्थानी, पहाडी प्रभाव – कलाकारांनी पारंपरिक भारतीय कलाशैलींचा अभ्यास करून त्यातील घटकांना आपल्या कलाकृतींमध्ये आत्मसात केले. अजन्ता मधील भित्तिचित्रांचा रंगसंगतीचा प्रभाव, मुघल मिनिएचरमधील सूक्ष्म रेखाटन, राजस्थानी आणि पहाडी शैलीतील आकृतिबंध आणि सजावट यांचा संगम त्यांच्या चित्रकलेत दिसतो.

३. भारतीय विषय, धर्मकथा, ऐतिहासिक प्रसंग यांचे चित्रण – बंगाल स्कूलच्या कलाकृतींमध्ये भारतीय धर्मकथा, पुराणकथा, महाकाव्ये, ऐतिहासिक घटना आणि लोकजीवन यांचे प्रभावी चित्रण केले गेले. या चित्रांद्वारे राष्ट्रभावना जागृत करण्याचा प्रयत्न केला गेला आणि स्वदेशी चळवळीशी कलात्मक दृष्टिकोन जोडला गेला.

४. राष्ट्रवादी उद्देश – या शाळेतील चित्रकलेचा उद्देश केवळ सौंदर्यनिर्मिती नव्हता; ती देशभक्ती, सामाजिक जागरूकता आणि स्वदेशी चळवळीला कलात्मक आधार देणारी साधने बनली. कलाकारांनी स्वदेशी तंत्रांचा प्रचार करून पाश्चात्त्य भौतिकतावादाला प्रतिसाद दिला.

अभिमन्यू वध नंदलाल बोस

५. वैयक्तिक अभिव्यक्ती आणि प्रयोगशीलता – बंगाल स्कूलच्या कलाकारांमध्ये व्यक्तिश: शैलीचे स्वतंत्र प्रयोग दिसतात. प्रत्येक चित्रकाराने आपल्या दृष्टिकोनातून रंग, रेषा आणि प्रतीकांचा उपयोग केला, ज्यामुळे कलाकृतींमध्ये वैविध्यपूर्ण सौंदर्य आणि सूक्ष्म आध्यात्मिकता निर्माण झाली.

या वैशिष्ट्यांमुळे बंगाल स्कूलच्या कलाकृती भारतीय चित्रकलेतील एक अद्वितीय धरोहर ठरल्या आणि स्वातंत्र्यलढ्याच्या सांस्कृतिक आधारात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

स्वातंत्र्य चळवळीतील प्रमुख चित्रकारांचे योगदान

स्वातंत्र्यलढ्यातील भारतीय चित्रकला आणि शिल्पकलेत नंदलाल बोस हे अग्रगण्य कलाकार ठरले. बोस यांनी भारतीय परंपरेतील गहन चित्रकला तंत्र, पुराणकथा, ऐतिहासिक प्रसंग आणि लोकजीवन यांचा अभ्यास करून राष्ट्रवादी भावना जनमानसात पोहोचवल्या. त्यांनी झाशीची राणी, महात्मा गांधी, बाल गंगाधर टिळक यांसारख्या नेत्यांचे चित्रण करून स्वातंत्र्यसैनिकांच्या शौर्याचे आणि त्यागाचे दर्शन घडवले. नंदलाल बोस यांनी भारतीय परंपरेतील शौर्य, त्याग आणि राष्ट्रनिष्ठेचे दर्शन घडविले. गांधीजींच्या दांडी मार्चसारख्या घटनांचे त्यांनी उत्कृष्ट दृश्यरूपात दस्तावेजीकरण केले. स्वदेशी चळवळीत त्यांच्या कलाकृती प्रेरणेचे महत्त्वाचे साधन ठरल्या. बोस यांच्या

द संथाल फॅमिली

कॉल ऑफद मिल

कलाकृतींमुळे लोकसजागृती झाली, जनतेत देशभक्तीची जाणीव निर्माण झाली आणि स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याची प्रेरणा मिळाली.

रामकिंकर बैज हे त्याच काळातील अग्रगण्य शिल्पकार होते. त्यांच्या शिल्पकलेत त्यांनी गरीबी, शोषण आणि सामाजिक अन्याय यांचे दृश्यमान रूप प्रस्तुत केले. त्यांच्या प्रसिद्ध शिल्पकृती "द संथाल फॅमिली" मध्ये संथाल आदिवासी कुटुंबाचे ब्रिटिश उपनिवेशी अत्याचाराखालीले जीवन उभे केले गेले आहे. हे शिल्पकृती प्रतिकाराचे प्रतीक बनले आणि लोकांना त्यांच्या अधिकारांसाठी उभे राहण्यास प्रेरित केले.

याशिवाय, भारतभरातील अनेक कलाकारांनी चित्रकला आणि शिल्पकलेच्या माध्यमातून स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाची दस्तऐवजीकरणात्मक नोंद केली. पंजाबमध्ये शोभा सिंग यांनी स्वातंत्र्यलढ्याचे विविध प्रसंग सजीवपणे रेखाटले, तर मद्रासमध्ये के. वेंकटप्प यांनी नेत्यांचे भव्य शिल्प निर्मिती करून युवा पिढीला प्रेरित केले. बंगालमध्ये मुकुल डे यांनी ब्रिटिश अत्याचारांचे चित्रण करून सामाजिक अन्यायाची नोंद घेतली. हे सर्व कलाकार केवळ कलाकृती निर्माते नव्हते, तर स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभागी होते. अनेकजण भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि स्वदेशी चळवळीसारख्या संस्थांमध्ये सक्रिय होते. त्यांनी प्रदर्शने, कला शिबिरे आणि कार्यशाळा आयोजित करून जनतेपर्यंत स्वातंत्र्यवादी संदेश पोहोचविला.

या कलाकारांच्या माध्यमातून, भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा सांस्कृतिक आणि भावनिक पैलू दृश्यमान झाला. कलाकृतींनी केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणूनच नव्हे तर लोकांच्या मनात स्वातंत्र्यासाठी लढण्याची जाणीव निर्माण करणारे प्रेरक साधन म्हणून काम केले. त्यांच्या कलेमुळे भारतीय कला हे सांस्कृतिक प्रतिकाराचे, राष्ट्रीय एकात्मतेचे आणि स्वदेशी चेतनेचे प्रतीक बनले.

कलाकृतींचे दृश्य दस्तावेजीकरण : इतिहासाचा मूळ पुरावा

स्वातंत्र्यलढ्यातील भारतीय चित्रकार व शिल्पकारांनी आपल्या कलाकृतींमार्फत घटनांचे दृश्य दस्तावेजीकरण केले. या कलाकृतींनी केवळ सौंदर्यनिर्मिती न करता, स्वातंत्र्यलढ्याच्या ऐतिहासिक प्रसंगांचा मूळ पुरावा म्हणून काम केले. त्या कालखंडातील घटनांचे, नेत्यांचे, जनतेच्या संघर्षाचे आणि सामाजिक परिस्थितीचे नेमके चित्रण कलाकृतींमध्ये दिसते.

या कलाकृतींना तीन महत्त्वपूर्ण भूमिका आहेत:

स्वातंत्र्य लढ्याचे ऐतिहासिक दस्तावेज – कलाकृतींमध्ये स्वातंत्र्यसैनिकांची शौर्यगाथा, संघर्षाची दृश्यमाध्यमातून नोंद, ब्रिटिश अत्याचारांचे दृश्यात्मक प्रदर्शन आणि ऐतिहासिक प्रसंग यांचा समावेश आहे. त्यामुळे त्या केवळ कलात्मक दृष्ट्या महत्त्वपूर्ण नाहीत तर इतिहासाचा मूळ पुरावा म्हणून देखील उपयुक्त आहेत.

जनजागृतीची साधने – कलाकृतींमुळे लोकांमध्ये देशभक्तीची जाणीव निर्माण झाली. चित्रफलक, पोस्टर, प्रदर्शन आणि शिल्पकृती यांमुळे जनतेत सामाजिक आणि राजकीय संदेश प्रभावीपणे पोहोचला. त्यामुळे लोकांनी स्वातंत्र्यासाठी सक्रिय सहभाग घेतला.

राष्ट्रभावनेचा प्रेरणास्त्रोत – कलाकृतींमधील प्रतीकात्मकता, रंगसंगती आणि दृश्यरचना लोकांच्या मनात देशभक्तीची भावना प्रबळपणे जागृत करतात. झाशीची राणी, महात्मा गांधी, संथाल आदिवासी संघर्ष यांसारख्या विषयांच्या माध्यमातून स्वातंत्र्यलढ्यातील आत्मत्याग व धैर्य लोकांसमोर उभे राहते.

अशा प्रकारे, चित्रकार व शिल्पकारांनी फक्त कलाकृती निर्माण केल्या नाहीत, तर त्या इतिहासाचा, सामाजिक जनजागृतीचा आणि राष्ट्रभावनेचा एक सशक्त स्त्रोत बनल्या. त्यांच्या दृश्य दस्तावेजीकरणामुळे आजही स्वातंत्र्यलढ्याचे प्रत्यक्ष अनुभव आणि त्या काळाची सांस्कृतिक व सामाजिक परिस्थिती अभ्यासकांसमोर स्पष्टपणे दिसते.

निष्कर्ष

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील चित्रकला आणि शिल्पकलेने केवळ सौंदर्यनिर्मिती न करता, सांस्कृतिक प्रतिकाराचे, सामाजिक जनजागृतीचे आणि राष्ट्रीय चेतनेचे माध्यम म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. बंगाल स्कूल ऑफ आर्ट, अबनिंद्रनाथ ठाकूर, नंदलाल बोस, रामकिंकर बैज आणि इतर कलाकारांच्या कार्यामुळे भारतीय कलाक्षेत्राने स्वदेशी मूल्ये, अध्यात्मिकता आणि राष्ट्रवादी दृष्टिकोन दृढ केला.

कलाकृतींमध्ये भारतीय परंपरेतील तंत्र, जपानी व चिनी शैलींचा समन्वय, ऐतिहासिक प्रसंग, धर्मकथा आणि लोकजीवन यांचे प्रभावी चित्रण दिसते. या दृश्य दस्तावेजीकरणामुळे स्वातंत्र्यलढ्याचा ऐतिहासिक पुरावा उपलब्ध झाला आणि ते लोकांमध्ये देशभक्ती जागृत करण्याचे प्रभावी साधन ठरले. औपनिवेशिक दडपशाहीच्या विरोधात चित्रकलेचा वापर, स्वदेशी चळवळीला कलात्मक आधार देणे आणि भारतीय ओळखीची जाणीव निर्माण करणे या सर्वांनी कलात्मक योगदान आणि सामाजिक प्रभाव यांचा समन्वय साधला. आजही या कलाकृती भारतीय इतिहासाचे, सांस्कृतिक चेतनेचे आणि कलात्मक परंपरेचे अमूल्य दस्तावेज म्हणून उभ्या आहेत.

या संशोधनातून स्पष्ट होते की, २०व्या शतकातील भारतीय चित्रकला आणि शिल्पकलेने स्वातंत्र्यलढ्यात सशक्त कलात्मक प्रतिकार आणि राष्ट्रीय चेतना निर्माण करण्यास अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले.

ग्रंथसूची

1. Guha-Thakurta, Tapati. *The Making of a National Art: Artists, Aesthetics, and Politics in Colonial India*. Cambridge University Press, 1992.
2. Chatterjee, Partha. *The Nation and Its Fragments: Colonial and Postcolonial Histories*. Princeton University Press, 1993.
3. Mitter, Partha. *Indian Art*. Oxford University Press, 2001.
4. Havell, E.B. *Indian Art and the Indian Museum*. Thacker, Spink & Co., 1908.
5. Sen, Partha. *Bengal School of Art and Indian Nationalism*. Delhi: Rupa & Co., 1987.
6. Bose, Nandalal. *Art and Nationalism in India*. Kolkata: Government College of Art & Craft, 1940.
7. Datta, Gurusaday. *Indian Folk and Tribal Art*. New Delhi: Publications Division, 1971.
8. Swarup, Jagdish. *The Role of Art in Indian Freedom Movement*. Jaipur: Rawat Publications, 2005.
9. Roy, Tapas. *The Visual Arts and the Indian Freedom Struggle*. New Delhi: Abhinav Publications, 2010.
10. Official archives, Government College of Art & Craft, Kolkata – Bengal School of Art documents and catalogues.

राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वे व व्यवहार

प्रा. डॉ. विजयकुमार सोन्नर

(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)

पु. अ. होळकर महाविद्यालय, राणीसावरगाव

भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सव साजरा करत असताना भारतीय लोकशाहीचे सिहंवलोकल होणे अपरिहार्य आहे, जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था 75 वर्षानंतर भारतीय राज्यघटनेवर असलेला विश्वास ह्या सर्व वैशिष्ट्यपूर्ण बाबीने आज देशाला जगातील बलाढ्य देशाच्या पंगतीत विराजमान केल आहे . भारताच्या मताला जागतिक राजकारणात महत्त्व प्राप्त झाले आहे. भारत देशाने सर्व पातळीवर आपला विकास घडवून आणलेला आहे, यामध्ये भारतीय राज्यघटनेचा महत्त्वपूर्ण सिंहाचा वाटा आहे. भारतीय राज्यघटनेत नमूद करण्यात आलेले मार्गदर्शक तत्वे हे देशाला बलाढ्य बनवत आहेत.भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागात राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे सविस्तर विश्लेषण केले असून यासाठी घटनेतील कलम ३६ ते ५१ खर्ची करण्यात आले आहेत. राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्त्वाचे मूळ स्पेनच्या घटनेत सापडते. ही तत्त्वे म्हणजे भारतातील कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांना दिलेल्या त्या अधिसूचना आहेत. जी जी मंडळी सत्तेवर येईल त्यांना मनमानी कारभार करता येणार नाही. या तत्वांचा त्यांनी मान राखला पाहिजे. आपल्या कर्तुत्वाची दिशा ही त्या दिशेने असली पाहिजे. आमदार, खासदार व प्रशासकांच्या वर्तणूकीची जणू नियमावली (code of conduct) आहे. मार्गदर्शक तत्वे ही उद्देशपत्रिकेत दिलेच्या उद्देशाचे जणू स्पष्टीकरणच आहेत. सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय, विचाराचे, उच्चाराचे, विश्वास आणि श्रद्धेचे स्वातंत्र्य, समता व बंधूभाव स्थापन करण्याचे माध्यम घटनाकर्त्यांनी निवडलेले आहे.

जगात राज्यनीतीची मार्गदर्शक तत्त्वे स्पेन, आयर्लंड, सिलोन इ. देशाच्या घटनेतही दिसून येतात. भारतीय राज्यघटनेचे राज्यनीतीची तत्त्वे एक प्रमुख वैशिष्ट्ये होय. लोकशाही परिणामकारक व यशस्वी कार्यान्वीत करावयाची असेल तर त्यासाठी सरकारने कसे वागावे या विषयीचे मार्गदर्शन राज्यनीतीच्या तत्त्वातून सांगण्यात आले आहे. केंद्र व राज्यशासनाने विविध क्षेत्रात कायदे करीत असताना कोणते धोरण स्वीकारावे या बाबतच्या अत्यंत सुंदर सूचना व दिशा निर्देश मार्गदर्शन या तत्त्वात आल्या आहेत मार्गदर्शक तत्वे हे लोकांच्या आशा आकांक्षा व मानवी जीवन समृद्ध करण्याचे साधन आहे भारतीय शासनाने मार्गदर्शक तत्त्वाची पालक केले तर संपूर्ण मानवाच कल्याण होणार आहे व भारतीय समाज जगातील सर्व दृष्टिकोनातून समृद्ध होणार आहे. भारतीय घटनाकारांनी देशातील जनतेस दिलेले सर्व अधिकार भारतीय राज्यघटनेत नमूद करता आले नाहीत. यासाठीच शिल्लक असलेल्या कल्याणकारी काही विशेष बाबी या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये ठेवण्यात आल्या आहेत.

जगातील पुढारलेल्या देशात तेथील राज्यघटनेने नागरिकांना जे अधिकार दिले आहेत तशाच प्रकारे अधिकार भारतीय घटनेने नागरिकांना दिलेले नाहीत. उदा. बेकारीपासून संरक्षण, वृद्धापकाळात मदत, विश्रांतीचा अधिकार इ. या सर्व अधिकारांची जाणीव भारतीय घटनाकारांना होती. परंतु तत्कालीन आर्थिक व सामाजिक परिस्थितीमुळे त्या सुविधा अशक्य होत्या म्हणून नागरिकांचा सामाजिक, आर्थिक व राजकीय दर्जा वाढविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टीचा समावेश या मार्गदर्शक तत्त्वात करण्यात आला आहे.

भारतीय घटनाकारांना केवळ उच्च आदर्श निर्माण करावयाचा नव्हता तर या आदर्शाचा सद्य परिस्थितीशी मेळ बसविणे आवश्यक होते. स्वातंत्र्यानंतर केवळ फक्त लोकशाही शासन निर्माण करणे एवढेच ध्येय घटनाकारांचे नसून भारतीय नागरिकांची सर्वांगीण उन्नती करणे, त्यासाठी समाजवादी समाज रचना प्रस्थापित करणे हे भारतीय घटनेचे उद्दिष्टे होते. अशी सर्वांगीण उन्नती विशिष्ट वेळेत करता यावी म्हणून निश्चित योजना आखणे आवश्यक आहे. या योजनेचे स्वरुप स्पष्ट करणारी तत्त्वे म्हणजे 'राज्यनीतीची मार्गदर्शक तत्त्वे' होत.

राजकीय लोकशाही ही आर्थिक, सामाजिक लोकशाही शिवाय यशस्वी होऊ शकत नाही. म्हणून आर्थिक सामाजिक लोकशाहीच्या स्थापनेसाठी सांगितलेलाकार्यक्रम म्हणजे मार्गदर्शक तत्त्वे होत. राज्यघटनेच्या चौथ्या भागातील कलम १६ ते ५१ असे एकूण १६ कलमे या तत्त्वाच्या विवेचनासाठी खर्ची पडलेली आहेत.

कलम ३६ मध्ये 'राज्य' या शब्दाचा अर्थ स्पष्ट केला आहे.

कलम ३७ मध्ये मार्गदर्शक तत्त्वाचे घटनात्मक स्थान स्पष्ट केले आहे "राज्यांनी कायदे करीत असताना या तत्त्वानुसार कायदे करणे राज्याचे कर्तव्य राहील. त्यानुसार देशातील कोणत्याही न्यायालयामार्फत मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी होणार नाही. मात्र देशाचा कारभार चालवितांना ही तत्त्वे मृ-मूत समजली जातील व कायदे तयार करीत असतांना या तत्त्वांना प्राधान्य देणे सरकारचे कर्तव्य राहील." डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समितीत भाषण करतांना या तत्त्वाविषयी असे उद्‌गार काढले की, "मार्गदर्शक तत्त्व हे दुसरे-तिसरे कांही नसून १९३५ च्या कायद्यान्वये गव्हर्नर जनरल व प्रांताचे गव्हर्नर यांना जे सूचनापत्रक पाठवले जात असे त्याचेच दुसरे नांव होय. दोघात फरक एवढाच की, सूचनापत्रक फक्त कार्यकारी सत्तेला उद्देशून पाठविले जाई तर मार्गदर्शक तत्त्वांचा उद्देश सरकारला मार्गदर्शन करणे हा असून कार्यकारी मंडळ व विधिमंडळ यांनाही उद्देशून ही तत्त्वे सांगण्यात आली आहेत."

मार्गदर्शक तत्त्वांचे वर्गीकरण :-

राज्यघटनेत राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्त्वाचे सविस्तर विवेचन केले असून यात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, परराष्ट्रविषयक बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे. पण घटनेत या तत्त्वाचे तर्कशुध्द वर्गीकरण केले गेले नाही. तरी विविध लेखकांनी आपापल्या परीने याचे वर्गीकरण वा गट पाडलेले आहेत. अभ्यासाच्या सोयीसाठी राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे चार गटात वर्गीकरण करण्यात आले आहे.

१) सामाजिक तत्त्वे, ३) राजकीय तत्त्वे

२) आर्थिक तत्त्वे, ४) आंतरराष्ट्रीय तत्त्वे.

मार्गदर्शक तत्त्वानुसार सर्व सूचना व मार्गदर्शनासंद देखील प्रत्यक्ष कार्यकारी मंडळ काम करत असताना या तत्त्वाकडे डोळा झाकते व गेल्या 75 वर्षांमध्ये ज्या प्रमाणे प्रशासन चालायला पाहिजे ज्याप्रमाणे सामाजिक आर्थिक राजकीय तत्वांचं पालन व्हायला पाहिजे अशा प्रकारे तत्त्वाचं पालन न केल्यामुळे या देशात भारतासमोर अनेक आव्हाने, तितकीच बलाढ्य अशा डोंगराएवढी आहेत. या आव्हानाची यादी करत आपण बसलो तर ती पाहून आपण निश्चित चिंतेत पडू. देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर लोकांच्या ज्या अशा आणि आकांक्षा होत्या, त्या सर्व निभावल्या का? जीतत्वे मांडली होती त्यात तत्त्वानुसार शासन चाललं का असा प्रश्न सर्वांसमोर पडल्याशिवाय राहणार नाही. लोकशाही व्यवस्था व भारताच्या शासनाची भूमिका ही त्यावेळी आरोपीच्या पिंजऱ्यात उभा राहिल्याशिवाय दिसणार नाही! शासना कडून प्रश्नांची उत्तरे मिळवता येतिल या अपेक्षेने सर्वसामान्य जनता शासन व्यवस्थेकडे आस धरून आहे. ती आस, आज हळूहळू परिस्थितीनुसार कमी होत असताना दिसत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे

सरकार कोणतीही आले तरी शासनाच्या कार्यपद्धतीमध्ये व सर्वसामान्यांच्या जीवनात काही अमुलाग्र बदल झालेले दिसत नाहीत. म्हणूनच आज जनता ही शासनाच्या कार्यपद्धती विषयी व त्यांच्याकडून मिळणाऱ्या आश्वासनच्या बाबतीत गांभीर्यान आशा धरून राहिलेली नाही .

इंग्रजी राजवट संपुष्टात आल्यानंतर पूर्वपारची कठोर समाज रचना बदलून त्या जागी नवा समाज निर्माण करण्याचे माध्यम म्हणून शासनाकडे पाहिले जात असे. या बदलामागील उद्देश समानता व न्याय प्रस्थापित करण्याचा असे. शिवाय शासन म्हणजे तळागाळातील लोकांचा रक्षण करता. आजवर दडपल्या गेलेल्या तसेच वसाहतवादात पीसून निघालेल्या लोकांचा मुक्तिदाता, देशाच्या प्रगतीचा धुरीन, नव्या समाजाचा पायाच मुळी प्रगती व वैभव असेल या समाजात स्वातंत्र्य, समता, मानवाची आत्मप्रतिष्ठा या सगळ्यांना जगण्याचा हक्क, निश्चितपणे मांडला गेलेला असेल. शासन हे सगळा बदल घडवून आणणारे एक सुयोग्य माध्यम, हे एक सर्वांनी धरलेलं गृहीत होय. आज मात्र परिस्थिती वेगळी निर्माण झाली. आजच्या समाज रचनेत ज्यांच्याजवळ सत्ता आहे ते लोक स्वायत्तपणे काम करू शकतात. तसेच स्वतः जवळील सत्ता वापरून जाहीर केलेल्या धोरणांचा पाठपुरावा करू शकतात. आजवर पाळलेले मूलभूत कायदे, संविधान व कायदेमंडळ या सगळ्याची निर्मिती एवढ्यासाठीच केलेली आहे का? सरकारी यंत्रणा उदाहरणार्थ सी.बी.आय. ईडी अशा यंत्रनांचा उपयोग विरोधी आवाज बंद करण्यासाठी वापरला जातो, हे योग्य आहे का? स्वातंत्र्यानंतर कष्टकरी कामगारांना तसेच कारखानदार ,डावे ,मध्यमवर्गी राजकारणी, मूलतत्त्ववादी, मार्कसिष्ट या सर्वांना असे अपेक्षित होते की, सरकार आम जनतेच्या वतीने मध्यस्ताची भूमिका पार पाडेल, कुठल्याही विचाराचे शासन आले तरी त्यांची भूमिका ही मध्यस्थीची असेल. भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वानुसार काम करेल आता हे सगळे अगदी स्पष्ट झाले आहे की सरकारने मध्यस्थ म्हणून भूमिका करण्याची अपेक्षा आणि आशा फार मावळली आहे. सरकार व आम जनतेत आपेक्षेलेला एक दिलाचा भाव यात अंतर पडले आहे. आज असे लक्षात येते की सरकारने जनतेचा विश्वासघात केलेला आहे. तत्वे पायदळी तुडवली जात आहेत शासन आज एकतर वर्चस्व गाजवणाऱ्या वर्गाच्या हातातले बाहुली बनले आहे. त्यांच्याच साथीने आंतरराष्ट्रीय वर्गापुढेही ते नमलेले आहे. आता शासन जनता भिमुख न राहता जनहित डोळ्यासमोर न ठेवता काही विशिष्ट भांडवलवाद्यांना अपेक्षित असे परिवर्तनाचे आयाम आपल्या धोरणात राबवत असताना आपणास दिसत आहे. आजच्या परिस्थितीत ना भूमीहीनाला जमीन, ना शहरातल्या फुटपाथ वासियाला घर, त्यांना गरजेत ढकलले जाण्याची शक्यता अधिकच आहे. कारण आधुनिकरीकरणात बेरोजगारांची संख्या प्रचंड वाढलेली आहे. त्यातच अनेक विस्थापितांची भर पडलेली आहे. त्यांच्याविरुद्ध भावना भडकल्या आहेत हे सर्व खरे आहे की मजुराशिवाय शहरे उभी राहू शकणार नाहीत तरी मध्यमवर्गीयांच्या डोळ्यात मात्र अशा लोकांना स्थिराव बऱ्याच जणाला सळणारा आहे. त्यांना उकडून टाकावे असा विचार मध्यमवर्गीयांच्या मनात येत आहे. वसाहतवादाच्या काळानंतर सर्वसामान्य लोकांना असंख्य त्रासापासून मुक्ती देणारा मुक्तिदाता या शासनाच्या भूमिकेपासून परिवर्तन होऊन त्यांचे दमन करणारे शासन इथपर्यंत शासनाच्या भूमिकेत जे परिवर्तन झाले आहे त्याचे मूळ कारण प्रगती आणि प्रगती हे आहे. मार्गदर्शक तत्वामध्ये जी आर्थिक तत्वे सांगितलेले आहेत याची कुठेही पालन झालेले दिसत नाही म्हणजे की अशा तऱ्हेची प्रगती होईल असे कोणालाही वाटले नव्हते. अनेक राष्ट्रांनी आपल्या विकासासाठी जे प्रतिमान वापरले जे साधन वापरले त्यामागे विशिष्ट वस्तू तेथील घटकांच्या समूहाचा अंतर्भाव आहे या नवस स्वातंत्र्य देशांना ज्या देशांनी पूर्वी त्यांच्या वसाहती बनविले होते त्या देशांच्या पावलावर पाऊल टाकून अगदी आपलाही विकास असाच हवा अगदी

त्यांच्यासारखेच बनण्याची त्यांनी ठरविले होते या नऊ स्वातंत्र्य देशातल्या बुद्धिमत्ता नाही त्यांचेच धडे गिरवले त्यामुळे नव्या संधी निर्माण होण्याचा जो डासा बनला तोच मुळी असमान होता व तोच सामान्यविरुद्ध वापरला गेला औद्योगिकीकरणासाठी भांडवल वाढीवर दिलेला भर औद्योगिकीकरणाबद्दलचा घेतलेला समज हे सगळे शहरीकरण व आधुनिकरण या गोष्टींना प्राधान्य देणाऱ्या बाबी होत्या आणि जनता ही ग्रामीण भागाकडून शहराकडे वळली अपरिहार्यपणे यामुळे साधनसामुग्रीचे जे वाटप झाले ते असमान पद्धतीने झाले गरिबांच्या हितविरुद्ध झाले हे फक्त नियोजनबद्ध विकास साधता निर्माण झालेल्या साधनसामग्रीचेच असे नव्हे तर त्यांना सहज मुक्तपणे उपलब्ध होत असे अशा साधनसामग्रीचे वाटपही त्यांच्या हितविरुद्ध असमान पद्धतीने झाले सुरुवातीला असे वाटत होते की ही असमानता तांत्रिक आणि तात्पुरत्या स्वरूपाची आहे. श्रीमंत वगैरे यांच्यातली आर्थिक दूरी वाढत आहे राजकीय सामाजिक आर्थिक समता कुठेही निर्माण होत असलेली दिसत नाही. परंतु आता अधिक विकास झाल्यावर ही असमानता नष्ट झाली नाही तर याद गरिबांची संख्या वाढली आहे आता अभिजनांना त्रास सोसावा लागत आहे. जनकल्याणाचे उपाय योजना सुद्धा मिश्र तंत्रज्ञान वापरून विकासाच्या योजनांमध्ये गरीब व बेरोजगारांसाठी लाभदायक बाबीचा समावेश करून आर्थिक सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. शहरातील गरिबी बेरोजगारी शिवाय ग्रामीण विकासाच्या योजनांचा समावेश करून ग्रामीण भाग अधिक समृद्ध करण्यासाठी विकासाचा मार्ग अवलंबला जात आहे तरीसुद्धा विशिष्ट असा बदल केला नाही. मार्गदर्शक तत्त्वानुसार बदल होणे अपेक्षित होते मात्र अल्पशा स्वार्थासाठी हितासाठी समाज हिताच्या कार्यापासून वेगळा विचार होत आहे भ्रष्टाचार गुत्तेदार पत्रकार राजकीय मंडळी जमीन माफिया ह्या स्वतःच्यासाठी आपल्याला पूरक असे धोरण राबवत आहे. घटनेमध्ये नमूद केलेले मार्गदर्शक तत्त्वानुसार काम होत नाही यातून समाजामध्ये जनतेत असमानता दूर झाली नाही. असमानतेला शासनाबरोबरच प्रशासन व कष्ट न करणारी जनता हे देखील महत्त्वाचे कारण आहे, यात शंकाच नाही. परंतु उदयाला येऊ घातलेल्या औद्योगिक भांडवलशाही सरकारच्या प्रतिमानाचे आपण साक्षीदार आहोत. आशियाई देशातच नव्हे तर सर्वत्रच विशेषत: यात स्थानिक उद्योग पार उखडून टाकण्यात आले आहेत. यातून आर्थिक दरी वाढत आहे.श्रीमंत लोक अति श्रीमंत होत आहेत

मार्गदर्शक तत्त्वांचा वापर केला नाही त्याची पालन केले नाही तर त्याचे होणारे संभाव्य परिणाम लक्षात घेता, घडणारी एक संभाव्य गोष्ट अशी की, तळागाळातल्या तसेच कनिष्ठ मध्यमवर्गातील राजकारणात गुंतलेल्यांमध्ये वाढता असंतोष निर्माण होणे व त्यांनी बंड करणे हे होय. सामाजिक तसेच आर्थिक क्षेत्राकडून लक्ष हटविण्यासाठी अशी एक बिनबुडाची अफवा पसरवण्यात आली आहे. ज्यामुळे त्यांचे लक्ष जमातवादी तसेच सांस्कृतिक घडामोडींकडे वळेल व त्यांच्या धार्मिक, भाषिक, सांस्कृतिक भावनांचा उद्रेक होईल ज्यायोगे माणसांना एकमेकांविरुद्ध झुंजवले जाईल व तसे करताना माफियांच्या कार्यशैलीचादेखील उपयोग करून घेतला जाईल. आपल्या सत्तेच्या खुर्चीसाठीअसंख्य निरुद्योग्यांचा व गुन्हेगारांचाही उपयोग करून घेतला जाईल, त्याच वेळी अस्वच्छ जाती, जमाती व भूप्रदेशात भयंकर दहशत निर्माण केली जाईल. मूलतत्त्ववाद्यांची प्रणाली लोकांच्या भावना भडकवण्यासाठी वापरली जाईल. राष्ट्रीय एकात्मतेसाठी किंवा ती धोक्यात आली म्हणून सरकार अधिकृतपणे आगीत तेल ओतण्याचे काम अधिक ताकदीने करू शकते. या सगळ्यात एक होते ते म्हणजे वर्चस्व गाजवणाऱ्या उच्चवर्गीयांच्या नेतृत्वाला आव्हान देणाऱ्या सामाजिक चळवळी व धडपडणाऱ्या इतर गटांचे महत्त्व यात हरवून जाते. याच पद्धतीने आतंकवादाविरुद्ध कठोर कायदे वापरले जातात आणि पुढे तेच कायदे सामाजिक चळवळी चिरडण्यासाठी व लोकांचा

असंतोष दडपण्यासाठीदेखील वापरले जातात. सत्तेत असलेल्या अभिजनांना कसेही करून खुर्चीला चिकटून राहायचे असते. तसे करताना राजकारणाचा एक भाग म्हणून ते खुशाल दंगेधोपे घडवून आणतात, समाजात दुही निर्माण करतात. अलीकडील काळात घडणारी ही गोष्ट विचार करायला लावणारी आहे. तसेच तो अभिजनांच्या सत्तेच्या हव्यासाचा थेट परिणामही आहे. सामाजिक अभिसरणाचे जात व वर्ग हे दोन महत्त्वाचे मुद्दे मागे टाकण्यात ते यशस्वी झाले आहेत; परंतु ते जमातवाद वाढविण्यातही यशस्वी झाले आहेत. यात समाज विभागला जाण्याचा धोका जास्त प्रमाणात आहे.

दूरदृष्टीने पाहिल्यास तंत्रज्ञानावर व सैनिकीकरणावर आधारित द्विस्तरीय अर्थव्यवस्थेकडे आपण ज्या वेगाने घोडदौड करतो आहोत त्यावरून असे वाटते. याच्या जोडीला अधिक चांगल्या प्रतिष्ठित वागणूक मिळण्याच्या अपेक्षेनं खालच्या वर्गातील लोक, तसेच मागासवर्गीय, अस्पृश्य, वेठबिगार, तसेच आदिवासी, जंगलवासी, मूळचे रहिवासी यांची आर्थिक आंदोलने आहेत.राजकिय पक्षाच्या प्रक्रियेशी मिळतेजुळते न घेणारी अराजकीय पक्षक्रिया सुरू करून द्यायची नाही, याउलट पुन्हा नव्याने पक्षीय राजकारणाला संधी मिळावी म्हणून व त्यातील त्रुटी दूर व्हाव्यात व त्याला मूलभूत अशा रचनात्मक प्रक्रियेचा पाया लाभावा म्हणून ही धडपड आहे. यात मला फक्त बघ्याची भूमिका घ्यायची नाही, तर राजकीय तसेच अराजकीय अशा दोन्ही पक्षीय प्रक्रियांमधे गरज पडेल तशी मध्यस्थाची भूमिका निभावायची आहे आणि या सगळ्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे ज्यात स्वायत्त तळागाळातल्यांसाठीच्या राजकारणाची संपूर्ण संकल्पनाच अवतरली आहे, ती म्हणजे या सगळ्यात जनतेचा थेट सहभाग असणे ही होय. (अभिजनांच्या राजकारणाचा एक तुकडा म्हणून काम करण्यापेक्षा हे वेगळे आहे.) ज्यांना संपूर्ण राजकारणावर सत्ता गाजवायची आहे अशा द्वेषानं झपाटलेल्या पक्षनेत्यांना मात्र हे पक्षीय राजकारणाच्या प्रक्रियेच्या विरोधात आहे, असे वाटतेय; पण ते तसे नाही. शिवाय सार्वजनिक ठिकाणी ज्या स्वायत्त संघटना कार्यरत आहेत त्यांच्याकडेही ते संशयानेच पाहत आहेत.

सारांश :

देशात लोकशाहीचा प्रसार प्रचार करण्यासाठी जनहितासाठी भारतीय राज्यघटनेमध्ये जे मार्गदर्शक तत्वे ठेवण्यात आले आहेत त्याचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे. हे तत्वे डोळ्यासमोर ठेवून संपूर्ण ध्येय धोरण आखले जावे. त्या प्रमाणात काम करून आपल्या उद्देशाची पूर्ती करणे आवश्यक आहे. राजकारणाचे एकमेव किंवा सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट सत्ता हस्तगत करणे हेच असते; परंतु जे अजूनपर्यंत सत्तेच्या आसपासही फिरकू शकलेले नसतात त्यांच्या पक्षीय राजकारणापेक्षा 'राजकारण' याची संकल्पना वेगळी असते. राजकीय समानता प्रस्थापित करण्याचे उद्दिष्टे घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वात आहे, राजकीय समता, आर्थिक, सामाजिक प्रस्थापित करण्यासाठी आज अन्यायाविरुद्ध लढा देणे कधी नव्हे इतके आवश्यक झाले आहे. त्यातूनच हे लढे उभे राहतील तसेच राजकारणातील तत्त्वे व त्यातील बौद्धिक अयाम जिवंत राखले पाहिजे. म्हणजे प्रांतिक राजकारण पारंपरिक राहणार नाही. व्यवस्थेत फक्त सहभागी होणे एवढेच पुरेसे नाही तर मार्गदर्शक तत्त्वाची नीट अंमलबजावणी होती की नाही हे पाहणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. जनतेचा सहभाग अगदी अनौपचारिक असला आणि योग्य समाजनिर्मितीचे लक्ष्य समोर ठेवलेले असले तरीही हे असेच वाटते. यासाठी सहभाग आवश्यक असला तरी हे घडण्यासाठी आजच्या काळात आपण दोन नव्या तत्त्व प्रणालींचे साक्षीदार आहोत त्यातील एक म्हणजे तंत्र प्रणाली व दुसरी म्हणजे मूलतत्त्ववाद होय आणि सत्तेचा वापर अधिक तापदायक होऊ लागतो तेव्हा या दोन्ही एकत्र येतात व त्यातून वेगळीच चित्र निर्माण होत

असते या सगळ्याचा ठळक परिणाम म्हणजे काय तर वर्ग युद्ध होणे किंवा समाज मागे ढकलला जाऊन पुराणकालीन गोष्टींना महत्त्व प्राप्त होणे हे होय, वेगवेगळ्या समाजांना एकत्र बांधण्याचा मार्ग असलेला निधर्मी संकल्पनेचा अंत यामुळे होत असतो. विविधतेत एकता या संकल्पनेचे महत्त्व कमी होते. विविधतेतूनच समाजाची प्रगती होत असते असा मोठा संकेत आहे. धर्मनिरपेक्षतेचे तत्व स्वीकारणे आवश्यक असते दिसते स्वीकारणेच नव्हे तर त्याचे तंतोतंत पालन करणे गरजेचे आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये जो धर्मनिरपेक्षता हे तत्व दिले आहे ते तत्व, समाजवाद, समता या गोष्टींना सामोरे ठेवून आपली आर्थिक घडी बसवणे. व यामधून संपूर्ण देशाचा विकास घडवून आणणे हे शासनाने उद्दिष्ट आपल्या डोळ्यासमोर ठेवली पाहिजे. अन्यथा अनेक नवीन उपायांमधूनच प्रश्न देखील निर्माण होऊ शकतात जसे की एखाद्या आजारावरील उपायापेक्षा उपायातूनच नवीन एक आजार निर्माण होतो तसा समाज व्यवस्थेला व देशाला नवीन आजार होऊ नये यासाठी मार्गदर्शक तत्त्वाचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे.

संदर्भ ग्रंथ:

1) घनश्याम शहा- भारती शासन व राजकारण डायमंड पब्लिकेशन पुणे

2) जोशी प.ल. भारतीय संविधान शासन आणि राजकारण, विद्याप्रकाशन, नागपूर.

3) डॉ. भोळे भा.ल., भारतीय राज्यव्यवस्था, प्रकाशक मनोहर पिंपळापुरे, नागपूर दुसरी आवृत्ती १५ ऑगस्ट १९९०.

4) डॉ. व्हि.एन. इंगोले/ व्ही. एल. वरंडे- भारतीय शासन आणि राजकारण, कल्पना प्रकाशन नांदेड, प्र. आ. १९९८.

5) डॉ. सु.ग. कुलकर्णी, तीन देशांच्या राज्यघटना विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, नांदेड.

6) गिरमे के. टी., विधानसभा परिचय व कामकाज.

7) डॉ. रमेश ठोबळे, तुलनात्मक शासन आणि राजकारण, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगापुरा, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती जून २००४.

8) घांगरेकर चि. ग. भारतीय राजकीय व्यवस्था, दत्तसन्स प्रकाशन, नागपूर १९९६.

9) दैनिक सकाळ

10) दैनिक लोकपत्र

किल्ले रायगड : जलव्यवस्थापनाचा ऐतिहासिक अभ्यास

मुळे श्रीकृष्ण सुखदेव
संशोधक विद्यार्थी,
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी.
डॉ. रामभाऊ मुटकुळे
मार्गदर्शक
इतिहास विभाग प्रमुख, बहेर्जी स्मारक महाविद्यालय वसमत.

प्रस्तावना :

पाणी म्हणजे जीवन. मानवाला, प्राण्यांना तसेच वनस्पतींना आपली जीवनावश्यक कार्ये पूर्ण करण्यासाठी पाण्याची नितांत आवश्यकता असते. तसेच जीवनात इतर बाबींसाठी देखील पाण्याचे महत्व अनन्यसाधारण आहे. पाणी वापरासाठी मात्र पाणी-साठवणूक व्यवस्था विकसित असायला हवी.

मध्ययुगीन महाराष्ट्रात वार्षिक कमी पर्जन्यमान परिस्थितीमुळे तसेच भोगौलिक प्रतिकूल परिस्थितीमुळे पारंपारिक पाणी व्यवस्थापनाच्या उत्तम पध्दती विकसित झालेल्या आढळतात. महाराष्ट्रातील शिवकालीन गडकिल्ले अभेद्य राहण्यामागे तेथील पुरेसे व सक्षम पाण्याचे स्त्रोत हा घटक महत्वाचा मानला जातो. रा. चिं. ढेरे आपल्या 'आज्ञापत्र' या पुस्तकात म्हणतात कि," किल्ला बांधावा उदक पाहुनी "[१]. यावरून गडदुर्गावरील पाणी व्यवस्थापनाचे महत्व अधोरेखित होते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये आपण रायगड या गडदुर्गाच्या जलव्यवस्थापनाचा ऐतिहासिक आढावा घेणार आहोत.

रायगड भोगौलिक :

शिवरायांची अभिषिक्त राजधानी आणि हिंदवी स्वराज्याचे तीर्थस्थान असलेला रायगड हा रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यात १८°१४' उत्तर अक्षांश व ७३°३०' पूर्व रेखांशावर वसला आहे. त्याची समुद्रसपाटीपासुनची उंची ८७० मी. आहे.[२] रायगडाच्या परिसरात सपाटीचा पठारी प्रदेश क्वचित असून किल्ल्याच्या चारही बाजूला डोंगर रांगा आहेत.रायगडचे दर्शन देशावरून म्हणजे तोरणा, राजगडाहून होते.रायगडला पूर्वेकडे आणि उत्तरेकडे कालनदीचे खोरे असून, पशिमेला गांधारी नदी वाहते.रायगडाच्या पायथ्याला पाचाड हे गाव आहे.[३] हा डोंगरी किल्ला पूर्वी रायरी नावाने ओळखला जाई.युरोपीयन लोक त्यास पूर्वेचा जिब्राल्टर म्हणत.[४]

रायगडावरील जलव्यवस्थापन :

रायगड हि हिंदवी स्वराज्याची राजधानी. शिवाय हा किल्ला हि तसा प्राचीन.त्याचा पूर्वेतिहास जरी माहित नसला तरी रायरीच महत्व सर्व राजवटीत कमी-जास्त प्रमाणात होतच.त्यामुळे इथे पाण्याचा साठा करण्याची आवश्यकता होतीच.शिवकाळात तलावासाठी गुहांच्या परिसरात दगडांची खाण सुरु करायची, त्यातून निघणारे चिरे बांधकामासाठी वापरायचे आणि झालेल्या खड्ड्याला बांध घालून पाणी अडवायचे अशी पद्धत वापरली गेलेली आढळते.रायगडावर सुमारे १०-१२ तलाव किंवा मोठे जलसाठे आहेत.तर टाक्यांची संख्या सुमारे ३० च्या आसपास जाते.यातील काही प्रमुख जलसाठे आपण पुढे पाहूया –

महादरवाजा :

रायगडाच्या महादरवाज्याच्या वरच्या बाजूस पहारेकरयांसाठी चार छोटी पाण्याची टाकी आहेत.याचा उपयोग फक्त पिण्यासाठी नसून युध्शास्त्रातील डावपेचात्मक पण आहे.जर गनीम महादरवाजा ओलांडून आलाच तर हि टाकी फोडून खालच्या शत्रूवर रिकामी केली जात जेणेकरून शत्रू वाहून जाईल अथवा त्याच्या आक्रमणाला खीळ बसेल.[५]

हत्ती तलाव :

मदारशाहाच्या कबरी जवळ एक कोरडा पडलेला तलाव असून त्याला हत्ती तलाव असे म्हणतात.[६] त्याला हत्ती तलाव हे नाव कसे पडले याचा काही पुरावा आढळून येत नाही.ह्या तलावाला पश्चिमेला भिंत बांधून पाणी अडवण्याचा प्रयत्न केलेला आहे.[७] पाणी मात्र ह्या तलावात कधीच टिकत नाही. कदाचीत इंग्रजांनी किल्ला जिंकला

त्यापूर्वी पाणी टिकत असावे.इंग्रजांच्या तोफांच्या माऱ्याने येथील झरे बुझले असावेत किंवा तलावाच्या तळाला असंख्य फटी पडल्या असाव्यात.परिणामी हल्ली तलाव कोरडाच असतो.


हत्ती तलाव

गंगासागर तलाव :

राजवाड्याच्या उत्तरेला किंचित उतरत्या अवस्थेत गंगासागर तलाव आहे.हत्ती तलावाकडून आपण सरळ निघालो कि रायगड जिल्हा परिषदेची धर्मशाळा, रेस्ट हाउस लागतात.ह्याच्या थोड पुढ गेल्यावर लगेच ३७५ फूट लांब आणि ३५० फूट रुंदीचा व भरपूर खोल असलेला गंगासागर तलाव आहे.[८] शिवाजी महाराजांच्या राज्यभिषकासमयी हिंदुस्थानातील सप्त नद्यांचे पाणी मागविले होते ज्यातला काही भाग यात ओतण्यात आला होता.गंगेचे हिंदूंच्या मनातील असलेल्या स्थानाचे प्रतिक म्हणून ह्या तलावाला गंगासागर तलाव म्हणतात.पावसाचे साचणारे पाणी आणि जिवंत उफळे ह्यामुळे हा तलाव सतत तुडुंब भरलेला असतो.

बारा टाकी :

जगदीश्वर मंदिराकडून शिबंदीच्या घरट्यांची वसाहत ओलांडून भवानी कड्याच्या दिशेने पुढे जाऊ लागलो कि उजवा हातास एक कोठाराची इमारत दिसते.त्याच्या आसपास बारा टाकी म्हणून पाण्याच्या काही टाक्यांचा समूह आहे.पण याची संख्या केवळ बारा नाहीये तर ती चौदा आहे.[९] या टाकी समूहातील टाकी एकमेकांना जोडलेली आहेत आणि एका टाक्यात लिंबू टाकले तर ते पुढच्या टाक्यांमध्ये जाते अशी भ्रामक समजूत आहे.पण ते खरे नाही.या टाक्यांमधील पाण्याची पातळी वेगवेगळी आहे.यावरून ती सगळी टाकी आतून जोडलेली नाहीत असे स्पष्ट होते.

कुशावर्त तलाव :

कुशावर्त तलाव मोठा असून तो गोलाकृती बांधीव आहे.त्याचे दोन भाग असून मधोमध वर्तुळात व्यास असावा तसा जमिनीचा पट्टा आहे.[१०] पूर्वी हा तलाव पावसाळ्यात भरत असे. पण १८१८ सालच्या इंग्रजांनी केलेल्या तोफांच्या माऱ्याने त्याचे नैसर्गिक स्त्रोत बंद झालेत.परिणामी पाऊस काळात साठेल तेवढेच पाणी ह्यात साठते आणि हळूहळू झिरपून काही महिन्यातच हा तलाव कोरडा पडतो. तलाव कोरडा पडल्यानंतर हयात असलेले लेण्यांचे अवशेष पाहता येतात.ह्या तलावाच्या जवळच महादेवाचे मंदिर आहे.

कोळिंब तलाव :

जगदीश्वराच्या मंदिराच्या पूर्वेकडे किंवा किंचित उत्तरेस नितळ पाण्याचा एक मोठा तलाव आहे.त्याला 'कोळिंब तलाव' हे नाव रूढ आहे.या तलावच वैशिष्ट्य म्हणजे याच्या उत्तर बाजूस असलेल्या खडकात काही खोदीव गुहा आहेत.[११] हि सातवाहनकालीन लेणी असण्याची शक्यता आहे.पण इथला खडक जलाभेद्या (इमपार्वियस रॉक) असल्यामुळे ह्या लेण्यांचाच काही भाग फोडून या तलावाची निर्मिती केलेली असावी.

निष्कर्ष :

१. रायगड दुर्गावर शिवाजी महाराज निर्मित अत्यंत विकसित जलव्यवस्थापनाची पध्दती आढळून येते.
२. यावरून शिवाजी राजांच्या दुर्गानितीमध्ये जलव्यवस्थापनाचे असलेले अनन्यसाधारण महत्व अधोरेखित होते.

३. जलसाठवनुकीच्या स्त्रोतांच्या प्रत्यक्ष पाहणीतून आणि विज्ञानाच्या चौकटीतून पाहिल्यास काही गैरसमजुती दूर करण्यास मदत झाली.जसे कि बारा टाकीचा वर उल्लेख केला आहे.

४. शिवकालीन दुर्गानितीमध्ये पाण्याचा उपयोग पिण्याबरोबरच रणनीतीच्या दृष्टीने सुद्धा केलेला आढळतो.

५. रायगडावर सुमारे १०-१२ तलाव किंवा मोठे जलसाठे आहेत शिवाय टाक्यांची संख्या सुमारे ३० च्या आसपास आहे.

६. रायगडावरील या सर्व जलस्त्रोतांची सद्यस्थिती पाहता त्यांच्या संवर्धनाची आवश्यकता अगदी युद्धपातळीवर आहे असे जाणवते.

संदर्भ :

१. ढेरे रा.चिं., आज्ञापत्र, पद्मगंधा प्रकाशन, २०१४, पृ.७२.

२. डॉ.पाटील नि. रा., किल्ले महाराष्ट्र – कोकण विभाग, सायन पब्लीकेशन्स, २०२३, पृ.३१०.

३. नेवसे रमेश, किल्ले रायगड, राजमुद्रा प्रकाशन, २०१७, पृ.१५.

४. ग्रांट डफ, हिस्टरी ऑफ मराठाज, व्हा. १, पृ.६७९.

५. पूर्वोक्त, नेवसे रमेश, पृ.१४४.

६. कित्ता, पृ.१४८.

७. कित्ता, पृ.१४९.

८. घाणेकर प्र. के., दुर्गदुर्गेश्वर रायगड, स्नेहल प्रकाशन, २००९, पृ.८१.

९. प्रत्यक्ष पाहणी.

१०. पूर्वोक्त, नेवसे रमेश, पृ.१९८.

११. पूर्वोक्त, घाणेकर प्र. के., पृ.१५९.

स्वामी विवेकानंदाचे राष्ट्रवादी विचार

प्रा. डॉ. लक्ष्मण बाबाराव यादव
राज्यशास्त्र विभाग
बा. दे. पा. महाविद्यालय पारवा

जीवन परिचय :—

आधुनिक भारताची जागतीक पटलावर ओळख करून देणारे भारतीय पुनर्जागरणाचे प्रणेते, अद्वैत वेदांताचे प्रचारक असामान्य महापुरूष भारतीय युवकांत राष्टाबद्दल प्रेम निर्माण करून, राष्टनिर्मीतीत त्यांना सहभागी करण्याचे महत्वपूर्ण कार्य या प्ररवर राष्ट्रवादी विचारवंतानी केलेले असून त्यांच्या या विचारांनी भारताच्या स्वातंत्र लढ्याला मानसीक व सांस्कृतीक बळ मिळाले. अशा या प्ररवर राष्ट्रवादी विचारवंतांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी पश्चिम बंगाल म धील कलकत्ता येथे झाली त्यांचे मुळ नाव नरेंद्रनाथ विश्वनाथ दत्ता असे होते. माता भुवनेश्वरीदेवी धार्मिक, दयाळु व संस्कारक्षम होत्या नरेंद्र बालपणी अतिशय बुध्दीमान, जिज्ञासु, निर्भय व सत्यशोधक होते त्यांचे शिक्षण प्रेसेडेन्सी कॉलेजमधून झाले. त्यांनी पाश्चात्य तत्वज्ञान, इतिहास साहित्य, विज्ञान संगित इत्यादी विषयाचा अभ्यास केला. १८८१ मध्ये नरेंद्र आणि रामकृष्ण परमहंस यांची भेट दक्षिणेश्वर येथे झाली. परमहंसाच्या अध्यात्मिक सामर्थ्याने नरेंद्र प्रभावीत झाले व पूढे ते त्यांचे शिष्य बनले परमहंसानी त्यातील आत्मीक शक्ती ओळखून नरेंद्र तु विश्वाला नविन संदेश देणार असे भाकीत केले.

गुरूच्या निधनानंतर नरेंद्रनी सन्यास स्विकारून स्वामी विवेकानंद हे नाव धारण केले. त्यांनी संपूर्ण भारतभर पायी भ्रमण करून समाजातील दारिद्रय, दु:ख अज्ञान व जातीभेद यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. नरेंद्रनी ११ सप्टेंबर १८९३ रोजी अमेरिकेतील शिकागो धर्म परिषदेत 'बंधू आणि भगीनी' या शब्दांनी सुरूवात करून संपूर्ण जगाचे मन जिंकले. त्यांच्या भाषनानी भारतीय अध्यात्म, सहिष्णुता आणि अद्वैताचा गौरव जगभर पसरला. १९८७ मध्ये त्यांनी कोलकत्ता येथे रामकृष्ण मिशनची स्थापना करून शिक्षण, आरोग्य, समाजसेवा करण्याचे उद्दिष्टे ठरवले अशा या महान राष्ट्रवादी विचारवंतानी ४ जुलै १९०२ रोजी बेलुर मठात वयाच्या ३९ व्या वर्षी जगाचा निरोप घेतला.

प्रस्तुत शोध निबंधात स्वामी विवेकानंदाच्या राष्ट्रवादी विचाराचे प्रस्तुत शेध निबंधात अध्ययन केले जात आहे. ते पुढील प्रमाणे,

स्वामी विवेकानंद व राष्ट्रवाद :—

स्वामी विवेकानंदाचा राष्ट्रवाद हा अध्यात्मीक स्वरूपाचा होता तसेच त्याचा राष्ट्रवाद धर्मांच नव्हता, समानता, सहिष्णुता आणि सार्वत्रिकता यावर त्याचा राष्ट्रवाद आधारलेला होता. त्यांचे राष्ट्रवादी विचार आधुनिक भारताच्या पायाभरणीत महत्वपुर्ण योगदान देणारे ठरतात. विवेकानंदाचे राष्ट्रवादी विचार जानुन घेत असतांना त्यांचा राष्ट्रवाद हा आध्यात्मीक, सांस्कृतीक, सामाजिक आणि मानवी मुल्यावर आधारलेला होता. विवेकानंदाचे राष्ट्रवादासंबंधी विचार पुढील प्रमाणे

१. अध्यात्मीक राष्ट्रवाद :—

स्वामी विवेकानंदानी भारतीय राष्टवादाची उभारणी करत असतांना ती अध्यात्माच्या आधारे केली कारण त्यांच्या मते भारत हे राष्ट्र केवळ राजकीय किंवा भौगोलीक याच घटकावर उभे नसुन धर्म—अध्यात्माच्या शक्तीवर खंभीर पणे उभे आहे. त्या करीता भारतीय राष्ट्रवाद हा अध्यात्मावर आधारीत आकारास आला पाहीजे असे विवेकानंद म्हणत भारतीय संस्कृती ही आध्यात्मीक असल्यामुळे ही ती राष्ट्राची खरी ओळख आहे. भारतीय नागरिकामध्ये एकमेकांमध्ये

देव पाहण्याची दृष्टी आणि याच आधारावर भारताला जागतीक स्तरावर नेण्याचे काम आपली अध्यात्मीक संस्कृती करेल असे स्वामीजींना वाटत असे.

२. सांस्कृतीक राष्ट्रवाद :—

स्वामी विवेकानंदानी आपले राष्ट्रवादी विचार अधिक स्पष्ट करत असतांना सांस्कृतीक राष्ट्रवादाचे समर्थन केले. भारताचे राष्ट्रत्व हे सांस्कृतीक एकात्मतेवर आधारित आहे. भारतात विविध भाषा, जात, धर्म, असुसन संस्कृती व मुल्ये ही त्यांना जोडणारी शक्ती आहेत. वेद उपनिषद, भगवतगीता ही भारताच्या सांस्कृतीक राष्ट्रवादाची मुळे आहेत. हिंदू धर्माला त्यांनी समन्वयशिल उदार आणि सर्वसमावेशक म्हणून पाहीले. भारतीयत्व म्हणजे विविधतेतील एकता असुन भारतीय राष्ट्रवाद हा कोणत्याही धर्मविरोधी किंवा जातीय अहंकाराचा विषय नव्हता सर्व धर्म एकसमान आदराने मानणाऱ्या भारतीय संस्कृतीचे प्रतिक होय,

३. सामाजिक राष्ट्रवाद :—

स्वामीजींच्या मते दिन, दलित गरिब व वंचितांची सेवा त्यांचा विकास हाच समाजाचा विकास म्हणजेच राष्टाचा विकास होय समाजातील अन्याय, अज्ञान, अस्पृश्यता दुर झाली तरच भारतीय समाजात सामाजिक राष्ट्रवाद निर्माण होईल. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळेल, अशा या समाजाला शिक्षण, विज्ञान आणि तांत्रिक कौशल्याच्या माध्यमातुन समाजाची प्रगती साधेल परिणामी राष्ट्रनिर्मीतीला हातभार लाभेल.

४. युवकांचा राष्ट्रवाद

स्वामीजींचा युवकांवर फार मोठा विश्वास होता. कारण राष्ट्राचे भवितव्य हे युवकांच्याच शक्ती, शिस्त आणि कार्यक्षमतेवर अवलंबून आहे. म्हणूनच स्वामीजींनी युवकांचे शारिरीक, मानसीक, आणि अध्यात्मीक बल वाढवण्यावर भार दिला. भारतीय युवकात आत्मविश्वास आणि धैर्य कसे निर्माण होईल यासाठी ते सतत प्रयत्नशिल होणे. म्हणुनच स्वामी विवेकानंदाच्या विचारांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या अनेक पिढ्यांना प्रेरणा मिळाली. नेहरू, लोकमान्य टिळक, सुभाषचंद्र बोस, अरविंदघोष, भगतसिंग इत्यादी क्रांतीकारकांना त्यांची शिकवत प्रेरणादायी ठरली.

५. स्त्रिशक्ती आणि राष्ट्रवाद

स्वामी विवेकानंदाचे राष्ट्रवादासंबधीचे विचार स्पष्ट करत असतांना भारतीय राष्ट्रवादाच्या उभारणीसाठी स्त्रीशक्तीला दूर ठेवुन भारतीय राष्ट्रवाद साध्य करणे अशक्य आहे. त्या करीता समाजात स्त्री—पूरूष समानता, सामाजिक बंधनातून स्त्रीयांची मुक्तता, स्त्री शिक्षणाचा पुरस्कार या घटकांना महत्वाचे स्थान दिले. अशा या स्त्री—शक्ती शिवाय भारतीय राष्ट्रवाद भारतात निर्माण करणे अशक्य आहे. असे स्वामीजींना मनोमन वाटत असे.

६. स्वातंत्र्य आणि राष्टीय जागृती

स्वामी विवेकानंदाचे राष्ट्रवादाचे विचार हे राष्ट्रबरोबरच राष्ट्रातील इतर घटकांना प्राधान्य देणारे होते. त्यांचा राष्ट्रवाद थेट राजकीय स्वातंत्राची घोषणा नसलीतरी त्यांचे विचार राष्टीय जागृतीचे मुख्य प्रेरणास्थान होते. भारतीयात आत्मसन्मान व स्वाभीमानाची जाणिव परावलंबीत्वाचा त्याग गुलामगिरूतुन बाहेर पडण्याचा संदेश देणारा असल्यामुळे प्रत्येक भारतीयांना स्वातंत्र मिळाले पाहीजे ती मिळाली तरच भारतीयात राष्ट्राबद्दल प्रेम निर्मान होईल असे स्वामीजींना वाटत असे.

७. राष्ट्रवादाचा जागतीक दृष्टीकोन

स्वामी विवेकानंदाचा राष्ट्रवाद हा केवळ भारतापुरताच मर्यादित नव्हता त्यांनी भारताला जागतीक अध्यात्मीक मार्गदर्शक निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जागतीक सर्वच धर्मामध्ये

समन्वय साधण्याचा, त्यांच्यात सहिष्णुता व सद्भावना निर्माण करून संपूर्ण जगात मानवता वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला या करीता त्यांनी अमेरिकेतील शिकागो धर्म परिषदेत १८९३ मध्ये भाषन देत असतांना आपल्या भाषनाची सुरूवात बंधू आणि भगिनी या वाक्यानी करून संपूर्ण जगाचे लक्ष भारतीय संस्कृतीकडे वेधले.

निष्कर्ष :

स्वामी विवेकानंदाच्या राष्ट्रवादाच्या वरिल विवेचनावरून असा निष्कर्ष काढता येतो की त्यांचा राष्ट्रवाद हा केवळ राजकीय आंदोलन नसून तो अध्यात्मीक सांस्कृतीक, सामाजिक, नैतीक, आणि मानवी मुल्यावर आधारीत असुन त्यातुन एक व्यापक भारतीय राष्टाच्या निर्मीतीस फार मोठा हातभार लावणारा होता. त्यांचे राष्ट्रवादासंबंधी विचार हे स्वातंन्र्य पूर्व कालखंडा बरोबरच, आजही भारताच्या राष्ट्रबांधनीसाठी तितकेच सुसंगत, प्रेरणादायी, आणि मार्गदर्शक ठरतात हे त्रिकालाबाधीत सत्य आहे.

संदर्भ ग्रंथ :—

1) भारतीय राजकीय विचारवंत- श्रीकांत विदेशपांडे
2) भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार - प्रा राम मुठाळ
3) भारतीय राष्ट्रवाद - डॉ सत्येंद्र त्रिपाठी डॉ. कृष्णदत्त द्विवेदी
4) भारतीय समाज और संस्कृती - डॉ कृष्णदत्त द्विवेदी
5) भारतीय राजकीय विचारवंत - प्रा डॉ कृ दि बोराळकर
6) भारतीय राजनीतिक विचारक - बी एम शर्मा, रामकृष्ण दत्त शर्मा, सविता शर्मा
7) भारतीय राजनीतिक विचारक - ओम प्रकाश गाबा
8) lndian Political Thinkers - Dr Sunita Gangwal